सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
● dainiktarunbharat.com ● epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर | शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २७७ । पाने १२ । किंमत रु. ६/-

## किश्तवाडमध्ये ढगफुटी, ४२ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीर मधील किश्तवाड येथील चशोटी गावात गुरुवारी ढगफुटी झाली. डोंगरावरून येणाऱ्या पाण्याचा आणि ढिगाऱ्याचा अनेक लोकांवर परिणाम झाला. या अपघातात ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. २८ जणांचे मृतदेहही सापडले आहेत. आतापर्यंत ६५ जणांना वाचवण्यात आले आहे. सुमारे २०० लोक बेपत्ता आहेत. हजारो भाविक मचैल मातेच्या यात्रेसाठी चशोटी गावात पोहोचले होते, तेव्हा हा अपघात झाला. यात्रेचा हा पहिला थांबा आहे.

यात्रा जिथून सुरू होणार होती तिथेच ढगफुटी झाली. येथे बसेस, तंबू, लंगर आणि भाविकांची अनेक दुकाने होती. सर्व पुराच्या पाण्यात वाहून गेले. मचैल मातेची यात्रा दरवर्षी ऑगस्टमध्ये होते. हजारो भाविक तिथे येतात. हा मार्ग २५ जुलै ते ५ सप्टेंबर पर्यंत चालेल. हा मार्ग जम्मू ते किश्तवाड २१० किमी लांबीचा आहे आणि वाहने पद्दार ते चशोटी १९.५ किमी रस्त्यावरून जाऊ शकतात.

सोलापूर तरुण भारत — प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

## उद्या अंक नाही

आज शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयाला सुट्टी आहे. त्यामुळे शनिवार, दि. १६ ऑगस्ट रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**









सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे...

### पत्रकार अरूण बळप यांना दलित मित्र गौरव पुरस्कार जाहीर



**सोलापूर, दि.१४ ऑगस्ट-**

दै. तरूण भारतचे ज्येष्ठ पत्रकार व बार्शी प्रतिनिधी अरूण बळप यांना बार्शी शहर व तालुका दलित महासंघाचा यंदाचा दलित मित्र गौरव मित्र पुरस्कार जाहीर झाला आहे. श्री. बळप यांनी आतापर्यंत केलेल्या सामाजीक कार्याची नोंद घेऊन लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बार्शी शहर व तालुका महासंघातर्फे श्री बळप यांचा गौरव करण्यात येणार असल्याचे शहराध्यक्ष संदीप अलाट यांनी सांगितले.

### मावा खाण्यासाठी पैसे न देणाऱ्यास मारहाण

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

मावा खाण्यासाठी पैसे न देणाऱ्यास मारहाण करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रतन सोमनाथ माटे (रा. भवानी पेठ, मड्डी वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राहुल राम सरवदे (रा. शांती नगर, मड्डी वस्ती) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी जुना तुळजापूर नाका येथील ब्रिजहवळ रतन माटे थांबले होते. त्यावेळी राहुल सरवदे हा दारू पिऊन येऊन त्याने माटे याच्याकडे १० रुपये मावा खाण्यासाठी मागितले. त्यावेळी पैसे नाहीत असे म्हणाल्यानंतर सरवदे याने तु मला पैसे देतो की नाही असे म्हणून दमदाटी करून रस्त्याच्या कडेला पडलेला दगड उचलून माटे यांच्या डोक्यात मारला. त्यामुळे माटे हे जखमी झाले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.



### शिरवळवाडी तलाव भरला शंभर टक्के

**अक्कलकोट, दि.१४ ऑगस्ट-**

तालुक्यातील शिरवळवाडी येथील साठवण तलाव शंभर टक्के भरल्याने तलाव लाभक्षेत्रातील गावांना मोठया प्रमाणात लाभ होणार आहे. आज रोजी तलावात प्रकल्पिय पाणी साठा ३.२६ द.ल.घ. मीटर असल्याचे तलाव बिट धारक श्रीशैल पाटील यांनी सांगितले. शिरवळवाडी, शिरवळ, वागदरी, सदलापूर, कर्नाटकातील हिरोळी, सरसंबा येथील पाणी प्रश्न मिटला आहे. तलावातील अंदाजे दहा हजार ब्रास गाळ शेतकऱ्यांनी स्व-खर्चातून नेल्याने तलावाची खोली वाढली आहे. त्यामुळे तलावात पाणी साठवणात वाढ झाली आहे. सदर तलाव शंभर टक्के भरल्यामुळे जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, शिरवळचे अप्पू बिराजदार, सरपंच आशादेवी बिराजदार, उपसरपंच पूजा कवडे, राजू जवळगे, विजय बिराजदार, अजित व्होदलूरे, शिरवळवाडीचे चंद्रकांत दर्शनाले, धुळप्पा घोदे, हणमंत घोदे, धानय्या स्वामी, प्रदीप वडगांव, शिवराज हत्तरकी, मारुती कोटगे, बसवराज सफले, इरेश बागेवाडी, गजानन निंबाळे, संगप्पा कुडले, सुरज सोनके, वसंत माने पाटील, संजय निंबाळे, शिरवळच्या सर्व महिला ग्रा. पं. सदस्य, ग्रामसेवक नेल्लोर व शेतकरी उपस्थित होते.




### अन्नधान्याचा कोटा वाढवून द्यावा

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

राज्यातील रेशन दुकानदारांचा अन्नधान्याचा कोटा शासनाने वाढवून द्यावा; अशी मागणी अन्न नागरी पुरवठा मंत्र्यांकडे महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यातील हजारो केसरी कार्डधारकांना रेशनचा माल मिळत नाही तसेच २०१३ च्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यात बदल करून वंचित केसरी व इतर कार्डधारकांना नियमाप्रमाणे अन्न धान्य मिळण्यासाठी व त्यांची उपजीविका भागविण्यासाठी कायद्यात बदल करावा. या मागण्यांचे निवेदन राज्याचे अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे प्रभाकर देशमुख यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे. राज्यातील हजारो रेशन कार्डधारकांना २०१३ च्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यामुळे अन्नधान्य रेशन दुकानातील पूर्ण मिळत नाही. त्यामुळे रेशन दुकानदार सुद्धा अडचणीत आहेत व ४४००० च्या आतील उत्पन्न व शहरातील एकूण ५९ हजारच्या आत उत्पन्न असणाऱ्या नागरिकांना सुद्धा रेशन दुकानातून धान्य मिळत नसल्यामुळे त्यांची उपासमार चालू आहे. गरीब, गरजू निराधार लोकांना याचा लाभ मिळत नाही. आर्थिक परिस्थिती बिकट असणाऱ्या नागरिकांना खाजगी किराणा दुकानातून धान्य घेणे शक्य नाही. त्यामुळे त्वरित याचा पुन्हा सर्व्हे करून केसरी कार्डधारकांना व ज्यांना जमीन नाही त्यांना सुद्धा रेशन दुकानदार माल देत नाहीत. यामुळे त्या वंचितांना न्याय द्यावा, अशी मागणी देशमुख यांनी लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष नाना मोरे, सुरेश बापू नवले, मोहन जमदाडे, युवा जिल्हा उपाध्यक्ष निहाल मुजावर उमेश माने, गोवर्धन घोलप, अभिजीत नेटके इतर कार्यकर्ते उपस्थित होते.




### सहायक पोलिस निरीक्षक

# नेताजी बंडगर यांना पोलिस शौर्य पदक जाहीर

## सहायक पोलिस आयुक्त राजन माने व सहायक फौजदार संतोष देशपांडे यांना राष्ट्रपती पदक





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील माढा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक नेताजी बंडगर यांना राष्ट्रपती यांच्याकडून पोलिस शौर्य पदक तर सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील सहायक पोलिस आयुक्त राजन माने व सहायक फौजदार संतोष देशपांडे यांना राष्ट्रपतींचे विशेष सेवा पदक जाहिर झाले आहे. त्यामुळे पोलिस आयुक्त एम राजकुमार व पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी पदक प्राप्त अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

राष्ट्रपतींच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहे. त्यात महाराष्ट्रातील ३९ पोलीस अधिकारी, अंमलदारांना गुणवत्तापूर्वक सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर करण्यात आले आहे. त्यामध्ये सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील माढा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक नेताजी बंडकर, सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील सहायक आयुक्त माने व सहायक फौजदार देशपांडे यांचा समावेश आहे.

सहायक पोलिस निरीक्षक नेताजी बंडगर यांना सन २०१७ साली गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा-कारमपल्ली रस्त्यावर झालेल्या भीषण नक्षलवादी चकमकीदरम्याने दाखविलेल्या अद्वितीय शौर्यासाठी हा सन्मान जाहिर करण्यात आला आहे.

सहायक आयुक्त राजन माने यांनी ऑक्टोबर २०१७ मध्ये सांगली येथे कार्यरत असताना १६ पिस्टल, १० रिव्हॉलवर, ६४ जिवंत काडतुसे अशी अग्नी शस्त्रे व दारुगोळा हस्तगत केली होती. सन २०१६ मध्ये नागपुर येथे कार्यरत असताना अंबाझरी पोलीस ठाणे हद्दीत गणपती उत्सवादरम्यान रिंकु राजगुरु (अर्ची) हिच्या कार्यक्रमा दरम्यान एक व्यक्ती इलेक्ट्रीक डेपोला चिटकले असता माने यांनी त्यांच्या हातातील लाठीने त्यास सोडवून त्याचा जिव वाचविला. त्याबद्दल तात्कालीन मा. पोलीस आयुक्त व्यंकटेशन यांनी प्रशंसापत्र देवून गौरविले होते.

सहायक आयुक्त माने यांना राष्ट्रपती पदक जाहिर होताच पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त गौहर हसन, विजय कबाडे, डॉ. अश्विनी पाटील उपस्थित होते.




# नशा फक्त शरीर नाही तर भवितव्यदेखील नष्ट करते

## पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे, कोणत्याही व्यसनाच्या आहारी जाऊ नये, नशा फक्त शरीर नाही तर भवितव्य नष्ट करते, यश पाहिजे असेल तर नशा टाळा, नशेमुळे त्याचे व कुटुंबियांचे नुकसान होते असे मत पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी व्यक्त केले.


केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या वतीने १३ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत सर्वत्र नशामुक्त भारत अभियनांतर्गत सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या वतीने तळे हिप्परगा येथील एन. के. ऑर्किड, इंजिनिअरींग कॉलेज येथे जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पोलिस अधिक्षक कुलकर्णी बोलत होते. यावेळी सोलापूर तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे, सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम, पोलिस उपनिरीक्षक महेश घोडके, प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, उपप्राचार्य श्रीनिवास मेतन, ५०० विद्यार्थी उपस्थित होते.

पोलिस निरीक्षक देशपांडे यांनी प्रस्ताविक केले. यावेळी पोलिस अधिक्षक कुलकर्णी यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. ही कार्यशाळा पार पाडण्यासाठी अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी दिपक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे, सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम, पोलिस उपनिरीक्षक महेश घोडके, सहायक फौजदार बाणेवाले, हवालदार जगताप, कॉलेजमधील प्राध्यापक यश पवार यांनी परिश्रम घेतले.



**स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला पसायदान**

सोलापूर : राज्य शासनाच्या सुचनेनुसार स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला हरिभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात गुरुवारी सकाळी विद्यार्थ्यांनी पसायदानाचे पठण केले.



**तिरंगा रोषणाईने उजळले जिल्हाधिकारी कार्यालय**

सोलापूर : स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय परिसर तिरंगाच्या विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. (छायाचित्रे : केवल तिवारी)

# भाषा, साहित्य, संस्कृतीच्या समृद्धतेसाठी संशोधन आवश्यक : प्र-कुलगुरू डॉ. दामा

## सोलापूर विद्यापीठात भाषा, साहित्यावर राज्यस्तरीय कार्यशाळा



**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

भाषा, साहित्य व संस्कृतीच्या समृद्धतेसाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून अभ्यासक व संशोधकांनी अधिक संशोधन करावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. गुरुवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भाषा व वांग्मय संकुलाच्यावतीने पीएम उषा विभागाच्या सहकार्याने भाषा साहित्य आणि डिजिटल टेक्नॉलॉजी या विषयावर आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्र- कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवाजी विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी, भाषा व वांग्मय संकुलाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. शिवानंद तडवळ, डॉ. तानाबाई पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. दामा म्हणाले की, आज देशभरात विविध भाषा बोलल्या जातात. प्रत्येक भागातली बोलीभाषा व मातृभाषा ही वेगळी असते. भाषा, साहित्य आणि संस्कृती या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. डिजिटल युग आणि तंत्रज्ञानामुळे यामध्ये बदल होताना आपण पाहत आहोत. तंत्रज्ञानाचा वापर करून तसेच संशोधन करून भाषेच्या विविधतेसाठी तसेच समृद्धतेसाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी यावेळ केले.

यावेळी डॉ. गवळी म्हणाले, भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृती या सर्व गोष्टी एकमेकांत गुंतले आहेत. आता डिजिटल तंत्रज्ञानामुळे या विषयाची व्याप्ती वाढली आहे. तंत्रज्ञानामुळे भाषा व साहित्यामध्ये बदल होण्याबरोबरच परिणाम देखील होत आहे. त्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे विशिष्ट भाषा व साहित्य निर्माण होत आहे, मात्र त्यात नाविन्यता असणार नाही. आज जगभरात रोबोटचा वापर वाढला आहे, त्यालाही भाषेचाच आधार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. गौतम कांबळे यांनी भाषा व वांग्मय संकुलाचा या शैक्षणिक वर्षातील हा दुसरा कार्यक्रम असल्याचे सांगून विद्यार्थी व संशोधकांसाठी संकुल सतत प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. रघुनाथ कडाकणे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नानासाहेब गव्हाणे यांनी केले तर आभार डॉ. तानाबाई पाटील यांनी मानले.

# नाल्याचे पाणी ओसरल्याने बाधित नगरांना असलेला धोका टळला



सोलापूर : अवंतीनगर येथील पुलाखालचे पाणी गुरुवारी बऱ्याच प्रमाणात ओसरले होते.

## बॅरिकेट्स हटवून ते रस्ता केले पूर्ववत सुरू

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

गत काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने शहर परिसरातील नाले ओव्हरफ्लूल झाल्याने शहरातील अनेक नगरे बाधित झाली होती. या पार्श्वभूमीवर गुरुवारी पाणी ओसरल्याने विविध नगरांना होणारा संभाव्य धोका टळला.

पावसामुळे एकरूख तलावातील सांडव्यातून पाणी सोडल्याने तसेच नाल्यातील पाण्याचा प्रवाह वाढल्याने बुधवारी जुना पुना नाका येथील दगडी पूल पाण्याखाली गेला होता. गणेश नगर, मडकी वस्ती, वसंत विहार परिसरातील मडकी वस्ती, गणेश नगर, अळळे नगर, आर्यनंदी नगर, बनशेट्टी नगर, यश नगर भाग २, संकेत थोबडे नगर आदी नगरे जलमय झाली होती.

शहरातील शेळगी नाला, रूपाभवानी येथील नाला येथील पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाढल्याने जुना पुना नाका येथील पूलही पाण्याखाली गेला होता.

जलमय झालेल्या अनेक नगरांतील नागरिकांच्या सुरक्षेसाठी महापालिकेने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली होती. काही ठिकाणच्या लोकांना स्थलांतर करण्यासंदर्भात सूचित करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर गुरुवारी पाणी ओसरल्याने शहरातील विविध नगरांना असलेला धोका टळला आहे. जुना पुणे नाका स्मशानभूमी परिसरातील दगडी पूल पाण्याखाली गेल्याने यासह अवंती नगर पुलानजीकच्या गणेश नगर, मडकी वस्तीला जाणारा रस्ता बुधवारी बॅरिकेट्स लावून बंद करण्यात आला होता. गुरुवारी पाणी ओसरले होते.

# चपराक प्रकाशनतर्फे वैविध्यपूर्ण विषयांवरील पुस्तकांचे रविवारी प्रकाशन

**पुणे, दि. १४ ऑगस्ट-**

मराठी ग्रंथ आणि प्रकाशन व्यवहारात सातत्याने नवनवीन प्रयोग करणार्या पुण्यातील चपराक प्रकाशनतर्फे येत्या रविवारी (दि. १७ ऑगस्ट) वैविध्यपूर्ण विषयांवरील सात पुस्तके एकाच वेळी प्रकाशित होत आहेत. श्रमिक पत्रकार भवनाच्या सभागृहात होणार्या या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक अरुण नलावडे हे असून नाट्य-चित्र दिग्दर्शक अभिराम भडकमकर, उद्योजक राम कुतवळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

याबाबत माहिती देताना प्रकाशक घनश्याम पाटील यांनी सांगितले की, मालेगाव येथील ज्येष्ठ लेखक रमेश शिंदे यांनी लिहिलेला श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र हा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित होत आहे. शिवदिग्विजयाची रोमांचकारी चरित्र कथा या ग्रंथात दिली आहे. छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग सचित्र दिल्याने नव्या पिढीसाठी हा अनमोल आणि प्रेरणादायी ठेवा उपलब्ध होणार आहे. सैन्यदलातील योगदान, युती शासनाच्या काळात मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु, जिल्हाधिकारी, दुग्धविकास आयुक्त, आदिवासी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, मंत्रालयात राजशिष्टाचार विभागाचे सचिव अशा प्रदीर्घ सेवेचा अनुभव असलेले अधिकारी म्हणजे गिरीश गोखले. त्यांचे अरे सरकार सरकार हे अनुभव कथन प्रकाशित होत असून त्यामुळे प्रशासनातील अनेक बारकावे उघड होणार आहेत.

शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांनी एक विषय, एक लेखक आणि एकच प्रकाशक या योजनेअंतर्गत गेल्या दोन वर्षात शिक्षणविषयक बारा पुस्तके लिहिली आहेत. त्यांची शिक्षणरंग आणि भाषा आणि शिक्षण ही आणखी नवी दोन पुस्तके यावेळी प्रकाशित होणार असून शिक्षणासारख्या महत्त्वपूर्ण विषयावर सलग चौदा पुस्तके प्रकाशित होणारे ते एकमेव भारतीय लेखक ठरले आहेत.

गेल्या काही काळातले चंद्रलेखा बेलसरे हे गूढकथांच्या प्रांतातले एक महत्त्वपूर्ण नाव. त्यांचे आजवर चार गूढकथासंग्रह प्रकाशित झाले असून ओव्हरटेक हा पाचवा गूढकथासंग्रह प्रकाशित होत आहे.

प्रेतात्मे, भुताटकी अशा विषयावर जगभर पुस्तके प्रकाशित होतात, चित्रपट प्रदर्शित होतात. अनेकांसाठी हा विषय औत्सुक्याचा असल्याने बेलसरे यांनी या साहित्य प्रकारात वेगळा ठसा उमटवला आहे.

दीपाली जोगदंड यांचा फन वन हा बालकुमारांसाठीचा इंग्रजी कवितासंग्रही यावेळी प्रकाशित होणार आहे. प्रकाशक घनश्याम पाटील यांचे अनेक राजकीय लेख वेळोवेळी चर्चेला आले.

अनेक नेत्यांनी-कार्यकर्त्यांनी या लेखांवरून रान उठवले. पोलिसांकडे तक्रारीही दिल्या. सध्याच्या परिस्थितीत सुस्पष्ट भूमिका घेणारे पाटील यांचे हे लेख धडक बेधडक या पुस्तकाच्या रूपाने वाचायला मिळणार आहेत.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# सैन्याने सीमेपलीकडील दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू
- ऑपरेशन सिंदूरने पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर दिले; काश्मीरमध्ये ट्रेन पोहोचणे ही मोठी कामगिरी



**नवी दिल्ली, दि.१४ ऑगस्ट-**

७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्राला संबोधित केले. २४ मिनिटांच्या भाषणात त्यांनी ऑपरेशन सिंदूर, काश्मीर रेल्वे प्रकल्प, विकास, लोकशाही आणि अर्थव्यवस्था यासारख्या विषयांवर भाष्य केले.

राष्ट्रपती म्हणाल्या, या वर्षी आपल्याला दहशतवादाचे दुःख सहन करावे लागले. पहलगाम हल्ला भ्याड आणि अमानवी होता. त्याला उत्तर म्हणून भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरमध्ये सीमेपलीकडील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. आत्मनिर्भर भारत मिशनची चाचणी घेण्याची ही एक संधी होती. काश्मीर खोऱ्यात रेल्वे सेवा सुरू करणे ही एक मोठी कामगिरी आहे. यामुळे त्या भागात व्यवसाय आणि पर्यटनाला चालना मिळेल. आयुष्मान योजनेचा ५५ कोटी लोकांना फायदा झाला आहे. त्यांनी असेही म्हटले की, भारत लोकशाहीची जननी आहे, संविधान आपल्यासाठी सर्वोपरि आहे. द्रौपदी मुर्मू या देशाच्या १५ व्या राष्ट्रपती आहेत. या सर्वोच्च संवैधानिक पदावर पोहोचणाऱ्या त्या पहिल्या आदिवासी आणि देशाच्या दुसऱ्या महिला राष्ट्रपती आहेत. ६४ वर्षीय मुर्मू यांनी २०२२ मध्ये देशातील सर्वात तरुण राष्ट्रपती होण्याचा विक्रमही केला होता.

### संविधानात चार मूल्यांचा उल्लेख

आपल्या संविधानात चार मूल्यांचा उल्लेख आहे, जे आपल्या लोकशाहीला मजबूत ठेवणारे चार आधारस्तंभ आहेत. ही मूल्ये म्हणजे न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता. या सर्व मूल्यांमध्ये व्यक्तीच्या प्रतिष्ठेची संकल्पना आहे.

### आपण फाळणीचे दुःख विसरू नये

आपण आपल्या लोकशाहीवर आधारित संस्था निर्माण केल्या, ज्यामुळे लोकशाहीचे कामकाज बळकट झाले. आपले संविधान आणि लोकशाही आपल्यासाठी सर्वोपरि आहे. आपण फाळणीचे दुःख कधीही विसरू नये. आज आपण फाळणीचा भयानक स्मृतिदिन साजरा केला. फाळणीत भयानक हिंसाचार झाला आणि लाखो लोकांना विस्थापित व्हावे लागले. आज आपण इतिहासाच्या चुकांचे बळी ठरलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

### बलिदानाच्या बळावर स्वातंत्र्य मिळवले

७८ वर्षांपूर्वी १५ ऑगस्ट रोजी भारताने बलिदानाच्या बळावर स्वातंत्र्य मिळवले. स्वातंत्र्य परत मिळवल्यानंतर, आपण अशा मार्गावर निघालो जिथे सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार होता. दुसऱ्या शब्दांत, आपण स्वतःला आपले नशीब घडवण्याचा अधिकार दिला. अनेक लोकशाही व्यवस्थांमध्ये, लिंग, धर्म आणि इतर कारणांवरून लोकांना मतदान करण्यावर निर्बंध होते. परंतु आपण ते केले नाही. आव्हाने असूनही, भारतीयांनी लोकशाही यशस्वीरित्या स्वीकारली.

### १५ ऑगस्ट सामूहिक स्मृतीत कोरला

१५ ऑगस्ट ही तारीख आपल्या सामूहिक स्मृतीत खोलवर कोरली गेली आहे. वसाहतवादी राजवटीच्या दीर्घ काळात, देशवासीयांच्या अनेक पिढ्यांनी स्वप्न पाहिले की एक दिवस देश स्वतंत्र होईल. देशाच्या प्रत्येक भागात राहणारे लोक परकीय राजवटीच्या बेड्या तोडण्यासाठी उत्सुक होते, असेही राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या.

## पाकिस्तानी नेत्यांनी जिभेवर नियंत्रण ठेवावे

**नवी दिल्ली :** भारताने पाकिस्तानी नेत्यांना त्यांच्या जिभेवर नियंत्रण ठेवण्याचा सल्ला दिला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी गुरुवारी साप्ताहिक पत्रकार परिषदेत सांगितले की, पाकिस्तानी नेते भारताविरुद्ध बेजबाबदार, युद्धप्रवण आणि द्वेष पसरवणारी विधाने करत आहेत.

जयस्वाल म्हणाले की, पाकिस्तानी नेते त्यांचे अपयश लपवण्यासाठी वारंवार अशी विधाने करतात. त्यांनी त्यांच्या जिभेवर नियंत्रण ठेवावे, कारण जर त्यांनी कोणतेही चुकीचे पाऊल उचलले तर त्याचे परिणाम खूप वाईट होतील. खरं तर, गेल्या ४८ तासांत, ३ पाकिस्तानी नेत्यांनी सिंधू जल करार स्थगित करण्याबाबत भारताविरुद्ध धमकी देणारी विधाने केली आहेत. यामध्ये लष्करप्रमुख असीम मुनीर, पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांचा समावेश आहे. सिंधू जल कराराबाबत लवाद न्यायालयाच्या वैधतेवर जयस्वाल म्हणाले की- भारत लवाद न्यायालयाला कायदेशीर मानत नाही, वैध मानत नाही आणि असे निर्णय देण्याचा कोणताही अधिकार नाही. म्हणून, त्यांचे निर्णय अधिकारक्षेत्राबाहेर आहेत. हे भारताच्या पाणी वापराच्या अधिकारांवर परिणाम करत नाहीत. जयस्वाल यांनी कराराबाबत पाकिस्तानचे दिशाभूल करणारे संदर्भ फेटाळून लावले.

## वरदायिनी उजनीला तिरंगा रोषणाई...



# ८६ व्या शौर्य पुरस्काराची घोषणा

- ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करणाऱ्या ९ लढाऊ वैमानिक-अधिकाऱ्यांना वीर चक्र

**नवी दिल्ली, दि.१४ ऑगस्ट-**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला, ऑपरेशन सिंदूरमध्ये शौर्य आणि धाडस दाखवणाऱ्या ७० सशस्त्र दलाच्या जवानांना शौर्य पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली आहे. हवाई दलाच्या ३६ जवानांना शौर्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

९ हवाई दलाच्या अधिकाऱ्यांना वीर चक्राने सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानमधील मुरीदके आणि बहावलपूरमधील दहशतवादी अड्डे नष्ट करणाऱ्या लढाऊ वैमानिकांचा समावेश आहे.

वीर चक्र हे युद्धादरम्यान दिले जाणारे तिसरे सर्वोच्च शौर्य पदक आहे. त्याच वेळी, वायुसेनेचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी, वेस्टर्न एअर कमांडर एअर मार्शल जितेंद्र मिश्रा आणि डीजी एअर ऑपरेशन्स एअर मार्शल अवधेश भारती यांच्यासह चार हवाई दल अधिकाऱ्यांना सर्वोत्कृष्ट युद्ध सेवा पदक प्रदान करण्यात आले. भारतीय लष्करातील १८ सैनिकांना शौर्य पदक प्रदान करण्यात आले आहे.

भारतीय लष्कराच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, २ वरिष्ठ भारतीय लष्करी अधिकाऱ्यांना सर्वोत्तम युद्ध सेवा पदक प्रदान करण्यात आले आहे. ४ कीर्ती चक्र, ४ वीर चक्र आणि ८ शौर्य चक्र प्रदान करण्यात आले आहेत.

### १६ बीएसएफ जवानांना शौर्य पदक

सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) १६ सैनिकांना शौर्य पदक प्रदान करण्यात आले आहे. बीएसएफ ही देशाची पहिली संरक्षण रेषा आहे, जी २२९० किमी लांबीच्या भारत-पाकिस्तान सीमा आणि पश्चिम भागातील नियंत्रण रेषेवर (एलओसी) देखरेख आणि संरक्षण करते. या कारवाईदरम्यान बीएसएफचे दोन सैनिक शहीद झाले आणि सात जखमी झाले. याशिवाय पोलिस आणि निमलष्करी दलाच्या कर्मचाऱ्यांनाही पदके देण्यात आली आहेत. यामध्ये जम्मू-काश्मीर पोलिसांकडून १२८, सीआरपीएफकडून २० आणि छत्तीसगड पोलिसांकडून १४ पदकांचा समावेश आहे.

### केंद्रीय-राज्य दलातील १०९० पोलिसांना सेवा पदके प्रदान

केंद्र सरकारने केंद्रीय आणि राज्य दलातील १०९० पोलिसांना सेवा पदके देण्याची घोषणा केली आहे. गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, २३३ पोलिसांना शौर्य पदके, ९९ पोलिसांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदके आणि ७५८ पोलिसांना उत्कृष्ट सेवा पदके प्रदान करण्यात आली आहेत. यामध्ये अग्निशमन सेवा, गृहरक्षक दल, नागरी संरक्षण आणि सुधार सेवा कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. जम्मू-काश्मीरला सर्वाधिक १५२ पोलिसांना शौर्य पदके मिळाली आहेत.



लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन स्वातंत्र्यदिन सोहळ्याचे थेट प्रसारण सकाळी ६.३० वाजल्यापासून दूरदर्शन नेटवर्कवर

## अग्रलेख...

# आव्हानांचे सिंहावलोकन

पिंजऱ्याची दारे उघडून प्राणी-पक्ष्यांना सोडून दिले की, पुढे स्वतंत्रपणे जगण्यातील संकटे किंवा अडथळ्यांचा सामना त्या त्या प्राणी किंवा पक्ष्यास एकटेपणानेच करावा लागतो. माणसाचे तसे नाही. माणूस जमात समूहशास्त्राशी जोडली गेली आहे. माणसांचा समूह परतंत्रातून मुक्त झाला की, त्यास स्वतःच्या प्रगती वा उन्नतीकरिता सामूहिकपणे प्रयत्न करावे लागतात. म्हणूनच प्रदीर्घ काळ पारतंत्र्याच्या मानसिकतेत वावरलेल्या व दीड शतक थेट इंग्रजी गुलामगिरीत राहिलेल्या भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या वाटचालीचा आढावा घेताना, भारतीय समाज किंवा भारतातील मानव समूहाच्या प्रगतीचा आढावा घेणे अपेक्षित असते. १५ ऑगस्ट २०२२ रोजी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा झाला. या दिवशी आपण स्वातंत्र्योत्तर वाटचालीच्या अमृत महोत्सवात पदार्पण केले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पुढच्या अडीच तपांचा काळ हा भारताचा अमृतकाळ असेल अशा जिद्दीने विविध विकास कामे हाती घेतली आहेत. गरीब, महिला, शेतकरी आणि युवक ही देशाची खरी संपत्ती आहे आणि या संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी सरकारने प्रयत्नशील राहिले पाहिजे, ही सरकारची भूमिका आहे. गेल्या ७५ वर्षांच्या काळात भारताने अनेक स्थित्यंतरे अनुभवली, अनेक संकटे झेलली आणि अनेक समस्यांची ओझी अंगावर पेलत कधी सहजपणे तर कधी खडतरपणे पुढच्या काळाची वाटचाल सुरू ठेवली. ही वाटचाल कोणा एकाच्या बळावर पार पडत नसते. या वाटचालीचे श्रेय कोणा एका व्यक्ती वा नेत्यास देणेही योग्य नाही. त्यासाठी संघटितपणा आणि सकारात्मक सामूहिकतेचे पाठबळ लागते. भारताच्या प्रदीर्घ काळाच्या पारतंत्र्यामुळे सामूहिकतेचे महत्त्व समाजास पटल्यामुळे असेल, पण भविष्याच्या दिशेने हे वाटचाल अपरिहार्य आहे, हे ओळखून देशाच्या प्रत्येक नागरिकाने एकमेकांचा हात धरून ही वाटचाल केली. हे आता मागे वळून पाहताना लक्षात येते.

प्राणी किंवा पक्ष्यांना पिंजऱ्यातून सोडून दिल्यानंतर त्यांनी त्यांच्या जिवावर आपल्या जगण्याची वाटचाल करावी अशी त्यांच्या स्वातंत्र्याची संकल्पना असली, तरी माणसाच्या स्वातंत्र्यानंतर तसा विचार अशक्य होता. त्यामुळे सामूहिक मानसिकता घडविणे, देशाचे सामाजिक ऐक्य जपणे, संघटित करणे व बळकट करणे हे स्वातंत्र्यानंतरचे पहिले आव्हान होते. देशाला राष्ट्र म्हणून स्वतःचा चेहरा, स्वतःची ओळख निर्माण करण्याचे आणि विकासाची साधने उभी करून समाजपरिवर्तन घडविण्याचेही हे आव्हान होते. स्वातंत्र्य मिळताच भारतीय समाजात सहजपणे ऐक्य साधले जाईल, अशी स्थिती प्रत्यक्षात नव्हती. भाषा, प्रांत, धर्म, जाती, आदी अनेक वैविध्यांचा समाजाच्या वेगवेगळ्या समूहावर पगडा होता. हा पगडा कायम ठेवून भारतीयत्वाची भावना जपणे व ती बळकट करणे हे आव्हान असले, तरी ते पेलताना भारताचा राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक वारसा या दोन बाबींचा मोठा आधार या काळात निःसंशय मिळाला होता. तसे पाहिले, तर राष्ट्रवादाच्या संकल्पनेचे सामर्थ्य अफाट असे आहे. या संकल्पनेमुळे सामाजिक, राजकीय क्रांती झाली, महायुद्धे भडकली, अनेक साम्राज्ये लयास गेली आणि अनेक राष्ट्रांचा नवोदयही झाला. त्यामुळे सामाजिक समूहांच्या अस्मिता किंवा धार्मिक स्वातंत्र्यास धक्का न लावता राष्ट्रवादाची संकल्पना पेलण्याची मानसिकता घडविण्याचे आव्हान होते. ते अजूनही कायम आहे. आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन, शेती व्यवस्था व औद्योगिक सुधारणांबरोबरच स्वबळावरील स्वयंपूर्ण विकासाच्या नियोजनासाठी बाजारपेठांचा विकास होणे गरजेचे असते. नागरिकांची क्रयशक्ती वाढविल्याखेरीज बाजारपेठांचा विकास होत नाही. क्रयशक्ती वाढविण्यासाठी नागरिकांच्या उत्पन्नाचे स्रोत उभे करावे लागतात. औद्योगिक विकास आणि सेवा किंवा अनुषंगिक क्षेत्रांचा विकास हीच उत्पन्नाची साधने असल्याने, हे चक्र पूर्ण करण्याच्या आव्हानास तोंड देण्याची क्षमता नागरिकांमध्ये यावी याकरिता शिक्षण, साक्षरता महत्त्वाची असते. स्वातंत्र्योत्तर काळाच्या पहिल्या दशकात देशात साक्षरता आणि शिक्षण प्रसाराचा मोठा अनुशेष होता. समाजव्यवस्थेत लोकशाही मूल्यांचे भान रुजविणे हे त्यापुढचे आव्हान होते. स्वातंत्र्यलढ्यामुळे साक्षर समाजात राष्ट्रभावनेचे बीज रुजले असले, तरी पोट भरण्याची भ्रांत असलेला मोठ्या वर्गास मात्र आपण पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त होऊन स्वतंत्र झालो आहोत, म्हणजे नेमके काय झाले आहे, हे अनुभवण्याचे वातावरण तयार झाले नव्हते. त्यामुळे जगण्यापुरते अन्न, अंगभर वस्त्र आणि निवाऱ्याचे छप्पर या तीन गरजांची हमी मिळाल्याखेरीज स्वातंत्र्यास अर्थ नाही, असाही एक विचारप्रवाह होता. स्वातंत्र्यानंतरची वाटचाल करताना समाजपरिवर्तन किंवा देश उभा करण्याच्या संकल्पनेत या तीन गरजा सर्वाधिक महत्त्वाच्या ठरल्या होत्या. त्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतरची पहिली २५ वर्षे फारशी दिलासादायक नव्हती. ज्यांनी परदेशातून आयात केलेला सडका, निकृष्ट दर्जाचा आणि विषारी बियामिश्रित मिलो खाऊन जगण्याचा संघर्ष केला, त्यांना या गरजांचे महत्त्व अधिक पटेल. गरिबी हटाओचा नारा इंदिरा गांधींनी दिल्यावर धोत्रामिश्रित सडका मिलो खाणाऱ्या समाजासही सुखी भविष्याची स्वप्ने पडू लागली होती. या परिस्थितीतून बाहेर पडण्याकरिता व्यापक प्रयत्न करण्याचे आव्हानही अधिक गंभीर झाले. कदाचित पहिल्या २५ वर्षांतील खडतर अनुभवांनी राष्ट्रउभारणीच्या पुढच्या प्रयत्नांना भक्कम बळ दिले आणि पुढच्या ५० वर्षांच्या पर्वाने भारताच्या भविष्याचा नवा मार्ग आखून दिला.

अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण, आर्थिक स्वावलंबन म्हणजे, आत्मनिर्भरता आणि सामाजिक न्यायासह समाजवादी समाजरचना ही भारतीय अर्थव्यवस्थेची स्वातंत्र्यापासूनचीच संकल्पना होती. १९६५ मध्ये हरित क्रांतीच्या पाऊलखुणा उमटल्या असल्या, तरी त्या क्रांतीचे परिणाम पुढच्या दशकातच दिसू लागले. अन्नधान्याच्या उत्पादनात नवे तंत्रज्ञान अवतरले, दुग्धोत्पादन वाढविणाऱ्या धवल क्रांतीने देशात नव्या चैतन्याचे वारे वाहू लागले. १९७५ मध्ये भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्राने आर्यभट्ट नावाच्या पहिल्या उपग्रहाच्या रूपाने अवकाशात भरारी घेतली. पुढचे दशक मनुष्यबळ विकासाच्या नव्या टप्प्याचे ठरले. या काळात सामाजिक क्षेत्रातही परिवर्तनाची चाहूल लागत होती. महिला सक्षमीकरणाचा पहिला हुंकार १९८५ मध्ये उमटला आणि ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलांना कर्तृत्वाच्या नव्या संधींची कवाडे उघडली. भारतातील जातिव्यवस्थेमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता निर्माण झाली असून संधीच्या समान वाटपाचा हक्क काही समाजघटकांपासून हिरावला जात असल्याची खंत घटनाकारांना वाटत होती. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी १९५३ मध्ये काकासाहेब कालेलकर आयोगाची स्थापना आणि इतर मागासवर्गीयांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी १९७८ मध्ये स्थापन करण्यात आलेला मंडल आयोग हा सामाजिक परिवर्तनाचा हा मोठा टप्पा मानावा लागेल. जागतिकीकरणाने विकासाची दारे खुली झाली. आज सहजपणे प्रत्येकाच्या तळहातावर असणाऱ्या मोबाईलमुळे जग खऱ्या अर्थाने जवळ आले आणि जागतिक ज्ञानाचे धागे खेडोपाडीपर्यंत पोहोचले. पुढच्या सलगतेने सुरू झालेल्या गेल्या अडीच दशकांना विकास पर्व असेच म्हणावे लागेल. मागासलेला देश अशी जागतिक भावना भारताने पुसून टाकलीच आहेच; या काळात विकासाच्या सर्व टप्प्यांना स्पर्शही केला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, शिक्षण आदी अनेक क्षेत्रांत भारताची भरारी जगाच्या पाठीवर उठून दिसावी एवढी लक्षणीय ठरली आहे. गेल्या काही वर्षांत जगाने अचंबित व्हावे अशा वेगाने विकासाचे वारे देशात वाहू लागले आहेत. मात्र, स्वातंत्र्यापासून अभावग्रस्त अवस्थेत असलेल्या अनेकांपर्यंत ते वारे अजूनही पोहोचलेले नाहीत. त्यातून जुन्या समस्या पुन:पुन्हा डोकी वर काढतात. संघर्ष उफाळतात, सामाजिक स्वास्थ्य बिघडते. विकासातील असमतोलामुळे सामाजिक वाद उफाळतात. काही राज्ये अतिविकसित तर काही विकासापासून वंचित अशी स्थिती दिसते आणि प्रादेशिक वाद उभे राहतात. त्यातून सामाजिक सलोखा संकटात येतो. लोकसंख्या, गरिबी, स्वच्छता, आरोग्य, शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या, निवारा आणि उपजीविकेचे प्रश्न अशा अनेक समस्या आजही देशासमोर आहेतच. या समस्यांनी विकासाच्या पर्यावरणाचा दर्जा खालावला आहे, हे अमान्य करता येणार नाही. तो पुन्हा उंचावण्यासाठी काय करावे लागते, तेही सर्वांस माहीत आहे. ते करण्याची तयारी आणि प्रामाणिक इच्छाशक्ती केव्हा निर्माण होणार, तो खरा प्रश्न आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर शतकमहोत्सवाकडे जाणारी पावले या समस्या सोबत घेऊन वाटचाल करणार की पायाखाली गाडून पुढे जाणार, हा कळीचा मुद्दा आहे. त्या भविष्याचा वेध घेण्याची क्षमता समाजामध्ये रुजविणे हे यापुढचे एक आव्हान आहेच.

## प्रासंगिक

# खालिद का शिवाजी : एक शोकान्तिका

**डॉ. सतीश चाफले**

जगातील प्रत्येक देशाला आपला इतिहास हा प्राणप्रिय राहिलेला आहे. तो असायलाही पाहिजे. कारण प्रत्येकाचा इतिहास संस्कृती, सभ्यता, त्यांची महान परंपरा याचा गौरव बाळगणारा असतो. परिणामी प्रत्येकाला आपल्या इतिहासाचा अभिमान वाटतो. महाराष्ट्राचा इतिहास छत्रपती शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाने देदीप्यमान झाला आहे. त्यात थोडा जरी कसूर झाला तरी मराठी माणूस पेटून उठतो. इतिहासाचे विकृतीकरण तर बिलकूलच खपवून घेतले जाणार नाही. सध्या महाराष्ट्रात अशाच एका वादाला तोंड फुटले आहे. निमित्त आहे एका मराठी सिनेमाचे; ज्याचे नाव आहे 'खालिद का शिवाजी.'

इयत्ता पाचवीतल्या मुलाला ज्याचे नाव खालिद, त्याला इतिहासाचा अभ्यास करताना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना चित्रपट लेखकाला आणि दिग्दर्शकाला महाराजांचा नवीन इतिहास सापडला आणि त्यांनी शिवरायांचा इतिहास बदलवून टाकला. म्हणे तर काय?, छत्रपती शिवरायांच्या सैन्यात ३५ टक्के मुस्लिम होते. महाराजांच्या १७ अंगरक्षकांपैकी ११ हे मुस्लिम होते. राजेंनी राज्याभिषेकावेळी मुस्लिमांसाठी रायगडावर मशीद बांधली. छत्रपती शिवारायांचा एकेरी उल्लेख, या वाक्यांना घेऊन खरा वाद आहे आणि तो अपेक्षित आहेच. कारण छत्रपती शिवरायांच्या चरित्रावर सर्व अंगाने संशोधन झाले आहे. त्यात वरील बिंदूंना घेऊन कुठेही संदर्भ आढळला नाही किंवा वरील बिंदूंना तात्त्विक आधारही चित्रपट निर्माणकर्त्यांना देता आला नाही.

तत्कालीन प्राथमिक संदर्भ साधनामध्ये महाराजांचे समकालीन असलेले कृष्णाजी अनंत सभासद यांची 'सभासद बखर' तसेच मल्हार रामराव चिटणीस लिखित सप्त प्रकरणात्मक चरित्र ज्याला 'चिटणीस बखर' असे म्हणतात. ही शिवकालीन मूळ ग्रंथ मानली जातात. यात कुठेही वरील वाक्यांचा संदर्भ मिळत नाही. मुळात महाराजांच्या सैन्य दलात घोडदळ-पायदळ अशी रचना होती. ती संख्या दोन लक्षच्या घरात असावी. या संख्येत मुस्लिम सैन्य होते का? तर, अनेक इतिहासतज्ज्ञ म्हणतात, ती असेल तर अगदी बोटावर मोजण्याइतपत असावी. या सैन्यात सरनोबत म्हणून नूर खान बेगचा उल्लेख आला आहे. पण तो १६५७ च्या पूर्वी आला आहे. नंतर तो उल्लेख कुठेही सापडत नाही. त्या मागचे कारण असे आहे की, छत्रपती शिवाजी महाराज हे १६५७ च्या पूर्वी शहाजी राजे यांच्या वतीने स्वराज्यातील राज्य कारभार बघत होते आणि तत्कालीन व्यवस्थेत आदिलशाही राजदरबाराच्या वतीने शहाजी राजांच्या आज्ञानुसार कार्य सुरू असल्यामुळे त्या सर्व व्यवस्थेवर शहाजी राजे यांच्या व्यवस्थेचा प्रभाव होता. म्हणून शिवरायांना दिलेली माणसे ही शहाजी राजेंनी दिलेले होती. पुढे १६५७ नंतर शिवरायांनी आदिलशाहीला विरोध सुरू केला. त्यानंतर छत्रपती शिवरायांच्या सैन्य दलातील किरकोळ मुस्लिम संख्या जी होती ती पुढे दिसत नाही. यासोबत काजी हैदर नमक एक फारसी भाषातज्ज्ञाचा उल्लेख आहे. काझी हैदरची नियुक्ती दुभाषा म्हणून करणे काळाची गरज होती. यामुळेच महाराजांनी नंतर राज्य व्यवहार कोषाची निर्मिती केली. पण हाच काझी हैदर महाराजांच्या निधनानंतर औरंगजेबाला जाऊन मिळाला आणि नंतर त्याने स्वराज्यातील गुप्त बातम्या शत्रूंना देऊन स्वराज्याचे अतोनात नुकसान केले. मदारी मेहतरच्या बाबतीतही कुठलाही समकालीन ठोस पुरावा उपलब्ध नाही. समुद्रावर आपला वचक असावा म्हणून आरमाराच्या निर्मितीच्या प्रारंभीच्या काळात दौलतखानाची दर्यासारंग म्हणून नेमणूक केल्याचे दिसते, पण पुढे आग्रे आणि धुळप यांनीच आरमाराचे नेतृत्व केले. हा तुरळक उल्लेख सोडला तर महाराजांच्या सैन्य दलात मुस्लिम होते, याचा ठोस पुरावा उपलब्ध नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १७ अंगरक्षकांपैकी ११ अंगरक्षक हे मुस्लिम होते, असं या चित्रपटातून ठामपणे सांगण्यात आले आहे. त्यालाही पुरावा नाही. फक्त त्यात सिद्धी हिलालचे नाव पुढे येते. अफजल खानाच्या वधाच्या प्रसंगी सिद्धी हिलालचा उल्लेख काही दुय्यम साधनांमध्ये केलेला दिसून येतो. भारतात मध्ययुगीन कालखंडामध्ये गुलाम विकत घेण्याची प्रथा होती. शिवरायांच्या नातेवाईकाने बालपणीच सिद्दी हिलाल यास विकत घेतले होते. त्याला क्रित पुत्र म्हणतात. म्हणून सिद्दी हिलाल जन्माने जरी मुस्लिम असला, तरी त्यावर हिंदू धर्माचेच संस्कार झाले होते.

रायगडावर मुस्लिमांसाठी मशीद बांधली होती, असाही उल्लेख सिनेमांत आहे. पण याला कुठलाही ऐतिहासिक पुरावा नाही. रायगडाचे बांधकाम हे हिरोजी इंदुलकर यांच्या देखरेखीखाली झाले, याची नोंद आहे. रायगडावर एक शिलालेख कोरला आहे. त्यात हिरोजींनी रायगडावर कोणकोणते बांधकाम झाले आहे, याचा उल्लेख केला आहे; त्यात कुठेही मशीद बांधल्याची नोंद नाही.

बाबा याकूतलाही महाराजांच्या गुरुस्थानी बसविण्याचा अट्टाहास किती ठामपणे केला जातो, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. 'खालीद का शिवाजी' या चित्रपटाच्या माध्यमातून चुकीचा खोटा विमर्श 'नरेटिव्ह' प्रस्थापित करण्याचा हा प्रयत्न दिसतो. सध्याच्या काळात सेक्युलरिझम आणि सर्वधर्मसमभाव यांचा उदो उदो चाललेला दिसतो. विशेषतः वाढत्या हिंदुत्वाच्या ताकदीला कमजोर करण्यासाठी डाव्या विचारसरणीकडून याचा वापर केला जातो. हिंदू समाजाला संभ्रमित करण्यात येते. इतकेच नाही, तर छत्रपती शिवाजी महाराजांवर असलेले समाजाचे उत्कट प्रेम अशा देशद्रोही डोळ्यांना अडथळा वाटत असल्याने शिवाजी महाराजांवरही सेक्युलर असा शिक्का मारण्यात येतो. त्याचप्रमाणे काही विशिष्ट धर्माचे शिवव्याख्याते छत्रपती शिवाजी महाराज हे मुस्लिमांचे कसे असे पटवून देण्यात मागेपुढे बघत नाही. खरं तर इस्लामच्या धर्मग्रंथात इतर धर्मीयांबद्दल असलेले क्रूर विचार आणि त्यांचा हजार वर्षांचा हिंसक इतिहास बघता सर्वधर्मसमभाव हे थोतांड वाटते. नरेटिव्ह सेट करण्यासाठी अशा सिनेमाचा आधार घेतला जातो, तोच प्रयत्न 'खालिद का शिवाजी' या चित्रपटातून झालेला दिसतो. सर्वसामान्यांना प्रश्न पडतो की, एकीकडे देश २१ व्या शतकात आधुनिकतेकडे वाटचाल करतो आहे. विचारांनी प्रगल्भ झालो असतानासुद्धा आम्ही सकारात्मक विचार करीत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली एका कलाकृतीचे निर्माण करताना स्वतःची वैयक्तिक अस्मिता निर्माण करण्याच्या नादात राष्ट्रीय अस्मिता आम्ही विसरलो का? आपला पुरुषार्थ सिद्ध करण्यासाठी राष्ट्र-महापुरुषांचा मानसन्मान ही तेवढाच महत्त्वाचा आहे. असा विचार हा सामान्यापासून ते बुद्धिजीवीपर्यंत सर्वांनी विशेषतः चित्रपट निर्माते लेखक, दिगदर्शक यांनी करणे गरजेचे आहे. नाहीतर 'खालिद का शिवाजी' ही २१ व्या शतकातील शोकान्तिका बनून राहील. छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदुस्थानातील तमाम हिंदू समाजाचे श्रद्धास्थान आहे. शिवकालीन इतिहासाचे असे सादरीकरण हे कदापि खपवून घेतले जाणार नाही. अशा सिनेमावर बंदी घालणे हेच योग्य राहील.

९४२३४०२०६९

(लेखक हे रातुम नागपूर विद्यापीठाचे इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# भिंतीकडे तोंड तरीही ते ओळखायचे...

नरकेसरी प्रकाशन संस्थेच्या अमृत महोत्सवी आणि दैनिक तरुण भारतच्या शताब्दी वर्ष पर्यावरणाला समर्पित केले. बीज अंकुरेपासून सुरू झालेले हे अभियान आता मंदिर स्वच्छता आणि तुळशी लावा पर्यावरण वाचवापर्यंत पोहोचले. या अभियानातून कोणाला काय साध्य झाले, हे सांगता येत नाही. परंतु, मला मात्र एक खजिनाच मिळाला. स्वच्छता कशी असावी याचे उदाहरण फक्त संतनगरी शेगावच देऊ शकते. संत गजानन महाराजांच्या मागेपुढे विदर्भातही अनेक संत होऊन गेले. वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यात आजनसरा या खेड्यात झालेले संत भोजाजी महाराज पुरणपोळीच्या नैवेद्यासाठी प्रसिद्ध आहेत. येथे रविवार आणि बुधवारी हजारो क्विंटलचे पुरण शिजते आणि त्याचा नैवेद्य भोजाजी महाराजांना अर्पण केला जातो. आता तर देवस्थानने प्रसादालय सुरू केले. तेथेही पुरणाच्या पोळीचे भोजन मिळते. हे स्थळ विदर्भात बऱ्यापैकी प्रकाशझोतात आले आहे. याच मांदियाळीत आर्वी तालुक्यातील टाकरखेडा येथील संत लहानुजी महाराज देवस्थानमध्ये जाण्याचा योग आला आणि 'दिव्यत्वाची जेथे प्रचीती तेथे कर माझे जुळती' असेच झाले. संत लहानुजी महाराजांचे अनेक अनुभव ऐकायला मिळाले. त्यांच्या नेत्रांमध्ये तेज होते. आलेल्या भक्ताला त्या तेजाची वेदना होऊ नये म्हणून संत लहानुजी महाराज भिंतीकडे तोंड करून बसायचे. पण, निस्सीम भक्त आला तर भक्ताकडे न बघता ते भक्ताला नावासह आवाज द्यायचे, असे अनेक दृष्टांत त्यांच्या भक्तांनी अनुभवले आहेत. महाराजांच्या कृपादृष्टीने विश्वस्त मंडळाने हे संस्थान मोठे केले. सात एकरच्या विस्तीर्ण परिसरात जिथे सहज फिरता फिरता जाता येणार नाही अशा आडवाटेवर असलेल्या संत लहानुजी देवस्थानची शिस्त आणि स्वच्छता बघितल्यावर शेगावची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. मंदिर परिसरात शेती, गोशाळा आहे आणि बऱ्याच ठिकाणी ते पाहायलाही मिळते. परंतु, या धार्मिक ठिकाणावर लक्षवेधक ठरली ती 'लहानु स्पर्धा परीक्षा अभासिका व मार्गदर्शन केंद्र.' तिथे विदर्भातील अनेक जिल्ह्यातील पदवीधर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतात. आजपर्यंत जवळपास ३२ जणांनी येथे अभ्यास करून नोकरी मिळवली. गेल्या आठवड्यात लहानुजी महाराजांचा उत्सव झाला. उत्सवाच्या तीर्थ स्थापनेला एकाला आणि समाप्तीला दुसऱ्याला नोकरी लागली. स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन नि:शुल्क मिळते. ज्यांची परिस्थिती नाही तेच या ठिकाणी अभ्यासाला येतात. विशेष म्हणजे या ठिकाणी अभ्यासिकेत कोणत्या गरजूला प्रवेश द्यायचा हे येथे अभ्यास करणारे वरिष्ठ ठरवतात. त्यात विश्वस्तांचा हस्तक्षेप नसतो. मंदिरात १०५ घनमीटरचा गोबर गॅस सयंत्र, सेंद्रिय शेती प्रकल्प, एम. एस. स्वामीनाथन शेतकरी प्रशिक्षण शाळेसोबतच गांडुळ खत, गांडुळ पाणी, गोमूत्रापासून कीटकनाशक, गोबर गॅस खत, गोमूत्रापासून फिनाईल आणि देशी गाईच्या गोमूत्रापासून तयार केलेले गोअर्क ही उत्पादनंही येथे घेतली जातात. मंदिराकडे सहा कोटीचा निधी जमा आहे. त्या निधीच्या व्याजावर मंदिराचे व्यवस्थापन आणि देखभाल केली जाते. या मंदिरात प्रवेश करताच तेथील भव्यता जाणवते. लहानुजी महाराजांच्या भक्तांचा मोठा गोतावळा आहे. दिवसभर दर्शन घेणाऱ्यांची संख्याही मोठी असते. टाकरखेडा हे गाव वर्धा नदीच्या तीरावर वसलेले आहे. पैलतीरावर धामंत्री येथे प्राचीन शिवालय आहे. येथील महाकाय घंटा प्रसिद्ध आहे. जवळच रुक्मिणीचे माहेर कौंडण्यपूर आहे. प्रसिद्ध हिंदी अभिनेत्री हेमा मालिनीचे दैवत असलेले महारुद्र हनुमानाचे जहागिरपूर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा गुरुकुंज आश्रम, संत लहानुजी महाराजांचे गुरू आडकोजी महाराजांचे समाधी स्थळ वरखेड ही तीर्थस्थळं ओळीने असल्याने एक दिवसाची सहल सहज शक्य होते. या मंदिरांनी धर्म, संस्कृती व परंपरेचा वारसा जोपासून ठेवला आहे. लहानुजी संस्थान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या उपस्थितीत १९६१ मध्ये स्थापन झाले आणि या संस्थानचे उद्दिष्टही तुकडोजी महाराजांनी ठरविले आहे. लहानुजी महाराजांचा आवडता रंग पांढरा असल्याने परिसरात सर्वत्र शुभ्रताच दिसते. शेगावसारखी व्यवस्था निर्माण करण्याचा मानस असलेल्या या देवस्थानला तीन वर्षांपूर्वी ब वर्ग दर्जा मिळाला. देवस्थानाचा विकास झाला असला, तरी अजून गावात जाणारी वाट मात्र बिकट आहे. भिंतीकडे तोंड करून माणसं ओळखणाऱ्या लहानुजी महाराजांच्या देवस्थानची 'वाट...' अजून प्रशस्त होण्याची तेवढी 'वाट...'



९८८१९०३७६५

## दखल

# जरांगेंना खरेच काय पाहिजे?

**मोरेश्वर बडगे**

माणूस प्रगती करतो आहे. नवनवे शोध लावतो आहे. काही काळाने पृथ्वी राहायला लायक राहणार नाही, हे हेरून नव्या पृथ्वीचा शोध त्याने सुरू केला आहे. त्याला नव्याचा ध्यास आहे. मात्र, काहींना एक गोष्ट सोडवत नाही, ती म्हणजे त्याचा धर्म, त्याची जात. 'जात नाही ती जात' असे म्हटले जाते. सारे मानव एक आहेत. साऱ्यांच्या अंगात सळसळणाऱ्या रक्ताचा रंग एकच म्हणजे लाल आहे. तरीही माणसाला आपली जात, आपली पोटजात विसराविशी वाटत नाही. विचार करायला हे विचित्र वाटते. पण कटू वास्तव आहे. अलिकडली समाजातली आंदोलनं पाहिली तर माणूस अस्वस्थ होतो. भाषिक, धार्मिक, जातीय... साऱ्याच प्रकारच्या अस्मिता कमालीच्या कडव्या होत चालल्या आहेत. आपल्या जातीचा अभिमान माणसाला पूर्वीपासून वाटत आला आहे. पण त्या मानसिकतेचा उपयोग तो मानवतेच्या भल्याकरिता करीत असे. अलिकडे या जातीय अस्मिता टोकदार होत चालल्या आहेत. अस्मिता बाळगणे वाईट नाही. उलट समाजाच्या जिवंतपणाचे ते लक्षण आहे. मात्र या अस्मितेचा नेमका अर्थ उमगत नसल्याने संघर्षांच्या ठिणग्या उडू पाहतात तेव्हा चिंता वाढते. त्यातून नवनव्या समस्यांना कोंब फुटताहेत. कोल्हापूरच्या मठातली हत्तीण परत मिळविण्यासाठी तिथे मोठे आंदोलन झालेले नुकतेच आपण पाहिले. मुंबईसारख्या व्यस्त शहरात भर रस्त्यात कबुतरांना दाणे खाऊ घालता यावेत यासाठी शांतताप्रिय जैन समाज रस्त्यावर आलेला आपण पाहिला. 'शाकाहारी कॉलन्यांनी' मांसाहाऱ्यांना दारं बंद केली आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेने स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्टला मांस विक्रीला बंदी घातली तेव्हा त्याची अतिशय तीव्र प्रतिक्रिया उमटली. 'आम्ही काय खायचं हेही सरकार ठरवणार का?' असे लोक विचारू लागले. 'महाराष्ट्राला शाकाहारी राज्य बनवणार आहत का?' असाही प्रश्न काहींनी केला. मात्र माणसाची सहनशक्ती क्षीण झाली आहे. थोडं काही विरोधात गेलं तर त्याचं बीपी वाढतं. इतरांची मानसिकता लक्षात घ्यायची त्याची तयारी नाही. त्यातून समाजात संघर्ष, टक्कर वाढत आहेत. मूळ प्रश्न बाजूला पडत आहेत.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचेच उदाहरण घ्या. ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. मराठा आणि कुणबी एकच आहेत, असाही त्यांचा दावा आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे असे साऱ्यांनाच वाटते; सरकारलाही वाटते. त्यासाठी लढा देणारे जरांगे हे पहिले नाहीत. मराठा समाजाने ५१ मूकमोर्चे काढले आहेत. कुठेही कटुता, तणाव नव्हता. जरांगे यांची तळमळ समजू शकते. गेली तीन वर्षे त्यांनी आवाज उठवणे चालवले आहे. सहा उपोषणं केली. विधानसभेत समाजाचे उमेदवार उभे करण्याची सर्कस करून पाहिली. जमले नाही. त्यांच्या मागण्या समजू शकतात. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सरकारने त्या लक्षातही घेतल्या. देवेंद्र फडणवीस सरकारही सकारात्मक आहे. पण त्याआडून कुणी राजकारण करू पाहत असेल तर अवघड आहे. जरांगे यांच्या बाबतीत तोच प्रॉब्लेम आहे. मराठा समाजाला आरक्षण हवे आहे. मात्र जरांगे यांना आरक्षणासोबत आणखी काही हवं आहे. त्यांना फडणवीस नको आहेत. त्यांना फडणवीसांची विकेट पाहिजे आहे. ती मिळत नाही हे पाहून जरांगे आणि त्यांचे गॉडफादर यावेळी आरपारची लढाई लढायला उतरले आहेत. जरांगे यांचे बोलवते धनी वेगळे आहेत. आता येत्या २९ ऑगस्टपासून मनोज जरांगे पाटील मुंबईत आंदोलन करणार आहेत. आरक्षण घेतल्याशिवाय उठायचे नाही, असा संकल्प त्यांनी सोडला आहे. साऱ्या समाज बांधवांना त्यांनी आपल्यासोबत गाड्याघोड्यांनी मुंबईला चालायचे आवाहन केले आहे. कल्पना करा. लाखोंच्या संख्येने मराठे मुंबईत मुक्कामाने आले तर मुंबईची काय अवस्था होईल? कल्पनाच करवत नाही. बाहेरचे मोर्चे नसतानाही मुंबईमध्ये वाहतुकीची जीवघेणी कोंडी असते. जरांगे यांच्या शब्दावर समजा लाखो लोक गाड्यांसह आले तर कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश होणार आहे. गाड्या कुठे उभ्या करणार? पोलिस गाड्या आत येऊ देणार नाहीत. म्हणजे पोलिसांशी संघर्षांची वेळ येऊ शकते. आले तरी त्यांच्या खाण्या-पिण्याची, सकाळच्या प्रातर्विधीची काय व्यवस्था? जरांगे यांना नेमके काय हवे? सध्या सणासुदीच्या मुहूर्तावर मुंबईत येऊन त्यांना कोणाची फजिती करायची आहे? आता घरोघरी गणपती बसणार आहेत. गणपती हे सर्वांचे आराध्यदैवत आहे. या उत्सवात मुंबईचा माहोल काही और असतो. तो सांभाळताना पोलिसांची दमछाक होते. आता त्यात भर म्हणजे लाखो आंदोलक येणार असतील तर तो मोठ्या टेन्शनचा विषय होतो. मूर्ती घेऊन या असे पाटलांनी आवाहन केले आहे. इकडे समुद्रात शिरवू म्हणतात. सारेच अवघड आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न या अंगाने सरकार सध्या या आंदोलनाकडे पाहत आहे. जे काही आहे, पोलिस तर बोलतीलच; पण पोलिसच नव्हे तर सरकारमधील जबाबदार मंत्र्यांनीसुद्धा जरांगे आणि त्यांच्या आंदोलकांशी बोलले पाहिजे. आंदोलकांनी मुंबईत न येता काय तोडगा निघू शकतो; तसा मधला मार्ग काढला पाहिजे. आरक्षण ही अशी वस्तू नाही की खिशातून काढून देता येईल. एकनाथ शिंदे किंवा अजित पवार या दोघा उपमुख्यमंत्र्यांकडे ही जबाबदारी देता येईल. या आधीही जरांगे आपल्या 'सैन्या'सह मुंबईत यायला निघाले होते. एकनाथ शिंदे यांनी त्यांना वाशीमध्ये रोखलं. शिंदे तेव्हा मुख्यमंत्री होते. काय मागतात तो कागद दिला. मात्र विजयाचा आनंद अल्पजीवी ठरला. जरांगे मागताहेत ते एकनाथ शिंदे देऊ शकले नाहीत. फडणवीस सरकार देऊ शकते का? जरांगे यांना ते छान ठाऊक आहे. पण त्यांचे टार्गेट वेगळे आहे. असे नसते तर ज्यांच्याशी बोलायचे त्यांनाच टार्गेट का केलं नसतं. एकनाथ शिंदे आणि जरांगे यांचे तर छान ट्युनिंग होते. शिंदे यांच्या काळात मराठा आरक्षणाच्या दिशेने समिती नेमली गेली, खूप काम झाले. पण मराठा असतानाही एकनाथ शिंदे फार काही करू शकले नाहीत. मग परिस्थितीत असा काय फरक पडला? मराठ्यांनी खूप झेललं आहे. मराठ्यांना विश्वासात घेऊन बोललं पाहिजे. हा संवाद कमी पडतोय का? ही अखेरची लढाई आहे, असे जरांगे पाटलांनी मागेच म्हटलं आहे. जरांगे यांच्या पाठीशी नक्की किती समाज आहे, याचाही फैसला या निमित्ताने होऊन जाईल. मराठा समाजाची मोठी व्होट बँक आहे. आजही जातींकडे व्होट बँक म्हणून पाहिले जातंय. मराठा आंदोलन येतंय हे पाहताच ओबीसी नेते ॲक्टिव्ह मोडवर गेले आहेत. आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. जातीची गणितं लक्षात घेऊनच आजही सारेच राजकीय पक्ष सावधतेने आपले उमेदवार मैदानात उतरवतात. आपल्या राजकारणाची ही अपरिहार्यता आहे हे कबूल केलेच पाहिजे. त्यामुळेच 'चाणक्य' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आता अग्निपरीक्षा आहे.



यावेळचे टेन्शन वेगळे आहे. चार महिन्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. फडणवीसांना आणि त्यांच्या महायुतीला कुठल्याही परिस्थितीत त्या जिंकाव्याच लागतील. खरी हाणामारी मुंबई महापालिकेसाठी आहे. ठाकरे बंधू एकत्र लढले तर काँग्रेस कुणासोबत असेल? काँग्रेस या भावांसोबत नाही आली तर ठाकरे सेना म्हणजे उबाठाला मुस्लिमांची लोकसभेत पडली तशी मतं पडतील का? या वेळच्या निवडणुका भल्या भल्यांच्या हार्टचा ठोका चुकवणाऱ्या होणार आहेत.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

# राष्ट्रध्वजाचा सन्मान प्रत्येकांचे कर्तव्य आहे....

आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करत १५ऑगस्ट रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले, त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणाची अवती दिली, कित्येकांना तुरुंगवास भोगाव लागला. हजारो लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांच्या आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्यालाही स्वातंत्र्य मिळाले आहे या क्रांतिकारकाच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीने ही देश कार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमंतर्गत अनेक उपक्रमाचे आयोजन सरकारने केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज पासून म्हणजेच १३,१४,१५ ऑगस्टपर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबवण्यात येणार आहे हे उपक्रमांतर्गत भारताच्या ध्वजारोहण ध्वज संहितेच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करून नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकण्याची परवानगी देण्यात आली आहे. स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचे आल्याने सर्वत्र चे वातावरण तिरंगा मे होऊ लागले आहे.



कागदी आणि कापडी ध्वज बाजारात विक्रीसाठी आले आहेत. राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने सरकारच्या वतीने हर घर तिरंगा मोहीम राबवली जात असल्याने घरोघरी त्या दृष्टीने सिद्धांता सुरू झाली आहे. कपड्यांच्या दुकानाचे डिस्प्ले तिरंगी कपड्याने सजू लागली आहेत. अन्य दुकानेही आपले देशाप्रतीचे प्रेम दर्शवण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रवादीच्या रंगाचा वापर करून दुकानाबाहेर सजावट करू लागले आहेत. अनेक कार्पोरेट कंपन्याने कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी बुधवार गुरुवार शुक्रवार तिरंगा रंगाची अथवा पारंपारिक पोशाखा खालची थीम ठेवली आहे. अनेक सामाजिक संस्था आणि मंडळामध्ये, शाळा महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते, त्याची सिद्धता ही सध्या जोमाने सुरू आहे. ऑनलाइन शॉपिंग संकेतस्थळी स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्पादनावर विशेष सवलत ठेवली आहे सारे वातावरण देशभक्तीने जणू नाहूनच निघते. दरवर्षी तरी स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन जवळ आला की देशात देश प्रेमाचे वारे जोराने वाहू लागते. बाजारात ५,१० रुपयात मिळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे.मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे काय हे अभ्यासणेही आज गरजेचे बनले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हाल अपेष्टा सहन केल्या. मत्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देश प्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही. आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजा विषयायी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यास संदर्भ शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वज संहिता प्रकाशित करण्यात येते. मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही. राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकांचे कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकांनी आपण त्याची काळजी घेणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान प्रत्येकाने जपणे आपले आद्य कर्तव्य आहे याची जाणीव प्रत्येकाला असणे आवश्यक आहे.

**- सुनील पुजारी सोलापूर**


हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी - संपादकीय- (०२१७)-२६००३९८. ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००४९८. ● E-mail:starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## म्युझिक अँड आर्ट ॲकॅडमीतर्फे दमाणी अंधशाळा येथे रक्षाबंधन उत्साहात

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

दमाणी नगर येथील रोटरी क्लब सोलापूर नॉर्थ संचलित भैरूरतन दमाणी अंधशाळा येथे प्रज्ञाचक्षु विद्यार्थ्यांसोबत म्युझिक अकॅडमी अँड डान्स या संस्थेचे पदाधिकारी यांनी रोटरी क्लब सोलापूर नॉर्थ संचलित भैरूरतन दमाणी अंधशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पाडला. प्रारंभी अंध विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले. मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे यांनी शाळेची माहिती करून दिली तर प्रास्ताविक सचिव संतोष भंडारी यांनी केले. संस्थेच्या प्रमुख आसावरी गांधी यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या हातावर आपल्या सहकाऱ्यांसोबत राखी बांधली. पाहुण्यांतर्फे या विद्यार्थ्यांना भेट स्वरूपात टोप्या देण्यात आल्या. तसेच सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्यात आले. रोटरी क्लब सोलापूर नॉर्थचे अध्यक्ष संतोष सपकाळ यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे विद्यार्थ्यांनी बनवलेले पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.याप्रसंगी विकास गोसावी, सोनाली वाघमोडे अमोल मोहिते, शिवकुमार देढे, मेघा देढे, अभय भारती, तनिष्क गोसावी, सचिन वाघमोडे व आसावरी सराफ उपस्थित होते.



## गांधीनाथा विद्यालयात हर घर तिरंगा अंतर्गत विविध स्पर्धा

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

गांधीनाथा रंगजी विद्यालय मराठी माध्यम प्राथमिक विभागातर्फे शाळेत हर घर तिरंगा अंतर्गत अनेक सहशालेय उपक्रम, वर्गपातळीवर व शाळा पातळीवर राबविण्यात आले. संस्थेचे चेअरमन संजय गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम पार पडला.यावेळी मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी उपस्थित होते. यावेळी चित्रकला, निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

# 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत शहरात बाईक रॅली



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

हर घर तिरंगा उपक्रमातंर्गत जिल्हा प्रशासनाच्या वतीने सोलापूर शहरात आज तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. रॅलीत अधिकारी कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीची सुरुवात जिल्हाधिकारी कार्यालय येथून झाली. ही रॅली पत्रकार भवन चौक, सात रस्ता, रेल्वे स्टेशन, अण्णाभाऊ साठे पुतळा, नवी वेस येथून शिवाजी चौक व परत नवी वेस येथून पार्क चौक पुढे डफरीन चौक मार्गे रंगभवन येथे रॅलीची समारोप झाला. रॅलीत विविध देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, महसूल विभागाचे देवकुळे, तहसीलदार श्रीकांत पाटील सहभागी झाले होते.

## एचएसआरपी नंबरप्लेट चौथ्यांदा मुदतवाढ

### ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

राज्य शासनाने वाहनांबाबत काही महिन्यांपूर्वी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या गाड्यांना एचएसआरपी नंबर प्लेट बसवणं अनिवार्य करण्यात आलं आहे. यासाठी अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५ ही देण्यात आली होती. मात्र आता यामध्ये वाढ करण्यात आली असून ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे. सरकारकडून मुदतवाढ देण्यात आल्याने वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ज्या वाहनमालकांनी यापूर्वी साठी नोंदणी केली नाही, त्यांनी परिवहन विभागाच्या वेबसाईटवर जाऊन अपॉइंटमेंट घ्यावी. १ डिसेंबर २०२५ नंतर नसलेल्या गाड्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.ज्या गाड्या १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत आहेत, त्यांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट लावण्याची आवश्यकता आहे. पूर्वी याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५ होती. पण वाहन मालकांकडून प्रतिसाद कमी मिळाल्यामुळे राज्य सरकारने अखेर आता मुदत वाढवली आहे. ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत एचएसआरपी प्लेट लावण्याची अंतिम मुदत सरकारकडून देण्यात आली आहे.



## स्वातंत्र काळातील इतिहास युवकांना प्रेरणादायी

- पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी
- स्वातंत्र्य संग्राम काळातील दुर्मिळ चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन
- केंद्रीय संचार ब्युरो आणि मध्य रेल्वेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि.१४ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक स्वातंत्र्यसेनानींनी कुटुंबाचा त्याग केला. कठोर कष्ट घेतले, स्वत:चे बलिदान दिले. त्यांचा स्वातंत्र्य काळातील इतिहास आजच्या पिढीला प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले.

हर घर तिरंगा, फाळणी वेदना स्मृती दिवस आणि भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, सोलापूर व मध्य रेल्वे विभाग, सोलापूर यांच्या संयुक्त विदयमाने भारतीय स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या महत्वपूर्ण घटना, ऐतिहासिक स्थळे, राष्ट्र ध्वजाचा इतिहास, ज्ञात व अज्ञात क्रांतिकारक आणि राष्ट्रपुरुषांची माहिती देणाऱ्या दुर्मिळ चित्रांचे प्रदर्शन रेल्वे स्टेशन येथे भरविण्यात आले आहे. चित्रप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी श्री कुलकर्णी बोलत होते. यावेळी वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी मच्छिंद्र गळवे, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार, रेल्वे वैद्यकीय अधिकारी मंजुनाथ, स्टेशन व्यवस्थापक व्ही के श्रीवास्तव, उद्योजक विरेश नसले, भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे, माजी सैनिक दिवाकर रेळेकर, बाळासाहेब खराडे आणि कार्यालय सहायक जे. एम. हन्नुरे आदी उपस्थित होते. अंबादास यादव यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार कविता काजळे यांनी केले. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी प्रदर्शनाला सहीद्वारे शुभेच्छा संदेश दिला.

## होमकर नगरात दोन गटात हाणामारी

- सात जणांविरुध्द परस्परविरोधी गुन्हे दाखल



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

शहरातील भवानी पेठेतील होमकर नगरात दोन गटात हाणामारी होऊन ७ जणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत सिध्दांत सुनिल सारडा (वय २२, रा. होम कर नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन युवराज भोसले (रा. मड्डी वस्ती, सोलापूर), होमकर काका व त्यांच्या ४ ते ५ साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर युवराज विष्णु भोसले (वय ३४, रा. मड्डी वस्ती, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सिध्दांत सारडा व त्यांचे वडील, भाऊ (रा. होमकर नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ ऑगस्ट रोजी दहाच्या सुमारास होमकर नगर येथे सिध्दांत सारडा यांची काकू निशा यांनी बांधकामाचे ठेकेदार युवराज भोसले यास बांधकामाचे साहित्य घराजवळ का टाकले असे विचारले असता भोसले यांने त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी सिध्दांत घराबाहेर आले असता होमकर काका व इतरांनी त्यांस शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. त्यानंतर उपचार करून पोलिस ठाण्यात येत असताना युवराज भोसले याने हातात दगड घेऊन सारडा यांस मारहाण केली. यावेळी मारहाणीत १२ ग्रॅमची सोन्याची चैन तुटून पडली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

तर युवराज भोसले याच्या फिर्यादीनुसार १३ ऑगस्ट रोजी ११ च्या सुमारास भोसले व त्यांचे कामगार हे होमकर नगर येथे अपार्टमेंटचे काम करण्यासाठी आले असता सिध्दांत सारडा व इतरांनी तीन चारचाकी गाड्या लावल्या असल्याने त्यांना गाड्या काढा असे सांगितले. त्यावेळी सारडा व इतरांनी त्यांना शिवीगाळ करून हातोडीने पाठीत मारहाण केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

रविवार दि.२४ ऑगस्ट सायं.७.०० वा.
हुतात्मा स्मृती मंदिर
सोलापूरच्या नाट्य रसिकांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
मित्र असावेत तर फॅमिली सारखे..
आणि फॅमिली असावी तर मित्रां सारखी
हीच खरी
फॅमिलीची गंमत आहे
लेखक दिग्दर्शक- संतोष पवार



Online bkg : bookmyshow
फोन बुकींग संपर्क : श्री. शिवाजी उपरे - ९६२३००४२९९
ति.विक्री २१ ऑगस्ट पासून थिएटरवर सुरु...

## शस्त्राचा धाक दाखवून घरफोडी व वाहन चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

- तिघांना अटक; चौघे फरार
- गुन्हे शाखेची कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट -**

आंतर जिल्हा घरफोडी, वाहन चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पर्दाफाश केला असून तिघांना अटक केली आहे. तर अजूनही चौघे फरार आहेत. अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांकडून पुणे, सातारासह सोलापुर जिल्हयातील ३ गुन्हे उघडीस येऊन त्यांच्याकडून ६ लाख २१ हजार १०५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अक्षयसिंग बिरूसिंग जुनी (वय २१, रा. बिराजदार नगर, हडपसर, पुणे), धरमसिंग आदलसिंग गोके (वय २९, रा. संभाजी नगर झोपडपट्टी, धारूर, जि. बीड), सुरज रामु धोत्रे (वय २९, रा. अविनाश नगर, सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत. तर लकीसिंग गब्बरसिंग टाक (रा. रामटेकडी, सोलापूर), सागर कोळी (रा. कलावती नगर, सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर), अविनाश राठोड (रा. दोड्डी तांडा, ता. दक्षिण सोलापूर) आणि अभिषेक धोत्रे (रा. सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर) हे गुन्हेगार फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

९ ऑगस्ट संशयित तीन इसमांच्या कब्जात देशी बनावटीचे पिस्टल असून ते एमएच १२ सीवाय ५०४१ निळया रंगाचे स्कॉर्पीओ चारचाकी वाहनातून कुंभारी येथून निघून वळसंगकडे रवाना झाले असल्याची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास माहिती मिळाली होती. त्यावरून पोलिस पथकाने वळसंग हद्दीतील वळसंग वाडा हॉटेलच्या अलीकडे ५०० मीटर अंतरावर पोलिसांना एम एच १२ सीवाय ५०४१ क्रामांकाची स्कॉर्पीओ सापळा रचुन पकडून त्यातील संशयीत इसमांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे गावठी पिस्टल मिळाल्यानंतर पोलिसांनी ५० हजार रुपये किंमतीचे देशी बनावटीचे गावठी पिस्टल, २०० रुपये किंमतीचे एक जिवंत काडतुस व निळया रंगाचे स्कॉर्पीओ वाहन तसेच दोन मोबाईल असा ५ लाख ७२ हजार रुपये किंमतीचे मुद्देमाल जप्त केला. हे गावठी पिस्टल विक्री करण्यासाठी आणल्याबाबत त्यांनी सांगितल्याने त्यांच्याविरुध्द वळसंग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींनी त्यांच्या साथीदारासह होटगी येथील सराफ दुकानाचे शेटर उचकटुन घरफोडी केल्याचे निष्पन्न झाले. घरफोडी करताना वापरलेली स्कॉर्पीओ चारचाकी गाडी शिरवळ (जि. सातारा) येथुन व एक पांढ-या रंगाचे ईको कार उरळी कांचन येथुन चोरी केल्याचे सांगितले. यावेळी पोलिसांनी वळसंग पोलिस ठाण्यातील चोरीच्या गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या मालापैकी ४२७ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने जप्त केले.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अ. पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स.पोलीस निरीक्षक विशाल वायकर, पोलिस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर, रविराज कांबळे, स.पोलीस उपनिरीक्षक प्रकाश कारटकर, अनिल सनगल्ले, हवालदार सलीम बागवान, विजय भरले, विरेश कलशेट्टी, महिला हवालदार जाधव, शिपाई बाळराजे घाडगे, सागर ढोरे-पाटील, अन्वर अत्तार, हरिष थोरात, राहुल दोरकर, समर्थ गाजरे, यश देवकते, योगेश जाधव, दिलीप थोरात, सुनिल पवार, पोलिस शिपाई व्हनमोरे यांनी केली.



## देशभक्ती समूहगान स्पर्धेत मेहता शाळा प्रथम

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

शिवस्मारक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय देशभक्तीगीत समुहगान स्पर्धेत इयत्ता पहिली ते चौथी या प्राथमिक गटात कै. वि.मो. मेहता प्राथमिक शाळेस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.श्री. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ यांच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धा आयोजनाचे यावर्षी २८ वे वर्षे आहे. या स्पर्धाच्या बक्षीस विजेत्यास पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षकांनी लहान मुलांना देशभक्तीपर मार्गदर्शन केले. तसेच विजेत्या मुलांना बक्षीस देवून प्रोत्साहन दिले. यावेळी श्री. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ सोलापूर चे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, गंगाधर गवसने हे उपस्थित होते. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पाच हजार रुपये देऊन शाळेस गौरविण्यात आले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेसाठी मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर संगीत शिक्षिका श्रुती कुलकर्णी व मधुरा छत्रे यांनी विद्यार्थ्यांकडून समूहगीताची तयारी करुन घेतली.

### जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयइन : : L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर,महाराष्ट्र - ४१३००१
दूरध्वनी +९१ २२ २२८७२४०१, वेबसाइट www.jamshri.in, ईमेल आयडी : jammill1907@gmail.com

**३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु. लाख)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | 30.06.2025 (अलेखापरिक्षित) | 31.03.2025 (लेखापरिक्षित) | 30.06.2024 (अलेखापरिक्षित) | 31.03.2025 (लेखापरिक्षित) |
| 1 | परिचलनातून एकूण उत्पन्न | 183.78 | 168.42 | 167.27 | 703.12 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/ (तोटा) | 14.82 | (41.68) | 5.76 | (136.92) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्चात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | 14.82 | (41.68) | 5.76 | (104.50) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (5.82) | (4.76) | (4.81) | (19.30) |
| 5 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (5.82) | (4.76) | (4.81) | (19.30) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश) नफा/ (तोटा) करपश्चात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन्न (करपश्चात) | 9.00 | (34.28) | 0.95 | (111.64) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रू. 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत अखंडित परिचलन | 0.21 | (0.60) | 0.08 | (1.50) |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत खंडित परिचलन | (0.08) | (0.07) | (0.07) | (0.28) |

टिप :
अ) उक्त अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरिक्षित समितीने आढावा घेतला आहे. संचालक मंडळाने त्यांच्या ऑगस्ट 12, 2025 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांना मंजुरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारित असल्याप्रमाणे आणि अधिनियमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचावयाच्या कंपन्या आधिनियम 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचित केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी ऐस) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 30 जून 2025 रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिताचा वित्तीय निष्कर्षाचा बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही
राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

तारीख : 12.08.2025
ठिकाण : सोलापूर

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील व ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील जुना गट नं. ८४३/२ नविन गट नं. ८४९/२ यापैकी प्लॉट नं. ३३ याचे क्षेत्र १४९.३१ चौ.मी., यांसी मोजमापे पुर्व बाजु- १२.३६ मी., पश्चिम बाजु १२.३६ मी., दक्षिण बाजु ११.९५ मी. व उत्तर बाजु-१२.८० मी., यांसी चतुः सिमा पुर्वेस- रस्ता, दक्षिणेस प्लॉट नं. ३४, पश्चिमेस - कुलकर्णी यांची जागा व उत्तरेस- प्लॉट नं. २२, येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक वर्णनाची मिळकत, आतील दगड-माती, झाड-झुडुप व इतर तदंगभूत वस्तुसह.

वर वर्णन केलेली मिळकत ही श्री.किरण पांडुरंग जावळे व श्री.अनंता निवृत्ती सावंत यांचे खरेदी मालकीची असून, सदर मिळकती संदर्भाने आमचे अशिल व सदर मिळकतीचे मालक यांचे दरम्यान खरेदीचा व्यवहार ठरवून सदर खरेदीखताची ठरलेल्या रक्कमेपैकी आमचे अशिलांकडुन काही रक्कम इसारापोटी स्विकारलेली असून, त्यांनी आमचे अशिलास रजिस्टर खरेदीखत करुन देण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याबाबत खात्री व हमी त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. परंतु, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, हक्क, हितसंबंध, दावा, लिज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार, वाटणी हक्क, खरेदी-विक्री, वगैरे अन्य स्वरुपाचा हस्तांतरणाचा, हक्क व हितसंबंध, वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमुद मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचे गृहित धरुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार अगर हरकत आल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणुन सदरची खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली आहे दि.१४/०८/२०२५.

सही/-
अशिलातर्फे ॲड.
श्री. सोमनाथ हरिश्चंद्र सावंत
ॲडव्होकेट
बार्शी जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो. नं. ९८५०२४८०६८

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन -** डी।। व सब डी।। सोलापूर, ता. अक्कलकोट मधील अक्कलकोट (ग्रामीण) येथील जिरायत शेतजमीन यांसी गट नं. ८८२/२ यांसी आकार रु.२.९० पैसे यांसी एकूण क्षेत्र १ हे ५८ आर हि शेतजमीन. यासी चतुः सिमा येणेप्रमाणेः- पुर्वेसः-गट नं. ८८१, पश्चिमेसः- गट नं. ८८३, दक्षिणेसः गट नं. ८८२/१ व जाण्या-येण्याचा रस्ता, उत्तरेसः गट नं. ८८४. येणेप्रमाणे वर नमूद केलेली शेतजमीन मिळकत हि सदाशिव लक्ष्मण आवताडे यांच्या मालकी कब्जेवहीवाटीची आहे. त्यांनी सदरची मिळकत विक्रीस काढली असता. मिळकतीचे मालक सदाशिव लक्ष्मण आवताडे यांनी आमचे अशिलांस सदरची मिळकत हि कायम खुषखरेदीने देण्याचे मान्य व कबूल करुन कांही रक्कम स्विकारुन साठेखत/इसारा पावती लिहून दिलेले आहे. आमचे अशिल हे सदर मिळकतीचे लवकरात लवकर खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत, तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणीचेही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, दान, गहाण, लिज, पोटगी, टाच, बोझा वारसाहक्क, वहीवाटीचे हक्क, इ. असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत वर नमूद पत्यावर नोंदवावी आणि तशी आमचे अशिलांना खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार न आल्यास आमचे अशिल वर नमूद मिळकतीचे खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील मग तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची खरेदीपूर्व जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. १५/०८/२०२५

सही/-
एस. एम. पिरजादे
ॲडव्होकेट्स
Shop No. 1, Beskar Building, Basement of B.M.C. Bank, Civil Chowk, Solapur 9890955665

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE
19/1, KEGAON -SOLAPUR
Ph.No. 0217- 2500440, 2500441 Fax No.0217 – 2500613
Email : pdudentalcollege@rediffmail.com, Web site: www.pdudentalcollege.co.in
WANTED
Application are invited, in the prescribed format from the eligible candidates for the following posts-
Principal, Professor, Associate Professor (Reader), Asist. Professor (Lecturer) & Tutor
Requisite Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on College Website www.pdudentalcollege.co.in
Last date of application is 29/08/2025 - up to 4.30 pm

### मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना ई-खरेदी**

**क्रमांक: SUR/Sr.DMM/T. क्रमांक: 9625SEJ02 दिनांक: 13.08.2025** विभागीय भांडार कार्यालय: सेंट्रल रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ठेकेदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-निविदा मागवल्या जातात. **निविदा क्रमांक:** 9625SEJ02 **अध्याय क्रमांक:** 1. **पीएल कोड (गट):** 96NS6902 **आयटम प्रकार जीएसटी (वाय/एन):** वस्तू (वाय) **स्टॉक/नॉन-स्टॉक: नॉन-स्टॉक ऑर्डरिंग:**--मूल्यांकनासाठी विचारात घ्या: होय मान्यता देणारी एजन्सी: आरडीएसओ तपासणी एजन्सी: टीपीआय एजन्सी चलन अनुमत: INR **अंदाजे दर: वर्णन:** आरडीएसओ ड्रॉइंग क्रमांक टी-6902 (अल्ट-5/नवीनतम अल्ट.) नुसार एफआरएमच्या रेलसह सुधारित स्विच एक्सपेंशन जॉइंट (पूर्ण सेट) चे वस्तू, उत्पादन आणि पुरवठा (सर्व फिंगसह) लांब वेल्डेड रेलसाठी (80 मिमी कमाल. 40 सह) बी.जी. पीएससी स्लीपर्सवर 60 किलो (यूआयसी)/60ई1. आयआरएस स्पेसिफकाओनो आयआरएस/टी-1 0-2025/ निविदा उघडण्याच्या तारखेपर्यंत सुधारित केलेल्या नवीनतम पर्यायांना मान्यता देत आहे **वॉरंटी कालावधी:** डिलिव्हरीच्या तारखेपासून 30 महिने प्रमाण सहनशीलता (+/-): 0% वय, **आयटम श्रेणी:** सामान्य, एकूण पीओ मूल्य फरक परवानगी: कमाल 8 लाख कन्साइनी: एसएसई/पी-वे/स्टोअर महाराष्ट्र: 30.00 संच. **यूव्हीएएम आयटम संदर्भ:** (आयटम आयडी: 3100042 सुधारित स्विच एक्सपेंशन जॉइंट, सब आयटम आयडी:-3100042002-80 मिमी गॅपसाठी सुधारित स्विच एक्सपेंशन जॉइंट (कमाल)) तपासणी तपशील: उत्पादन तपासणी: टप्पा 1: उष्णता-उपचारित रॅल्सचे धातुकर्म चाचणी. (पीओ प्रमाणाच्या 100%), टप्पा 2: **अंतिम तपासणी** (पीओ प्रमाणाच्या 100%) अ. क्रमांक 2. पीएल कोड (गट): 96एनएस6914 आयटम प्रकार जीएसटी (वाय/एन): वस्तू (वाय) स्टॉक/नॉन-स्टॉक: **नॉन-स्टॉक ऑर्डरिंग: - - मूल्यांकनासाठी विचारात घ्या:** होय मान्यता देणारी एजन्सी: आरडीएसओ तपासणी एजन्सी: टीपीआय एजन्सी चलन अनुमत: INR **अंदाजे दर:** -- **वर्णन:** 52 किलोग्रॅमचे उत्पादन आणि पुरवठा. आरडीएसओ ड्रग क्रमांक टी-6914 नुसार सुधारित स्विच एक्सपेंशन जॉइंट (आयएसईजे) नवीनतम अल्टरेनॉनसह आणि आरएसओटी-10-2025 स्पेसिफिकेशन आणि गॅपचे पालन करणे ज्यामध्ये आरडीएसओ ड्रग क्रमांक टी-6914 नुसार रेल आणि फिंग्ज समाविष्ट आहेत. ERC MK-V, GFN लाइनर आणि PSC स्लीपर वगळता 4. निविदा उघडण्याच्या तारखेपर्यंत सुधारित केलेले नवीनतम पर्याय. **वॉरंटी कालावधी:** डिलिव्हरीच्या तारखेपासून 30 महिने प्रमाण सहनशीलता (+/-): 0% वय, **आयटम श्रेणी:** सामान्य, **एकूण पीओ मूल्य फरक परवानगी:** कमाल 8 लाख कन्साइनी: एसएसई/पी-वे/स्टोअर महाराष्ट्र: 20.00 संच. **यूव्हीएएम आयटम संदर्भ:** (आयटम आयडी: 3100042 सुधारित स्विच एक्सपेंशन जॉइंट, सब आयटम आयडी:-3100042002-80 मिमी गॅप (कमाल) साठी सुधारित स्विच एक्सपेंशन जॉइंट)) **तपासणी तपशील:** उत्पादन तपासणी: टप्पा 1: उष्णता-उपचारित रेलचे मेटलर्जिकल टेसांग. (पीओ प्रमाणाच्या 100%), टप्पा 2: अंतिम तपासणी (पीओ प्रमाणाच्या 100%) बक्षिसे (INR): रु.350670.00 www.ireps.gov.in वर **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** 29/09/2025 रात्री 11:30 नंतर संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: **www.ireps.gov.in.** ANJ-61

खतरनाक आणि विस्फोटक सामान्य सह यात्रा वंदनीय आरोप आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### इंडियन रेसिंग उत्सव उद्यापासून

**कोईम्बतूर :** देशातील प्रमुख मोटरस्पोर्ट चॅम्पियनशिप असलेल्या इंडियन रेसिंग उत्सावाचा (आयआरएफ) नवीन हंगाम शनिवारी कारी मोटर स्पीडवे येथे सुरू होईल. दोन दिवसांच्या सीझन ओपनिंगमध्ये फ्रॅन्चायझी-आधारित इंडियन रेसिंग लीग (आयआरएल), एफआयए-प्रमाणित फॉर्म्युला ४ इंडियन चॅम्पियनशिप (एफ इंडियन) आणि २८ वी जेके टायर एफएमएससीआय नॅशनल रेसिंग स्पर्धा असेल. कोईम्बतूर नेहमीच भारतीय मोटरस्पोर्ट्सचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. या वर्षी ड्रायव्हर्स ड्राफ्टने स्पर्धात्मक पातळी उंचावली आहे, सिद्ध आंतरराष्ट्रीय नावे आणि आशादायक भारतीय रेसर्सचे मिश्रण आणले आहे जे प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना धक्का देतील, असे रेसिंग प्रमोशन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अखिलेश रेड्डी यांनी म्हटले आहे.

### सिनर, सबालेन्का उपांत्यपूर्व फेरीत

**सिनसिनाटी :** गतविजेता जॅनिक सिनर व आर्यना सबालेन्काने सिनसिनाटी ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. कार्लोस अल्काराझने सरळ सेटमध्ये विजय मिळवत शानदार कामगिरी केली. सामन्याच्या मध्यात झालेल्या हवामानाच्या विलंबाला न जुमानता सिनरने जवळजवळ तीन तासांनी एड्रियन मनारिनोवर ६-४, ७-६ (७/४) अशी मात केली. दुसऱ्या मानांकित स्पेनच्या कार्लोस अल्काराझने इटलीच्या लुका नार्डीचा ६-१, ६-४ असा पराभव केला. सिनरचा पुढचा सामना कॅनडाच्या फेलिक्स ऑगर-अलियासिमशी होईल. फेलिक्सने फ्रान्सच्या बेंजामिन बोन्झीचा ६-४, ६-३ असा पराभव केला. फ्रान्सचा पात्रताधारी टेरेन्स ॲटमाने चौथ्या मानांकित टेलर फ्रिट्झला ३-६, ७-५, ६-३ असा धक्का देत आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा सामना जिंकला. तो उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी सातव्या मानांकित होल्गर रूनविरुद्ध लढेल. होल्गरने ६-४, ३-१ अशी आघाडी घेतली सताना त्याचा प्रतिस्पर्धी फ्रान्सिस टियाफो पाठीच्या दुखापतीमुळे निवृत्त झाला. बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने दुसऱ्या सेटमध्ये सर्व्हिस ब्रेक गमावल्यानंतर पुन्हा मुसंडी मारली व स्पेनच्या जेसिका बोझास मानेइरोचा ६-१, ७-५ असा पराभव केला.

# गिलची इंग्लंडमधील कामगिरी अविश्वसनीय : युवराज



◆ **नवी दिल्ली, १४ ऑगस्ट**

अलीकडील इंग्लंड दौऱ्यातील शुभमन गिलची कामगिरी अविश्वसनीय होती, विशेषतः पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी परदेशातील परिस्थितीत त्याच्या फलंदाजीवरील प्रश्नचिन्हांचा विचार करता त्याची कामगिरी प्रशंसनीय होती, अशा शब्दांत भारताचा माजी फलंदाज युवराज सिंगने कौतुक केले.

अलीकडील ॲण्डरसन-तेंडुलकर कसोटी मालिकेदरम्यान गिलने चार शतके झळकावली व ७५४ धावा करून आघाडीचा धावपटू ठरला. या कामगिरीमुळे तो सेना देशात कसोटी मालिकेत ७०० पेक्षा जास्त धावा करणारा पहिला आशियाई फलंदाज ठरला आणि पाहुण्या संघाला पाच कसोटी सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत आणण्यास मदत झाली.विराट कोहली, रोहित शर्मा आणि रविचंद्रन अशवन या तीन दिग्गजांनी लागोपाठ कसोटी क्रिकेटला रामराम ठोकल्यानंतर २५ वर्षीय गिलने कठीण दौऱ्यावर एका तरुण संघाचे नेतृत्व केले, ज्यामुळे संघात एक पोकळी निर्माण झाली.

परदेशात त्याच्या विक्रमावर अनेक प्रश्नचिन्हे होती. गिल कर्णधार झाला व त्याने चार कसोटी शतके ठोकलीत. जेव्हा तुम्हाला जबाबदारी दिली जाते तेव्हा तुम्ही ती कशी घेता हे अविश्वसनीय आहे, असे युवराजने ५० डेज टू गो महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या वेळी आयसीसी डिजिटलला सांगितले.



भारतीय संघाचा खूप अभिमान आहे. जरी ही मालिका अनिर्णित राहिली असली तरी हा आमच्यासाठी विजय आहे. कारण हा एक तरुण संघ आहे आणि इंग्लंडमध्ये जाऊन चांगले खेळणे आणि स्वतःला सिद्ध करणे सोपे नाही, असेही तो म्हणाला.

यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत, आकाश दीप आणि अर्शदीप सिंग यांच्या दुखापतींमुळे आणि त्यांचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह त्याच्या कामाचे व्यवस्थापन करण्यासाठी केवळ तीन सामने खेळला तरीही, ओव्हल येथे झालेल्या पाचव्या कसोटीत सहा धावांनी रोमांचक विजय मिळवून मालिका बरोबरीत आणल्याने भारताचा दृढनिश्चय दिसून आला. कोहली व रोहितसारख्या खेळाडूंशिवायही भारतीय संघाने आव्हान स्वीकारले, असेही युवराज म्हणाला.

हे खूप छान आहे. इंग्लंडमध्ये तरुण संघ जातो व दबावमुक्त खेळतो. युवा खेळाडू हळूहळू कोहली, रोहित शर्मा सारख्या खेळाडूंची जागा घेत आहात, ते सोपे नाही, असेही तो म्हणाला.

युवराजने अष्टपैलू रवींद्र जडेजा व वॉशिंग्टन सुंदरच्या प्रयत्नांचे कौतुक केले. जडेजा व सुंदरच्या भागीदारीमुळे भारताने मॅन्चेस्टरमधील चौथी कसोटी अनिर्णीत राखली.

**तो क्षण कधीही पाहिला नव्हता**

भारताने कसोटी मालिका अनिर्णीत केली, तो क्षणी खूप दिवसांत कधीही पाहिला नाही, वॉशिंग्टन आणि जडेजाने शतके झळकावली आणि कसोटी सामना अनिर्णीत केला, असे युवराज सिंग म्हणाला.जडेजा बऱ्याच काळ पासून संघात आहे. वॉशिंग्टन सुंदर एक तरुण खेळाडू म्हणून संघात येत असताना, त्याने जे केले ते अविश्वसनीय होते, असे युवराज शेवटी म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# ऑलिम्पिक कांस्यपदक विजेते हॉकीपटू डॉ. वेस पेस यांचे निधन

◆ **कोलकाता, १४ ऑगस्ट**

१९७२ च्या म्युनिक ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणारे भारतीय पुरुष हॉकी संघाचे सदस्य आणि दिग्गज टेनिसपटू लियांडर पेसचे वडील डॉ. वेस पेस यांचे गुरुवारी सकाळी वयोमानाशी संबंधित आजारांमुळे निधन झाले. ते ८० वर्षांचे होते.



पार्किन्सन आजाराने ग्रस्त असलेल्या पेस यांना मंगळवारी सकाळी येथील वुडलँड्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यांचे अंतिम संस्कार सोमवार किंवा मंगळवारी केले जातील, कारण कुटुंब त्यांच्या दोन्ही मुलींच्या आगमनाची वाट पाहत आहे. त्या दोन्ही परदेशात स्थायिक आहेत. त्यांचे लग्न भारताच्या बास्केटबॉल संघाच्या माजी कर्णधार जेनिफरशी झाले होते.

भारतीय खेळांशी दीर्घकाळ संबंध ठेवणारा पेस भारतीय हॉकी संघात मिड-फिल्डर होता. त्यांनी विभागीय स्तरावर फुटबॉल, क्रिकेट व रग्बी असे अनेक खेळ खेळले आणि १९९६ ते २००२ पर्यंत भारतीय रग्बी फुटबॉल युनियनचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. एप्रिल १९४५ मध्ये गोव्यात जन्मलेले पेस हे क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात अपवादात्मक होते आणि हॉकीमधील त्यांच्या यशस्वी कारकिर्दीनंतर ते क्रीडा औषध डॉक्टर झाले. त्यांनी आशियाई क्रिकेट परिषद, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि भारतीय डेव्हिस चषक संघासह अनेक क्रीडा संस्थांमध्ये सल्लागार म्हणून काम केले. पेस १९७१ च्या बार्सिलोना येथे झालेल्या विश्वचषकात कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचे सदस्य देखील होते परंतु त्यानंतर एका वर्षानंतर मिळालेले ऑलिम्पिक पदक त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठे क्षण होते. ◀(वृत्तसंस्था)

# ७८ किलोमीटरच्या अल्ट्रा आझादी रनला सुरवात



■ **दोनशे खेळाडूंचा सहभाग, आज सकाळी ६ वाजता पोदार स्कूलजवळ समाप्ती**

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

स्वातंत्रदिनानिमित्त चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशनचा 'रन फॉर नेशन' हा सलग ७८ किमी अल्ट्रा आझादी रन या अनोखा उपक्रम आस गुरुवारी सायंकाळी सिद्धेश्वर वनविहार परिसरातील पोदार स्कूलजवळील पूजा लॉनपासून सुरवात झाली.

देशाला मानवंदना देण्याचा, देश प्रेम आणि फिटनेसबद्दल महत्व वाढवणे हा या रनमागचा प्रमुख उद्देश आहे. अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंघ व महापालिकेचे अतिरिक्त आयुक्र रवी पवार यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. यावेळी क्रेडाईचे अध्यक्ष अभिनव साळुंके, पूजा लॉनचे विशाल पवार, संयोजक आतिश शहा उपस्थित होते. २५, ५० व ७८ किलोमीटरची तीन प्रकारात ही रन सुरू झाली. यात १२० खेळाडू ऑनलाईन व ८० खेळाडू प्रत्यक्षात रनिंग करत आहेत. शुक्रवारी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता या उपक्रमाची समाप्तीही तेथेच होईल. त्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बसे यांच्या हस्ते याचे पारितोषिक वितरण होईल.


# अर्जुन तेंडुलकर-सानिया चांडोकचा साखरपुडा उरकला

◆ **मुंबई, १४ ऑगस्ट**

क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकरचा मुलगा २५ वर्षीय अर्जुन तेंडुलकर याचा एका खाजगी समारंभात सानिया चांडोक हिच्याशी साखरपुडाचा कार्यक्रम उरकला.

या तरुण क्रिकेटपटूने आपल्या वैयक्तिक आयुष्यात मोठे पाऊल उचलल्याची बातमी समोर आल्यानंतर समाजमाध्यमावर जोरदार चर्चा सुरू झाली. तथापि, अर्जुन व सानिया चांडोक यांच्या कुटुंबियांकडून अद्याप कोणतेही अधिकृत दुजोरा मिळाला नाही.

सानिया चांडोक ही मुंबईतील उद्योगपती गौरव घई यांची कन्या व आदरातिथ्य, फ्रोझन फूड आणि रिअल इस्टेट समूह असलेल्या ग्रॅव्हिस ग्रुपचे प्रमुख रवी घई यांची नात आहे. सानिया ही २०२२ पासून मुंबई येथे स्थित मिस्टर पॉज पेट स्पा अँड स्टोअर एलएलपी चालवते, असे वृत्त आहे.



अर्जुन सध्या मुंबईहून स्थलांतरित झाल्यानंतर गोव्याकडून स्थानिक क्रिकेटमध्ये खेळतो. तो इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये मुंबई इंडियन्स संघाचाही भाग आहे. १७ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये अर्जुनने ३७ बळींची टिपले आणि ५३२ धावा केल्या आहेत, यात एक शतक व दोन अर्धशतकांचा समावेश आहे. आयपीएलमध्ये त्याने पाच सामन्यांमध्ये ९.३६ च्या इकॉनॉमीने तीन बळींची नोंद केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# रेल्वेच्या ऋतिका श्रीराम व ईशा वाघमोडेस सुवर्ण

■ **राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धा : ईशासह आदित्य गिराम, ओम अवस्थी कांस्यचे मानकरी**

**सोलापूर, दि.१४ ऑगस्ट-**

अहमदाबाद गुजरात येथे सुरू असलेल्या ७८व्या वरिष्ठ राष्ट्रीय जलतरण स्पर्धेतील डायव्हिंग प्रकारात गुरुवारी भारतीय रेल्वेच्या ऋतिका श्रीराम (पश्चिम रेल्वे) व ईशा वाघमोडे (मध्य रेल्वे) यांनी हायबोर्ड सिंक्रोनायझेशन डायव्हिंगमध्ये सुवर्ण पदक पटकाविले. बुधवारी ऋतिकाने सुवर्णसह रौप्य तर ईशाने सुवर्णसह एका कांस्य पदकाचीही कमाई केली आहे. मध्य रेल्वे सोलापूर विभागात कार्यरत



सुवर्णपदक विजेत्या ऋतिका श्रीराम व ईशा वाघमोडे

असलेले आदित्य गिराम, ओम अवस्थी आणि ईशा वाघमोडे यांनीही बुधवारी डायव्हिंग प्रकारात ३ कांस्य पदके जिंकली आहेत. आदित्य आणि ओम यांनी पुरुषांच्या हायबोर्ड सिंक्रोनायझेशन डायव्हिंगमध्ये तर ईशा हिने ३ मीटर स्प्रिंगबोर्ड डायव्हिंगमध्ये ही कामगिरी केली. आदित्य, ओम व ईशा यांना माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू व मध्य रेल्वेचे प्रशिक्षक हरीश अन्नलदास यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मध्य रेल्वे सोलापूरचे विभागीय व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा व विभागीय क्रीडा अधिकारी आदित्य त्रिपाठी यांनी अभिनंदन केले.

### वंशिका चुंगीवडियारची सहा पदकांची कमाई



केंद्रीय विद्यालयाच्या वंशिका चुंगीवडियार हिने ४ सुवर्ण व २ कांस्यपदकांची कमाई केली. वंशिकाने सतरा वर्षाखालील वयोगटात हायबोर्ड, एक व तीन मीटर स्प्रिंग बोर्ड अशी ३ सुवर्ण पदके पटकाविली. तसेच सबज्युनियर गटात एक सुवर्ण व दोन कास्य पदके मिळविली. वंशिकाला आंतरराष्ट्रीय जलतरण प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे मुख्याध्यापक उमाकांत जोशी, क्रीडा शिक्षक अखिल शेख व अतीक शेख यांनी अभिनंदन केले.



अहमदाबाद : मध्य रेल्वे सोलापूरचे पदकप्राप्त आदित्य गिराम, ओम अवस्थी व ईशा वाघमोडे यांच्यासमवेत रेल्वेचे प्रशिक्षक हरीश अन्नलदास.



# फॅबटेक पब्लिक स्कूल तालुका व्हॉलिबॉल स्पर्धेत विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ ऑगस्ट -**

स्व.आ.डॉ.भाई गणपतराव देशमुख यांच्या ९८व्या जयंतीनिमित्त चिंचोली (ता.सांगोला) येथे आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षे मुले तालुका पासिंग व्हॉलिबॉल स्पर्धेत फॅब्टेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सांगोलाने विजेतेपद पटकाविले. संघातील विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक पंचाक्षरी स्वामी, आरिफ तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल फॅब्टेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, स्कूलच्या सीईओ सारिका रूपनर, प्राचार्य सिकंदर पाटील यांनी संघातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# व्हिन्सेंट कीमर चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स विजेता

**चेन्नई :** जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरने चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स २०२५ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. त्याने गुरुवारी आठव्या फेरीत नेदरलॅण्डचा ग्रॅण्डमास्टर जॉर्डन व्हॅन फॉरेस्टला बरोबरीत रोखून विजेतेपदावर आपले नाव कोरले. तणावपूर्ण शेवटच्या डावामध्ये कीमर पराभवापासून एक चूक दूर होता, त्यामुळे शुक्रवारी अंतिम फेरीसाठी जेतेपदाची शर्यत जिवंत राहिली असती. परंतु त्याने बरोबरी मिळवण्यासाठी आपली हिंमत रोखली. स्पर्धेत अपराजित राहून त्याने गुणतालिकेत आपली १.५ गुणांची आघाडी कायम ठेवली.

# मानस, सृष्टी, श्रेयस, सान्वी, नियान व उत्कर्षा विजेते

## स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे स्मृती चषक' जिल्हा अजिंक्यपद व निवड बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

'स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे' यांच्या ८८व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या १९ वर्षाखालील जिल्हास्तरीय निवड व अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत मुलांच्या गटात अग्रमानांकीत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस गायकवाड व सृष्टी गायकवाड या बंधू भगिनींनी विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. मानसने सहा पैकी सहा गुण तर सृष्टीने चार पैकी चार गुण मिळविले. तसेच श्रेयस कुदळे, सान्वी गोरे, नियान कंदीकटला, उत्कर्षा लोखंडे यांनी अनुक्रमे १३ व ९ वर्षाखालील गटात जेतेपद पटकाविले.

राज मेमोरियल इंग्लिश स्कूल व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने सुशील रसिक सभागृहात संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ डॉक्टर सूर्यप्रकाश कोठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा, आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना प्रत्येकी एक हजार रुपये रक्कम देण्यात येणार असून विजेत्या खेळाडूंना



### उत्तेजनार्थ: राज मेमोरियल इंग्लिश स्कूलकरिता (गट, अनुक्रमे १ ते २ क्रमांक, खेळाडूंचे नाव)

**१९ वर्षे मुले :** निखिल पवार,साईराज पवार. **मुली:** दिशा बरगजे,समृद्धी शिंदे.
**१३ वर्षे मुले:** सोहम सुरवसे,रियांश जवळकर. **मुली:** संस्कृती आडके.
**९ वर्षे मुले:** रुद्र गोमदे,श्रवण मासाळ. **मुली:** आर्या डांगे, शिवन्या चव्हाण

आकर्षक चषक व मेडल्स मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत मुख्य पंच म्हणून वरिष्ठ राष्टीय पंच उदय वगरे तर त्यांना सहाय्यक म्हणून रोहिणी तुम्मा, प्रशांत पिसे, जयश्री कोंडा, यश इंगळे, प्रज्वल कोरे, पद्मजा घोडके, श्रीराम घोडके यांनी यशस्वीरीत्या काम पाहिले.

नांदेड येथे होणाऱ्या १९ वर्षाखालील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मुलांच्या गटात मानस गायकवाड, सानिध्य जमादार, आरुष कंदले, हर्ष हलमल्ली तर मुलींच्या गटात सृष्टी गायकवाड, श्रेया संदुपटला, स्वराली हातवळणे, श्रावणी देवनपल्ली यांची तसेच कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी मुलांच्या गटात श्रेयस कुदळे व ओम राऊत तर मुलींच्या गटात सान्वी गोरे व पृथा ठोंबरे यांची निवड झालेली आहे. राज मेमोरियल इंग्लिश स्कूल मधील उत्कृष्ट खेळाडू, अंध खेळाडू योगीराज धनवे तसेच शेटे वस्ती येथील जिल्हा परिषद शाळेस उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

स्पर्धा यशस्वितेसाठी डॉ. राधिकाताई चिलका, आ. देवेंद्र दादा कोठे, प्रथमेश दादा कोठे, प्रा. विलास बेत, यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.

**अंतिम निकाल: (अनुक्रमे १ ते १० क्रमांक, नाव व बोकोल्स गुणांसह)**

**१९ वर्षे मुले:** मानस गायकवाड-६, सानिध्य जमादार-५ (१५.५),आरुष कंदले ५ (१५),हर्ष हलमल्ली- ४.५ (१७.५), प्रसन्न जगदाळे-४.५ (१७.५), विठ्ठल येलदी-४.५ (१६.५), जय अनेराव-४(१८),वेद आगरकर-४(१६.५),प्रतीक नामदे-४ (१६),नरसिंमा सिंग्रल-४(११) **मुली:** सृष्टी गायकवाड-४, श्रेया संदुपटला-३ (११), स्वराली हातवळणे-३ (७), श्रावणी देवनपल्ली-३(५), वैष्णवी येलदी-३(३.५), वेदिका घोळवे-२(७),फराह शेख-२(६), जयश्री कुबडे-२(४.५), दूर्वा महिंद्रकर-२(३.५), फिजा शेख-२(३.५).

**१३ वर्षे मुले:** श्रेयस कुदळे -७, ओम राऊत- ६(२४.५), साईराज घोडके - ६(२३.५), वेदांत मुसळे-६(२३.५), हर्ष जाधव- ५(२५.५), सार्थक राऊत-५(२४), देवदत्त पटवर्धन-५(२३.५),आयुष जानगवळी- ५(२३), श्रीराम राऊत- ५(२२.५), जय तुम्मा-५(२२.५) **मुली:** सान्वी गोरे-४.५, पृथा ठोंबरे-४(१५.५), संस्कृती जाधव-४(१४), अनन्या उलभगत-४(९.५), सृष्टी मुसळे-३.५, सिद्धी देशमुख-३(१६.५), प्रतीक्षा चाबुकस्वार- ३(१२), दूर्वा नवले- ३(११), तेजल चीलगुंडे-३(११), आदिती इनानी - ३(७.५).

**९ वर्षे मुले:** नियान कंदीकटला - ५.५(१९), प्रथम मुदगी - ५.५(१७.५), हिमांशू व्हनगावडे -५(१९.५), प्रज्ञांश काबरा- ५(१४.५), अथर्व दनाने- ४.५(२१.५), मयूर स्वामी-४.५(१६), विवेक स्वामी- ४(१९), हर्ष मुसळे४(१७), रत्नेश घाणेगावकर-४(१६), स्वराज हंचाटे ४ (१५.५) **मुली:** उत्कर्षा लोखंडे- ४, ईशा पटवर्धन-३.५, श्रेया पैकेकरी- ३(४), हर्षा शिरसागर- ३(३), अन्वी बिटला- २.५, समृद्धी कसबे- २(७.५),ईशा केकडे-२ (४.५), राई लोहार- २(४), तन्वी हरके- १(७), तन्वी बागेवाडी- १(५)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये डॉ. रंगनाथन जयंती साजरी

**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये ग्रंथालय दिनानिमित्त प्रसिद्ध ग्रंथपाल डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.रंगनाथन यांच्या प्रतिमेला संस्थेच्या सचिवांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी कॉलेजचे प्राचार्य यांनी मनोगतात डॉ. रंगनाथन यांनी 'ग्रंथालय विज्ञानाचे पाच नियम' तयार करून ग्रंथालय क्षेत्राला एक नवी दिशा दिली. त्यांचे कार्य आजही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### घोंगडे परिवारातर्फे विद्यार्थ्यांना वही वाटप

**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

शहरातील ज्येष्ठ विधीज्ञ उदयबापू घोंगडे व प्रतिष्ठित व्यापारी आनंदकाका घोंगडे यांच्यावतीने सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना कै.प्रणव घोंगडे यांचे स्मरणार्थ वही वाटप करण्यात आले. यावेळी सुमारे ५०० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. याप्रसंगी उद्योगपती अजिंक्य घोंगडे यांचेसह सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे, नरेंद्र होनराव उपस्थित होते.



### शैक्षणिक स्पर्धा तीव्र असल्याने प्रयत्न केल्यास यश नक्की : शांभवी कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. १४ ऑगस्ट-**

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात जगामध्ये झपाट्याने बदल होत आहेत, नवनवीन शोध लागत आहेत, शैक्षणिक स्पर्धा देखील खुप तीव्र झालेली आहे, त्यासाठी कठोर परिश्रम करून ध्येय साध्य करण्यासाठी अभ्यासपूर्वक वाटचाल केल्यास यश निश्चित मिळेल असे प्रतिपादन संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले. सौ. सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता अकरावीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. यावेळी व्यासपीठावर सचिव मल्लिकार्जुन मसुती, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, जूनियर कॉलेजचे प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी व प्रा. सौरभ भस्मे उपस्थित होते. यावेळी यश प्राप्तीस सक्षम होण्यासाठी मन, मनगट आणि मेंदू बळकट करण्याचे आवाहन प्रा. भस्मे यांनी केले. मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांचेही भाषण झाले. प्रतीक्षा सोलंकर यांनी प्रस्ताविक केले. सुकन्या स्वामी यांनी सूत्रसंचलन केले. श्रद्धा त्रिगुळे यांनी आभार मानले. प्रा. गुरुशांत हपाळे, सलोनी शहा, सविता स्वामी, शितल फुटाणे, शितल टिंगरे, मधुबाला लोणारी, जनाबाई चौधरी, शिल्पा धूमशेट्टी, शिवकुमार मटदेवरू यांनी प्रयत्न केले.

### एसटीच्या विभागीय कार्यालयात १४ चालकांचा आज सपत्नीक सत्कार

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

स्वातंत्रदिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी म हाराष्ट्र राज्य परिवहनचे विभागीय कार्यालयात सकाळी ११ वाजता राप चालकांचा विशेष गौरव समारंभ आयोजित करण्यात आला असल्याची माहिती विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी दिली. राप चालकांनी २५ वर्ष विना अपघात सेवा बजावलेली आहे, या गौरवपास्पद काम गिरीबद्दल सदर चालकांचा सपत्नीक सत्कार करण्यात येणार आहे. सोलापूर विभागात१४ चालकांचा सत्कार समारंभ करण्यात येणार आहे. यामध्ये सोहळ्यात राप चालकाला सन्मानचिन्ह, २५ वर्षे विनाअपघात सेवा केल्याबद्दलचा बॅच, रोख रुपये २५,००० तसेच त्यांच्या पत्नीस साडी- चोळी देऊन सत्कार करणार असल्याचे गोंजारी यांनी सांगितले.



### सांगोला नगर परिषदेतर्फे आज पालखी सोहळ्याचे आयोजन

**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे सन २०२५ हे वर्ष सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्ष आहे. गोकुळ आष्टमी दि.१५ ऑगस्ट रोजी संतश्रेष्ठ श्री ज्ञानदेवांची ७५० वी जयंती आहे. त्यानुषंगाने सांगोला नगरपरिषदेकडून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा/मुर्ती पालखीतून मिरवणूक काढून हा उत्सव साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त शहरातील सर्व हरिभक्त पारायण महाराज, भजनी मंडळ, सर्व सेवाभावी संस्था, वारकरी संप्रदाय मंडळी, नागरिक यांचेसह शहरातून दि.१५ ऑगस्ट रोजी टाळ मृदंगाच्या घोषात भजन व हरिनाम जप घेत दिंडी निघणार आहे. सदर दिंडी नगरपरिषद कार्यालय येथून सायं.४ वा. निघणार आहे. तरी सदर दिंडीमध्ये सर्व नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे.

# पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज फडकलेली ऐतिहासिक वास्तू विद्युत रोषणाईने उजळली

- रंगरंगोटी आणि स्वच्छतेमुळे परिसर झाला
- फोटो काढण्यासाठी नवी पेठेत नागरिकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ ऑगस्ट-**

पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज फडकलेल्या ऐतिहासिक अशा नवी पेठेतील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाची हेरिटेज इमारत तिरंगा विद्युत रोषणाईने उजळली. रंगरंगोटी आणि स्वच्छता कामांमुळे हा परिसर चकाचक आणि मनोहारी झाला आहे. म हापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह अधिकाऱ्यांनी यासाठी तत्परता दाखवली.




स्वातंत्र्यलढ्याचा क्रांतिकारी इतिहास असलेल्या या प्रेरणादायी इमारतीसमोर फोटो काढण्यासाठी अनेकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. जुन्या नगरपालिकेची ही ऐतिहासिक इमारत आहे. ही वास्तू स्वातंत्र्यलढ्याची साक्ष देणारी ही इमारत आहे. मे १९३० मध्ये पारतंत्र्यातही तिरंगा ध्वज डौलाने फडकविण्यात आला होता. दि. ६ एप्रिल १९३० रोजी सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा असा ठराव करण्यात आला. त्यानुसार देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. पारतंत्र्यातही दि. ९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी स्वातंत्र्य उपभोगले. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शल लॉ पुकारला. मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर उभारण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरावे असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले मात्र त्याला न जुमानता सभासदांनी सर्वानुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मी मागे घेऊ शकत नाही असे बाणेदार उत्तर देऊन निशाण उतरवण्यास तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी स्पष्ट नकार दिला. त्याबद्दल त्यांना कारावास आणि दंडाची शिक्षा भोगावी लागली असा हा क्रांतिकारी इतिहास या ऐतिहासिक वास्तूचा आहे.आजही ही वास्तू सर्वांना प्रेरणा देत आहे. महापालिका विद्युत विभागाचे अभियंता महादेव इंगळे यांच्या माध्यमातून दरवर्षी आता ही तिरंगा विद्युत रोषणाई करण्यात येते. दरम्यान, केंद्र शासनाच्या आदेशानुसार महापालिकेच्या वतीने दि. १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान उत्साही वातावरणात राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने नवी पेठेतील ही ऐतिहासिक वास्तू यंदाही विद्युत रोषणाईने उजळली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने या परिसरात आवश्यक ती कामे करण्यासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधित विभागांना आदेश दिले होते. अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. दरम्यान, झोन क्रमांक एकचे सहाय्यक अभियंता प्रकाश सावंत यांनी तत्काळ या ऐतिहासिक इमारत परिसराची पाहणी करून इमारतीच्या दर्शनी भागात रंग रंगोटी करणे तसेच कंपाउंड आणि मुख्य प्रवेशद्वाराला रंग देणे याबाबत तातडीने संबंधित मक्तेदाराला सुचित केले अवघ्या तीन दिवसात हा इमारत परिसर रंगोटी आणि स्वच्छतेने चकाचक करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी या परिसराची स्वच्छता करण्यासंदर्भात संबंधित विभागाला सूचना दिल्या. परिसरात स्वच्छता करून या ठिकाणी डीडीटी पावडरही टाकण्यात आली. उपायुक्त तैमूर मुलानी यांनी उद्यान विभागाला सूचना देऊन येतील झाडी आणि गवत काढण्यास सांगितले. उद्यान अधीक्षक आशिष जाधव यांनी तत्परता दाखवून हायड्रोलिक मशीन पाठवून इमारतीवरील वाढलेली झाडे काढून घेतली.महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या मुख्य लिपिक माहेजबीन शेख , कर्मचारी भालचंद्र साखरे यांनीही यासाठी पाठपुरावा केला. विद्युत विभागाचे अभियंता महादेव इंगळे यांनी तीन दिवस अगोदरच तिरंगा विद्युत रोषणाई करून घेतली. महापालिका डीएस विभागाचे प्रमुख संदीप कुर्डे यांनी या परिसरातील नेटकेपणासाठी सहकार्य केले. एकूणच सर्व अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवल्याने ही ऐतिहासिक इमारत अधिक मनोहारी दिसत आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने या ऐतिहासिक वास्तूची शान आणि मान राखली. मनोहारी विद्युत रोषणाईमुळे ही वास्तू अधिकच आकर्षक अशी दिसत आहे. यामुळे नवी पेठ येथील या वास्तूसमोर अनेकांनी आपल्या मोबाईल मधून फोटो तसेच सेल्फी काढले. त्यासाठी लोकांची मोठी गर्दी दिसून आली.

## बार्शीत आज तिरंगा रॅलीचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत राबवण्यात येत असलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात बार्शी तहसील कार्यालयाच्या वतीने आज सकाळी ११ वाजता शहरात भव्य तिरंगा मोटारसायकल रॅली काढण्यात आली.

तहसीलदार एफ.आर. शेख यांच्या हस्ते तहसील कार्यालयापासून रॅलीचा शुभारंभ झाला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, शहर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्यासह महसूल, पोलिस, नगरपालिका, आरोग्य, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, भूमी अभिलेख, सहकारी संस्था, विद्युत, क्रिडा, राज्य उत्पादन शुल्क, रेशीम, पोस्ट, वैद्यकीय, उपकोषागार, मंडळ अधिकारी, कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, पोलिस पाटील, ग्राम पंचायत अधिकारी, महसूल सेवक, रास्तभाव दुकानदार आदी शासकीय विभागांचे प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले. महिलाही उत्साहाने सामील झाल्या.

रॅली तहसील कार्यालयापासून निघून कोर्ट चौक, एकविराई चौक, भगवंत मंदिर, महाद्वार चौक, जुनी चाटे गल्ली, सावरकर चौक, ऐनापुर मारुती चौक, शाहीर अमर शेख चौक (जुने पोलिस स्टेशन), पटेल चौक, पांडे चौक मार्गे शिवसृष्टी येथे समारोप झाली. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. हे अभियान २ ते १५ ऑगस्ट या कालावधीत देशभर राबवले जात असून, तिसऱ्या टप्प्यात (१३ ते १५ ऑगस्ट) प्रत्येक घरावर तिरंगा फडकवण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. शासनाच्या परिपत्रक आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या व्हिडिओ कॉन्फरन्स निर्देशानुसार ही रॅली आयोजित करण्यात आली. यामुळे नागरिकांमध्ये देशभक्तीची जागृती होण्यास मदत झाली.



## बार्शी बसस्थानकात रिक्षांचा सुळसुळाट; कारवाईची संयुक्त मोहिम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

बार्शी आगारातील बस स्थानक परिसरात रिक्षांचा वाढता प्रादुर्भाव प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत असून, प्रवासी तक्रारी वाढत होत्या.

या संदर्भात आगार प्रशासनाने पत्राद्वारे बार्शी शहर पोलीस स्टेशनला माहिती दिल्यानंतर आज स्थानक परिसरात बार्शी शहर पोलीस वाहतूक शाखा व आगर प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने मोहीम राबवण्यात आली. मोहिमेदरम्यान आगार प्रमुख मधुरा जाधवर व वाहतूक शाखेचे पीएसआय महेश गळगटे यांनी सर्व रिक्षा चालकांना एकत्र करुन सूचना दिल्या.

बस स्थानक परिसरात अवैधरित्या रिक्षा न घालण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी वाहतूक शाखेचे हेड कॉन्स्टेबल अडसूळ, बार्शी आगाराचे स्थानक प्रमुख हांडे व वाहतूक नियंत्रक बोराडे उपस्थित होते.

## मंगळवेढ्यात बेदरकार वाहन चालवले; चालकाविरुद्ध गुन्हा

**मंगळवेढा, दि.१४ ऑगस्ट**

मंगळवेढा शहरात अतिवेगाने व निष्काळजीपणे ट्रक चालवून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी गणेश विलास मोरे (वय ३८ रा.वडवळ ता.मोहोळ) याच्याविरूद्ध मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.


पोलिसांच्या माहितीनुसार फिर्यादी तथा पोलिस अंमलदार सुरज साळुंखे यांच्यासह वाहतुक शाखेचे पोलिस हवालदार संभाजी यादव, पोलिस अंम लदार साळुंखे आदि मंगळवेढा शहरात पेट्रोलिंग करीत असताना दि.१४ ऑगस्ट रोजी सकाळी आरोपी गणेश मोरे याने आपल्या ताब्यातील १४ टायर ट्रक (एम.एच.१३ डी.क्यू.५२५६) बेदरकारपणे चालवून लोकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याने सदर चालकाविरूद्ध पोलिसानी गुन्हा नोंदवला आहे. दरम्यान मंगळवेढा शहरात अपघाताचे प्रमाण वाढत चालल्याने पोलिस प्रशासनाने मरवडे रोड व पंढरपूर रोड येथे अवजड वाहनास शहरात प्रवेश बंदचा फलक लावला आहे. वाहन चालक या फलकाकडे दुर्लक्ष करून थेट शहरात वाहने घेवून येत आहेत. या घटनांना आवर घालण्यासाठी पोलिसांनी कारवाईची मोहिम सुरू केली असून यापुढे अवजड वाहन शहरात आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## भूमच्या रुग्णावर सोलापुरात प्रथमच क्लिष्ट शस्त्रक्रिया

### डॉ. विजय अंधारे यांचे प्रयत्न यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१४ ऑगस्ट-**

हृदयविकाराचा झटका आल्याने एक रुग्ण बार्शीच्या डॉ. संजय अंधारे यांच्या सुश्रुत हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. त्याचा रक्तदाब फक्त साठवरच होता. तो रुग्ण अर्धवट शुद्धीवर होता. हृदयाचे स्कॅनिंग केल्यानंतर दिसून आले की, हृदयाभोवती रक्ताच्या गाठी जमा झालेल्या आणि हृदयाच्या कप्प्या वर त्याचा दाब वाढत चाललेला होता. ईसीजीतून दिसले की, हृदयविकाराचा झटका अतिशय तीव्र होता. अशा अवस्थेतील रुग्णाला सोलापूरच्या मार्कंडेय सहकारी रुग्णालयात हलविण्यात आले आणि मला तातडीने फोन आला डॉ. सय्यद यांच्या कार्डिओलॉजिस्टच्या मदतीने सर्व तपासण्या करुन घेतल्या हृदयविकाराच्या आघाताने हृदयाला इजा होऊन एक भाग फाटून



रक्तस्त्राव झालेला होता. वाचण्याच्या एक टक्का जरी शक्य असले तर प्रयत्न करुया... या अटीवर रुग्णाला लगेच ऑपरेशन थेटरमध्ये घेतले छातीचे हाड कट करुन हृदय ओपन केले. हृदयाच्या वर आवरण असते ते कट केल्यानंतर जवळपास एक लिटर रक्त बाहेर आले होते.

**रुग्ण जगण्याची शक्यता शून्य टक्के**

हृदय फुटले तर रुग्ण जगण्याची शक्यता शून्य टक्के असू शकते. हृदयाला पडलेले छिद्र व होणारा रक्तस्त्राव बंद करण्याचा प्रयत्न केला तर सर्व टाके तुटून जातात. स्नायू आणखी डॅमेज होतात. हृदय अजून फाटत जाते आणि पेशंटचा ऑपरेशन थिएटरम ध्ये टेबलवरच मृत्यू होण्याची शक्यता असते.

**दोन तास चालली ओपन हार्ट सर्जरी**

दोन तास चालली ओपन हार्ट सर्जरी ट्रिपल पॅच टेक्निकचा वापर करुन छिद्र बंद केले. ज्या बाजूने रक्तस्त्राव सुरु होता तेथे बायो ग्लू आणि ट्रिपल पॅचचे तंत्र वापरुन हृदयावरच्या आवरणाचा एक पॅच बनवला. पीटीएफ नावाच्या मटेरियलचा एक पेज घेऊन छिद्र बंद केले. त्या छिद्राच्या आजूबाजूच्या हृदयाचा जो भाग खराब झाला त्याला पॅच आणि ग्लूने सपोर्ट दिला. हृदयाच्या आजूबाजूचे सर्व रक्त बाहेर काढले. परत रक्त जमले तर बाहेर यावे म्हणून छातीमध्ये नळ्या ठेवल्या त्यानंतर छातीचे हाड बंद केले. ही ओपन हार्ट सर्जरी जवळपास दोन तास चालली. त्यानंतरचे पहिले सहा तास रुग्ण अत्यावस्थेत होता. हृदयाचे ठोके चुकत होते. त्यामुळे पेसमेकर ही लावले. २४ तासानंतर रुग्णाची अवस्था सुधारु लागली त्यानंतरच्या पुढील सात दिवसात पूर्ण बरा झाला.

## वृक्ष लागवडीसाठी आ.आवताडेंनी घेतली अधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर तालुक्यात वृक्ष लागवड करण्याबाबत पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघाचे विधानसभा सदस समाधान आवताडे यांनी पंढरपूर तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालय प्रमुख यांची बैठक तहसील कार्यालय पंढरपूर येथे घेतली.



पंढरपूर तालुक्यातील शासकीय कार्यालयानी स्वयं स्फूर्तीने वृक्ष लागवड करावी तसेच वृक्षांची जोपासना करावी. वृक्ष लागवडी साठी सामाजिक वनिकरण विभाग पंढरपूर यांच्यामार्फत मार्फत रोपे पुरविण्यात येणार आहेत तसेच ट्रीगार्डची आवश्यकता भासल्यास सामाजिक संस्था अथवा CSR फंड मधून देण्यात येतील असे सूचित केले व उपक्रमांतर्गत सर्व शासकीय कार्यालयाने पंढरपूर तालुका व शहर परिसरात ५० हजार झाडे लावून एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे बाबत आमदार आवताडे यांनी निर्देश दिले. यानुसार सर्व विभाग प्रमुख यांनी रिकाम्या शासकीय जागा, रस्त्याच्या दुतर्फा, तलाव-ओढा परिसर, इरिगेशेन कॅनॉल पट्टी, शायकीय कार्यालय परिसर इत्यादी ठिकाणी वृक्षा रोपण करण्याचे नियोजन व आश्वासन आमदार आवताडे यांना दिले.

या बैठकीसाठी सचिन इथापे उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर व सचिन लंगुटे तहसीलदार पंढरपूर सुशील संसारे गटविकास अधिकारी पंचायत समिती पंढरपूर,श्रीमती पूजा अवताडे तालुका भूमि अभिलेख कार्यालय पंढरपूर, विजय पाटील कार्यकारी अभियंता म हावितरण पंढरपूर श्री बी एम मिटकरी उपकार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर, विशाल माने कार्यकारी अभियंता उजनी कालवा विभाग पंढरपूर श्रीमती शीतल साठे वनपरिक्षेत्र अधिकारी पंढरपूर, टी. वाय. मुजावर पोलीस निरीक्षक पंढरपूर तालुका पोलीस ठाणे श्रीमती रेखा घनवट पोलीस निरीक्षक पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे, सूर्यकांत मोरे तालुका कृषी अधिकारी पंढरपूर, श्रीमती सुवर्णा हाके प्रशासन अधिकारी नगरपरिषद पंढरपूर, राहुल चव्हाण बाल विकास प्रकल्प अधिकारी पंढरपूर, पि.के. डोके उपविभागीय जलसंधारणा अधिकारी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग पंढरपूर, मोरे गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

## रविवारी सरश्री यांच्या छोटे यकीन का बडा जादू कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ ऑगस्ट-**

तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक सरश्री यांना प्रत्यक्ष ऐकण्याची संधी १७ ऑगस्ट रोजी दुपारी २ वा. मनन आश्रम, सिंहगड रोड येथे मिळणार आहे. छोटे यकीन का बडा जादू हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम संपूर्णपणे विनामूल्य असून या कार्यक्रमात स्वतःच स्वतःला हील किंवा स्वस्थ करण्याचे ४ मार्ग सरश्री उलगडून सांगणार आहेत.



या व्यतिरिक्त लहान लहान विश्वासही आपल्या आयुष्यात मोठे परिवर्तन कसे आणतात. आपल्या अंतरंगात असलेली शक्ती सक्रिय कशी करावी, वर्क लाईफ बॅलन्स कसा साधावा, भय आणि कुशंका यावर मात कशी करावी. त्याचबरोबर इनर पीस किंवा आत्मिक शांतीसाठी आपल्या विचारांना री-प्रोग्रॅम कसे करावे इत्यादी विषयांवरदेखील सरश्री मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमात भाग घेतल्यानंतर जीवनाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन प्राप्त होऊ शकेल. जास्तीत जास्त लोकांनी, विशेषतः युवा वर्गाने यात भाग घेऊन आयुष्यात सकारात्मक परिवर्तन आणावे, असे आवाहन तेजज्ञान फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सुट्टीच्या दिवशीही जिल्हा परिषद कार्यालय राहणार सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा मंगळवार १९ ऑगस्ट ते गुरुवार, २१ ऑगस्ट या कालावधीत सोलापूर जिल्ह्याचा दौरा निश्चित आहे.

या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर दिनांक १५ ऑगस्ट ते दिनांक १७ ऑगस्ट या शासकीय सुट्टी कालावधीत खातेप्रमुख व गट विकास अधिकारी यांनी दौऱ्यावर जाऊ नये तसेच सदर दिवशी मुख्यालय सोडू नये, अशा सूचना जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सर्व खातेप्रमुख, गट विकास अधिकारी यांना केला आहे.


या दौऱ्याच्या तपासणीसाठी अद्ययावत माहिती तयार करणे तसेच पूर्वतयारी करण्यासाठी तसेच १५० दिवस कार्यक्रमांतर्गत काम काज पूर्ण करण्यासाठी १५ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या शासकीय सुट्टी कालावधीत जिल्हा परिषद मुख्यालय व पंचायत समिती अंतर्गत सर्व कार्यालये नेहमीप्रमाणे चालू ठेवण्यात यावीत. या दिवशी कार्यालयातील सर्व अधिकारी-कर्मचारी उपस्थित राहतील याची सर्व खातेप्रमुख व गट विकास अधिकारी यांनी उपस्थित राहण्याच्या सूचना सीईओ जंगम यांनी दिला आहे.शुक्रवार स्वातंत्रदिवस तसेच शनिवार व रविवार असे तीन दिवस शासकीय सुट्टी असल्याने अधिकाऱ्यांनी तीन दिवस पर्यटनस्थळ व देवदर्शन दौरा निश्चित केला होता. मात्र विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा दौरा व १५० दिवसांच्या कार्यक्रमामुळे तीन दिवसाची सुट्टी मिळणार नसल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांचा हिरमोड झाला आहे.

## मंदिराजवळ बसायचे नाही म्हणून मारहाण

**सोलापूर :** यलम्मा देवी मंदीराजवळ बसायचे नाही म्हणून लाकडाने मारहाण तरुणीला जखमी केले. ही मारहाण उत्तर सोलापूर तालुक्यातील गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली. शैलेजा विष्णु जावीर (वय २०, रा. डोणगाव ता उ सोलापूर) असे मारहाण केलेल्या तरुणाचे नाव आहे. शैलेजा ही तरुणी गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास यलम्मा मंदिराजवळ असताना, मंदिराजवळ बसायचे नाही असे म्हणून पिंटू ठोकळेने मारहाण केली.














CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये कृष्ण जन्माष्टमी साजरी

**सोलापूर, दि.१४ ऑगस्ट-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये कृष्ण जन्माष्टमी साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांच्या पारंपारिक वेशभूषेत हजेरी लावून कार्यक्रमाला रंगत आणली.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका रेखा पाटील यांच्या हस्ते भगवान श्रीकृष्ण पूजनाने झाली. विश्वशांती प्रार्थना व भक्तीगीतांच्या गजरात परिसर आध्यात्मिकतेने न्हाऊन निघाला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका आणि भजनांच्या माध्यमातून श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेलादहीहंडी उपक्रमाने संपूर्ण वातावरणात जल्लोष निर्माण केला.





# अतिवृष्टीने बाधीत शेतीच्या पंचनाम्याची मागणी

● हिप्परगा तलाव परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान ● तुळजापूर तालुक्यातील अनेक गावांचे पाणी येते तलावात ● तलाव ओव्हरफ्लो झाल्याने सोलापूर शहरातही शिरले पाणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

गेल्या आठवड्यापासून सोलापूर जिल्ह्यासह आसपासच्या जिल्ह्यातही मुसळधार पाऊस पडू लागल्याने नदी-नाले, विहिरी, तलाव ओसंडून वाहत आहेत. सोलापूर शहराजवळीच मोठा हिप्परगा तलावही असाच ओसंडून वाहू लागल्याने याच्या सांडव्यातून सोडण्यात आलेले पाणी थेट सोलापूर शहरातील काही नगरात घुसत असल्याने अनेकांच्या घराभोवती पाण्याचे तळे दिसू लागले आहे. इतकेच नाहीतर जुना पुणे नाक्यावरील वाहतुकीचा मार्गही या पाण्यामुळे बंद झाला आहे. अनेक शेतकऱ्यांचे उभे पीक पाण्याखाली गेले असून, याचे गतीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी द्यावेत, अशी अपेक्षा शेतकरी बांधवांची आहे.

हिप्परगा तलाव परिसरातील अनेक गावे आणि तुळजापूर तालुक्यातील काही गावात मंगळवारी आणि बुधवारी पडलेल्या मुसळधार पावसाने आलेल्या विविध ओढ्यांच्या पुराचे पाणी थेट हिप्परगा तलावात धडकत आहे. उळेगाव, तामलवाडी, काटगाव, माळुंब्रा, देवकुरळी, होनसळ, मार्डी, राळेरास, सुरतगाव, सांगवी काटी, पिंपळा खु., पिंपळा बु., खडकी, खानापूर आदी विविध ठिकाणच्या लहान-मोठ्या ओढ्यांचे पाणी थेट हिप्परगा तलावात येत असल्याने हा तलाव गेल्या २ दिवसांपासूनच ओव्हरफ्लो झालेला आहे. यामुळे जलसंपदा विभागाकडून या तलावातील पाणी मोठ्या प्रमाणात विसर्ग करण्यात येत आहे. या सोडलेल्या पाण्यामुळे सोलापूर येथील जुना पुना नाका, यशनगर, अवंतीनगर, वसंत विहार व इतर काही छोट्या-मोठ्या नगरात आणि वस्त्यांमध्ये हे पाणी घुसले आहे. यामुळे मंगळवारी रात्रभर या भागातील अनेक रहिवासी जागेच होते. भरीस भर म्हणून शेळगीच्या ओढ्यालाही मोठा पूर आल्याने तेही पाणी यामध्येच मिसळले.

यामुळे अनेकांच्या घरात हे पाणी शिरले. यासाठी पालिकेकडून आणि जिल्हा आपत्ती विभागाकडून नागरिकांना स्थलांतर करण्यासह सावधानतेचा इशाराही दिला आहे. या भागात घुसलेल्या पाण्यामध्ये काही ठिकाणचे दुर्गंधीचे पाणी मिसळल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. काही जणांच्या अंगणासह घरातही हे पाणी घुसल्याने त्यांना रात्रभर पाणीच काढण्याचे काम लागले होते. अजून दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिल्याने या भागातील नागरिकांत सध्यातरी चिंतेचे वातावरण आहे. कारण रस्त्यावर उभारलेल्या या पाण्यातून ये-जा करणे त्यांना कठीण होत आहे.

### ● हिप्परगा परिसरातील शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांत पाणी

गेल्या ४ दिवसांतील मुसळधार पावसाने हिप्परगा ओव्हरफ्लो झाला आणि बाहेरगावच्या ओढ्यातील आलेले पाणी बक्षी हिप्परगा येथील तलावाच्या आसपासच्या भागात शिरले. या पाण्याला मोठा वेग असल्याने अनेक शेतकऱ्यांची पिके आणि शेतातील मातीही वाहून गेली आहे. दरम्यान, या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी काही शेतकऱ्यांनी दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांना निवेदनही दिले आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाकडून लवकर पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा काही शेतकरी बांधवांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

### ● गुरूवारी सकाळी ११ पर्यंत नोंदलेला तालुकानिहाय पाऊस

गुरूवार, दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय नोंदलेला पाऊस असा होता. यामध्ये उत्तर सोलापूर ३९२.१ मिमी, द. सोलापूर ४१७.३, बार्शी २७५.२, अक्कलकोट ३५५.८, मोहोळ २५०.२, माढा २२६.१, करमाळा १२८.४, पंढरपूर १८४.९, सांगोला २१५.९, माळशिरस १९४.८, मंगळवेढा २११.५ असा जिल्ह्यात सरासरी २५२.० मिलीमीटर पाऊस पडला. तर पुणे विभागात ४६४.२ मिमी इतका पाऊस कोसळला आहे. करमाळा, पंढरपूर आणि माळशिरस तालुक्यात पाऊस कमी झाला असून, इतर सर्व तालुक्यात मात्र मोठा पाऊस कोसळला आहे.

### ● 'मे' मधील अवकाळीच्या बाधितांना शासनाकडून मदतीचा हात

जिल्हा आपत्ती विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार यंदा एप्रिल-मे मधील अवकाळी पावसाने तब्बल ३२ हजार ७६१ शेतकऱ्यांचे २२ हजार १९६.८७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहेत. त्यांना ४० कोटी ८७ लाखाची मदत शासनाकडून वर्ग करण्यात आली असून, ती मदत त्या-त्या शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा होत आहे. दरम्यान, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेली घरांची पडझड, मयत लहान-मोठे पशुधन आदींनाही शासनाकडून मदतीचा हात देण्यात आला आहे.

### ● शुक्रवारीही पावसाची तुरळक हजेरी

शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजीही दिवसभर पावसाच्या सरी चालूच होत्या. दिवसभर तसे ढगाळ वातावरणच होते. २ दिवसांपासून हिप्परगा तलावाचे पाणी सोलापूर शहराच्या काही नगरात घुसल्याने जवळपास २५ ते ३० हजार नागरिकांना याचा त्रास होत आहे आणि अजून एक-दोन दिवस जिल्ह्याला हवामान विभागाकडून यलो अलर्ट देण्यात आल्याने सोलापूरचे नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच आज दिवसभर श्रावणसरी अधुन-मधून येत होत्या.

### ● पालकमंत्री गोरे यांनीही पंचनाम्यांसाठी आदेश द्यावेत

गेल्या आठवड्यापासून सोलापूर शहर-जिल्ह्यात पावसाने धुमाकुळ घातला असून, अनेक भागात अतिवृष्टी झाल्याने शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेकांच्या शेतातील माती आणि बांधही वाहून गेले आहेत. तर काही जणांची उभी पिके या पाण्यात तरंगत आहेत. यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा प्रशासनाला लवकर पंचनामे करण्यासाठी आदेश द्यावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशीही मागणी काही जाणकार शेतकऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना दिली.

## ▶▶ महत्वाचे...

### विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह चौघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुवर्णा श्रीधर तळभंडारे (वय ३५, रा. बुधवार पेठ, मिलींद चौक, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती श्रीधर, सासू छाया, दीर उमेश, आनंद (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुलै २०२४ ते १३ ऑगस्ट या कालावधीत सुवर्णा या पती श्रीधर याच्यासोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती व इतरांनी मिळून घरच्या किरकोळ कारणावरून सुवर्णाला शारीरीक व मानसिक व आर्थिक छळ करून मारहाण केली. तसेच दिवसभर उपाशी ठेऊन त्रास देऊन मुलास तिच्यापासून दूर केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गौडनवरू तपास करीत आहेत.

### आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या खासगी सावकाराविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्या खासगी सावकाराविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिबूब कुरेशी (वय ५२, रा. सिध्देश्वर नगर भाग ४, नई जिंदगी, मजरेवाडी, सोलापूर) असे आत्महत्या करणाऱ्याचे नाव आहे. याबाबत तरन्नुम महिबुब कुरेशी (वय ३८, रा. सिध्देश्वर नगर भाग ४) यांच्या फिर्यादीवरुन जब्बार हसन शेख (रा. अमन चौक, नई जिंदगी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरन्नुम शेख यांचे पती महिबूब यांना जब्बार शेख याने २१ जुलै रोजी फोन करून मुस्लीम पाच्छा पेठ येथे बोलावून घेऊन तु माझ्याकडून व्यापारासाठी घेतलेले १० लाख रुपये परत दिले नाही तर तुला सोडत नाही, मुला उद्या दुपारी १२ पर्यंत सर्व पैसे व त्यावरील व्याज पाहिजे, नाही तर तुझ्या घरी येऊन तुला बघतो व तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली होती. त्या धमकीने घाबरून तसेच जब्बार शेख याच्या त्रासाला कंटाळून २१ जुलै रोजी महिबूब यांनी घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यामुळे महिबुब यांच्या आत्महत्येस जब्बार शेख हाच जबाबदार असल्याबाबतचा गुन्हा एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे तपास करीत आहेत.

## बुक्की मारून डोळा निकामी करणाऱ्यावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

बुक्कीने डोळ्यावर मारून तो निकामी करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शाहिद फिरोज पठाण (वय २१, रा. फॉरेस्ट, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन मोनू पवार (रा. मोदी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ ऑगस्ट रोजी रेल्वे कॉलनी येथे माझा मोबाईल कोण घेतला असावा असे म्हणून मोनू पवार याने शाहिद पठाण याच्या डोळ्यावर बुक्कीने मारहाण केली.

त्यामध्ये पठाण याचा डोळा निकामी झाला असून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.




### माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांना राष्ट्रपती भेटीचे निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांना भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी भेटीचे निमंत्रण दिले आहे.

दि. १८ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली राजभवन येथे भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांचे कार्यालयाकडून भारतातून एकूण ५६ लोकांची यादी प्रसिद्ध झाली आहे. यामध्ये महाराष्ट्रातून सोलापूर जिल्ह्यातील भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरसेविका राजश्री अनिल चव्हाण यांचे तर सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष ज्ञानेश्वर दामोदर भोसले (मोहोळ), हिंगोली जिल्ह्यातून भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष कोमल लक्ष्मण चव्हाण यांना निमंत्रित केले आहे.

सोमवारी राष्ट्रपती मूर्मू यांच्यासह बैठक होणार असून यावेळी विविध प्रश्नांवर संवाद साधला जाणार आहे.






# वडार समाजातर्फे गोपाळकाल्यानिमित्त उद्या नगरप्रदक्षिणा

## १०८ वर्षांची परंपरा : चंद्रनील फाउंडेशन सादर करणार भारतीय सैन्याचा गौरव देखावा



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-

वडार समाजातर्फे गोपाळकाल्यानिमित्त शनिवारी (दि. १६) परंपरेप्रमाणे नगर प्रदक्षिणा होणार आहे. तब्बल १०८ वर्षांची परंपरा असलेली ही दिंडी शनिवारी दुपारी २.३० वाजता बाळीवेसमधील श्री लक्ष्मण महाराज मंदिरापासून सुरू होणार आहे. तसेच चंद्रनील फाउंडेशनतर्फे दहीहंडीनिमित्त भारतीय सैन्याचा गौरव करणारा देखावा सादर करण्यात येणार असल्याची माहिती चंद्रनील फाउंडेशनचे अध्यक्ष सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी दिली.

### सोलापुरात प्रथमच हवेतून हलता देखावा

चंद्रनील फाउंडेशनतर्फे पश्चिम मंगळवार पेठ पोलीस चौकीजवळ दहीहंडी बांधण्यात येणार आहे. यावेळी 'गौरव भारतीय सैन्याच्या शौर्याचा' या संकल्पनेवर आधारित दोन देखावे सादर केले जातील. पहिल्या देखाव्यात भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या दहशतवादी ठिकाणांचा नायनाट केलेला प्रसंग नागरिकांना दाखवण्यात येणार असून दुसऱ्या देखाव्यात भारतीय सैन्य भारतमातेचे रक्षण करतानाचा हलता देखावा नागरिकांना पाहायला मिळणार आहे. याच ठिकाणी भारतीय सैनिकांच्या वीरमाता आणि वीरपत्नींचा सन्मान चंद्रनील फाउंडेशनतर्फे करण्यात येणार आहे. दहीहंडीचा उत्सव पहायला आलेल्या भाविकांना चंद्रनील फाउंडेशनतर्फे प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकांना रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत, असे चंद्रनील फाउंडेशनचे अध्यक्ष सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी सांगितले.

हभप गुरुवर्य श्री लक्ष्मण महाराज यांनी गोपाळकाल्यानिमित्त नगर प्रदक्षिणेची परंपरा सुरू केली. वडार समाजातर्फे शुक्रवारी (दि. १५) रात्री १२ वाजता कृष्ण जन्माष्टमीचा कार्यक्रम वडार समाज मारुती मंदिरात होईल. यानंतर शनिवारी (दि.१६) दुपारी २.३० वाजता समाजातील ज्येष्ठांच्या हस्ते पूजन होऊन नगरप्रदक्षिणेसाठी ही दिंडी लक्ष्मण महाराज प्रशाला येथून मार्गस्थ होणार आहे. येथून बाळीवेस, विजय चौक, चाटी गल्ली, मंगळवार पेठ, मधला मारुती, माणिक चौक, राजवाडे चौक, चौपाड, नवजवान गल्ली, श्री सळई मारुती मंदिरमार्गे वडार गल्लीमध्ये या दिंडीचा समारोप होईल. त्याचबरोबर वडार समाजाचे १५० तरुणांचे गोविंदा पथक असणार आहे.

# सर्व दुःखाचे कारण देहाभिमान होय : हभप. डॉ. जयवंत बोधले महाराज

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १४ ऑगस्ट-


श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २०

मानवी जीवनात खऱ्या अर्थाने मुक्तीचा सर्वात मोठा अडथळा म्हणजे अहंकार आणि ममता. 'अहं' आणि 'मम' या दोन्हींचा पूर्ण लोप झाला तर तीच खरी मुक्ती होय. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, मनात कोणत्याही प्रकारची आसक्ती, आपलेपणाची गाठ किंवा स्वार्थाचा धागा उरलेला नाही, अशी निर्मळ अवस्था प्राप्त होणे म्हणजेच मुक्ती होय. श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावरील २०व्या सत्रात हे अत्यंत मार्मिकपणे स्पष्ट केले.

महाराज पुढे म्हणाले, आजच्या काळात माणूस म णसापासून दूर जाण्याचे एक मुख्य कारण म्हणजे अहंकार. श्रीमद्भागवतमध्ये शुकाचार्यांचे उत्तरही याच विषयाशी संबंधित आहे. राजा परीक्षित अंतकाळ समीप आला असताना शुकाचार्यांना विचारतो, 'गुरुवर्य, आता मला मुक्ती हवी आहे; मी काय करु?'

शुकाचार्य उत्तर देतात, 'राजन्, प्रथम तुझ्या मनातील भीती नाहीशी झाली पाहिजे.' परीक्षित लगेच विचारतो, 'अहो, आचार्य, भय कसे नाहीसे होईल?'

तेव्हा शुकाचार्य सांगतात, 'मी देह आहे' हा अहंकार नाहीसा झाला पाहिजे. कारण माणसाच्या जीवनात निरुपयोगी असे काही असेल तर ते म्हणजे अहंकारच. हा अहंकार म णसाला समाधानात राहू देत नाही. आज समाजात विविध कारणांनी अहंकार वाढताना दिसतो आणि तिथूनच दुःखाच्या शाखा फुटू लागतात. माणूस अहंकाराची ही गाठ घट्ट बांधून आयुष्यभर समाधानाच्या शोधात धावतो, पण शेवटपर्यंत त्याला खरी शांती लाभत नाही.

जेथे अहंकार आहे, तेथे ममता नक्कीच चिकटलेली असते; आणि जिथे ममता आहे, तिथे असमाधान अपरिहार्य आहे. म्हणूनच अहंकाराचे निर्मूलन अत्यावश्यक आहे. 'मी आणि माझे' जोवर टिकते, तोवर माणसाला दुःख भोगावेच लागते. 'मी देह आहे', असे मानणे हे तर अध्यात्माच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे.

देहाभिमानाचा त्याग कसा करावा, याविषयी शुकाचार्यांचे उत्तर एकच वैराग्य! योगसूत्राच्या दृष्टीने वैराग्य म्हणजे दृश्य आणि श्रवणीय अशा सर्व विषयांचा त्याग. वैराग्याचे चार टप्पे सांगितले आहेत- १) यतमान संज्ञक वैराग्य २) व्यतिरेक संज्ञक वैराग्य ३) एकेंद्रिय संज्ञक वैराग्य ४) वशीकरण संज्ञक वैराग्य.

योगशास्त्र आणि भागवत यांच्या आधारे डॉ. जयवंत महाराजांनी या प्रकारांचे सविस्तर विवेचन केले आणि शुकाचार्यांच्या वैराग्याचे वर्णनही केले. महाराज शेवटी नम द करतात. राजा परीक्षिताच्या जीवनात आलेले वैराग्य हेच त्याच्या मुक्तीचे मुख्य कारण ठरले.

म्हणून हे सूत्र लक्षात ठेवावे-मुक्तीसाठी मृत्यूभय नाहीसे होणे आवश्यक. मृत्यूभय नाहीसे करण्यासाठी देहाभिमान नाहीसा होणे आवश्यक. आणि देहाभिमान नाहीसा करण्यासाठी वैराग्य येणे आवश्यक.आता प्रश्न उरतो- वैराग्य कसे साध्य करावे? याचे उत्तर महाराज उद्याच्या सत्रात देतील.

# १२७ आरोग्य महिला कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ

- स्वातंत्र्य दिनानिमित्त सीईओ जंगम यांच्याकडून मंजूरी



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-

जिल्हा परिषदमध्ये बऱ्याच दिवसांपासून आरोग्य महिला कर्मचारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना भेटून आश्वासित प्रगती योजना मंजूर करण्याबाबत विनंती करीत होते.

त्यामध्ये अनेक महिला आरोग्य कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. ही बाब लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी १२७ आरोग्य महिला कर्मचाऱ्यांना आश्वासित योजनेचा लाभ मंजूर केला. त्यामुळे महिला कर्मचारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी राखी पौर्णिमेची भेट दिली असल्याचे आरोग्य महिला कर्मचाऱ्यांमधून बोलले जात आहे. आश्वासित प्रगती लाभ मंजूर केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले, यांचे आरोग्य महिला कर्मचाऱ्यांम धून व्यक्त करण्यात येत आहे.





# ग्रंथपालदिनानिमित्त काव्यवाचन स्पर्धा

- प्रिसिजन वाचन अभियानाचा अभिनव उपक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-

शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय व प्रिसिजन वाचन अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमि त्त काव्य वाचन स्पर्धा पार पडली.

प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल महावीर लाळे यांनी केले. दोन गटांमध्ये ही स्पर्धा संपन्न झाली. कुसुमाग्रज (स्वरचित) गट आणि बहिणाबाई (अन्य रचित) गट असे हे दोन गट होते.

निवडक कवितांना सादरीकरण करण्याची संधी देण्यात आली. उत्तम सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली. कुसुमाग्रज गटातून (स्वरचित) श्रुती गोयल, रसिका येळवटकर, दिव्यानी महाजन यांना सर्वोत्तम सादरीकरणाचे बक्षीस मिळाले. बहिणाबाई गटातून (अन्य रचित) पूर्वा फिरोदिया,सम्यक जैन, मृदुला मोळे यांना सर्वोत्तम सादरीकरणाचे बक्षीस मिळाले.

परीक्षक म्हणून ज्येष्ठ लेखिका/ कवयित्री डॉक्टर नयना काळे यांनी काम पाहिले. डॉक्टर नयना काळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कविता कशी सादर करावी याबद्दल मार्गदर्शन केले. प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी म धव देशपांडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व, आणि सादरीकरणामध्ये वाचन कसे उपयुक्त ठरते ते सांगून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सूत्रसंचालन दिया पाटील आणि ऐश्वर्या ढब्बू यांनी केले. अतिथींचा परिचय सौंदर्या शहा यांनी केला. कार्यक्रमास प्राचार्या डॉक्टर विणा जावळे, उपप्राचार्य डॉक्टर शांतिनाथ बागेवाडी उपस्थित होते. आभार डॉक्टर गायत्री देशपांडे यांनी मानले. महाविद्यालयातील दोनशे विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

# सनराइज् मित्र ग्रुपतर्फे आज रक्तदान, मोफत नेत्र तपासणी शिबीर

सोलापूर :

स्वातंत्र्यदिनानिमित्त सनराइज मित्र ग्रुप च्या वतीने रक्तदान शिबिर मोफत नेत्र तपासणी आणि अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती विशाल बगले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्वर्गीय काका महाजनी अभ्यासिका, काका गणपती जवळ कुंभार वेस, सोलापूर येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. मागील वर्षी या उपक्रमात ५० लोकांनी रक्तदान केले होते. सुमारे १५० नागरिकांनी डोळ्यांची तपासणी करून घेतली होती. या पत्रकार परिषदेस किरण स्वामी, संतोष स्वामी, रोहन बिराजदार, नागराज घुळी, रामकृष्ण उदगीरी आदी उपस्थित होते.

# उमाबाई श्राविका विद्यालयाच्या वतीने तिरंगा प्रभात फेरी

सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत उमाबाई श्राविका विद्यालयाच्या वतीने तिरंगा प्रभात फेरी काढण्यात आली. सुरुवातीस मुख्याध्यापक सुकुम र मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांच्या हस्ते प्रभात फेरीचे उद्घाटन झाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज देऊन त्यांच्या मनाम ध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करणाऱ्या घोषणा देत ही रॅली श्राविका हायस्कूल पासून, बुधवार पेठ, २७ नंबर शाळा, बाळीवेस, सम्राट चौक या मार्गे काढण्यात आली स्वातंत्र्य दिनाच्या या रॅलीसाठी क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे प्रसन्न गाडे, सोनाली उंडे यांनी परिश्रम घेतले

# एमआयडीसी रोटरी क्लबला उत्कृष्ट सेवेबद्दल सात पुरस्कार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-




सोलापूर शहरात आंतरराष्ट्रीय रोटरी प्रांत ३१३२ चा विजयोत्सव हा सामाजिक सेवा पुरस्कार वितरण कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. यात रोटरी एमआयडीसीला २४-२५ वर्षात विविध क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट सामाजिक कार्यासाठी सात पुरस्कार मिळाले.

क्लब संस्थापक व म जी प्रांतपाल वेंकटेश चन्ना यांना उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून द्रोणाचार्य पुरस्काराने गौरविण्यात आले. अध्यक्ष अंबादास गड्डम यांना डिजी सायटेशन पुरस्कार, असिस्टंट गव्हर्नर प्रा. विठ्ठल वंगा यांना एजी ऍप्रिसिएशन अवॉर्ड तसेच गोल्डन अवॉर्ड, सचिव नर्सिंहा कनकी यांना बेस्ट सेक्रेटरी प्लॅटिनम अवॉर्ड, सत्यनारायण गुर्रम यांनी प्रोजेक्ट चेअरमन म्हणून कार्य केलेल्या वंचित मुलांच्या कार मधून काढलेल्या शैक्षणिक सहलीसाठी क्लबला प्लॅटिनम अवॉर्ड, स्व.चेतन गुर्रम स्मरणार्थ मोफत नेत्र तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया बेस्ट प्रोजेक्टसाठी गोल्डन अवॉर्ड अशा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. जालना येथे संपन्न झालेल्या विजयोत्सवात माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, प्रांतपाल सुधीर लातूरे, भावी प्रांतपाल जयेशभाई पटेल, क्षितिज झावेरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि पुण्याचे माजी प्रांतपाल मोहन पालेशा यांच्या हस्ते क्लबला हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी गोवर्धन चव्हाण, गणेश ईरावती, चार्वाक बुर्गुल उपस्थित होते.



# महापालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमि त्त चार हुतात्मा पुतळा चौक येथील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील कार्यालयामध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, विभागीय अधिकारी शाम कन्ना, उपअभियंता प्रकाश दिवाणजी, सहाय्यक कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजित खानसुळे, विरप्पा बंडगर, लखन गावडे, आकाश बन्ने, गोवर्धन सुंचू, प्रशांत बाबर, यल्लप्पा पुजारी,अमित मोतिवार सचिन पोरे, सिद्धू तिमीगार, अशोक खडके उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त सैन्यातील जवानांचा सन्मान

सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आणि 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या भारतीय सैन्यातील जवानांचा सन्मान महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सुभेदार मेजर कृष्णा सपकोटा, सी.एच.एम. विक्रमजीत सिंग आणि सुभेदार गोरखनाथ यांचा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, नियंत्रण अधिकारी तपन डंके, उप अभियंता अविनाश वाघमारे, कनिष्ठ अभियंता अभिजीत बिराजदार आणि चेतन प्रचंडे उपस्थित होते.



## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार
दि. १५ ऑगस्ट २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - श्रावण
कृ. सप्तमी (२३.४९)
ऋतु - वर्षा
नक्षत्र - अश्विनी (०७.३४)
योग - गंड (१०.१५)
करण - विष्टी (१२.५७)

दिनविशेष - स्वातंत्र्यदिन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, संत ज्ञानेश्वर महाराज जयंती.

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य म हत्त्वाचे ठरेल. प्रवासाचा योग संभवतो.

**वृषभ :** जास्त ताण घेऊ नका. अभ्यासाचा बाऊ न न करता विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा.

**मिथुन :** मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल.

**कर्क :** एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संम तीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

**सिंह :** मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या :** आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सद्गुरुची आराधनाने मन शांत होईल.

**मकर :** संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिम ानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ :** इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील. आनंदात जीवन जगाल. धन लाभ होईल.

**मीन :** एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल. जीवनात यशस्वी व्हाल.

# लेझीम स्पर्धेत बाळीवेस तरुण मंडळ प्रथम

## सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाचा बक्षीस वितरण समारंभ

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-



सोलापूर शहर मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाचा बक्षीस वितरण समारंभ शिवानुभव मंगल कार्यालय मीठ गल्ली येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. लेझीम स्पर्धेत प्रथम बक्षीस हे बाळीवेस तरुण मंडळाला मिळाले तर द्वितीय विभागून कुबेर गणपती जोडभावी पेठ, सरदार वल्लभभाई तरुण मंडळ बेगम पेठ आणि तृतीय विभागुन स्वतंत्र भारत तरुण मंडळ, चित्तोड रजपुत तरुण मंडळ यांना मिळाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेलरोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत तर प्रमुख पाहुणे फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत, ज्येष्ठ नेते दिलीप कोल्हे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, म नसे लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे, उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर, ट्रस्टी सुनिल रसाळे, माजी आमदार नरसिंग मेंगजी, ट्रस्टी कार्याध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, संजय शिंदे, विजय पुकाळे, कैलास मेंगाणे, अनिल गवळी, गौरव जक्कापुरे, मल्लिनाथ याळगी, सोमनाथ मेंडके, विष्णु मुधोळकर, लता फुटाणे, हेमा चिंचोळकर, विजयकुमार बिराजदार, गणेश चिंचोळी, किसन गर्जे, अभिषेक रंपुरे जैनोद्दीन शेख, प्रसाद कुमठेकर, जितेंद्र टेंभुर्णीकर उपस्थित होते.

### विविध स्पर्धेतील प्रथम तीन

**आरास स्पर्धा :** मानाचा कसबा गणपती, टिळक चौक तरुण मंडळ व अष्टविनायक युवक मंडळ कुंभारवेस (विभागून), लाला गणपती सामाजिक संस्था बुधले गल्ली.

**सांस्कृतिक स्पर्धा :** सोन्या मारुती युवक मंडळ, कार्यसिद्धी लंबोदर गणपती शुक्रवार पेठ, आपला गणपती प्रतिष्ठान शेळगी.

**शिस्तबद्ध स्पर्धा :** सावजी गणपती, भोई समाज राजस्थानी युवक मंडळ, जय मातृभुमी तरुण मंडळ मराठा वस्ती विजापूर वेस तरुण मंडळ.

**झांज स्पर्धा :** ओम गणपती तरुण मंडळ कुचन नगर, पावण गणपती खड्डा.

**ढोल स्पर्धा :** विश्व विनायक प्रतिष्ठान, विशेष गुणगौरव - पारितोषिक पाणीवेस तालीम तरुण मंडळ, थोरला मंगळवेढा तालीम तरुण मंडळ, समर्थ तरुण मंडळ, मानाचा आजोबा गणपती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### झाडबुके महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा; डॉ. रंगनाथन जयंतीनिमित्त केले होते आयोजन

**बार्शी, दि.१४ ऑगस्ट-**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व बीबीए विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालय विभागात मला आवडलेले पुस्तक या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. ग्रंथपाल ए.ए.जेवळीकर यांनी प्रास्ताविक केले. बीबीए विभागप्रमुख प्रा.युवराज बारबोले यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. नवनाथ दणाणे यांनी पुस्तकामुळे परिवर्तन कसे होते, शैक्षणिक वाटचालीमध्ये ग्रंथालयांची भूमिका किती महत्त्वाचे आहे याबद्दल मार्गदर्शन केले. मला आवडलेले पुस्तक यावरील वक्तृत्व स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये रिच डॅड पुअर या पुस्तकावर श्रावणी काळे, मृत्युंजय या पुस्तकावर राधिका कोगें, गुडविल गुड लाईफ या पुस्तकावर रमिझा लांगडे, मनमे है विश्वास या पुस्तकावर सिद्धी कुमार, हॅबिट या पुस्तकावर श्रुतिका कम्मार, विंग्स ऑफ फायर या पुस्तकावर विधी पूनमिया, झिरो टू वन या पुस्तकावर श्रावणी कानडे, विंग्स ऑफ फायर या पुस्तकावर नंदिनी हजरा व स्मितल कुंकूलोळ, श्यामची आई या पुस्तकावर प्रेरणा पोतदार या विद्यार्थ्यांनी पुस्तकाबद्दल माहिती देऊन यावर आपले विचार व्यक्त केले. या उपक्रमासाठी संचालिका वर्षा ठोंबरे, प्राचार्य मनोज गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या. आभार प्रा. एस.एम. सय्यद यांनी मानले. यावेळी प्रा. एस.एम. उबाळे, प्रा.आर.व्ही, जाधव, प्रा. एस.टी. शिंदे, प्रा. आर.जे. कांबळे यांची उपस्थिती होती. ग्रंथालय कर्मचारी विक्रम सुरवसे यांनी परिश्रम घेतले.



### स्वातंत्र्य दिनानिमित्त माजी सैनिकांचा सन्मान

**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

देश सेवेसाठी, देशातील नागरिकांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी देशाच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य समर्पित करणाऱ्या भारतीय सैन्य दलात अनेक वर्ष सेवा देणाऱ्या माजी सैनिकांचा मॉर्निंग सोशल फाउंडेशनच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे अवचित साधून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वदिनी माजी आमदार राजाभाऊ राऊत व मॉर्निंग सोशल फाउंडेशनचे अध्यक्षचे विजयनाना राऊत यांच्या संकल्पनेतून माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान कॅप्टन जगन्नाथ बदे, कॅप्टन मोहन चौधरी, सुभेदार गोरख कांदे, सुभेदार जनार्धन अंबुरे, नायक गजेंद्र बप्पा बरबोले, नायक सारुख हनुमंत यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मॉर्निंग सोशल फाउंडेशनचे सर्व सदस्य उपस्थित होते.



### नवनीत फौउंडेशनच्या वतीने शिष्यवृत्ती कार्यशाळेचे आयोजन

**वळसंग, दि. १४ ऑगस्ट-**

सोलापूर येथील हरिभाई देवकरण प्रशालेत दक्षिण सोलापूर तालूक्यातील शिक्षकांसाठी नवनीत फौउंडेशनच्या वतीने शिष्यवृत्ती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन सवीत्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. सोलापूर पंचायत समितीचे दक्षिण सोलापूरचे गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वळसंग बीटचे विस्तार अधिकारी गुरुबाळ सणके उपस्थित होते. यावेळी ६५ शिक्षकांनी उपस्थिती नोंदवली होती. कार्यशाळेस संपत शेलार, शामराव जुनघरे, नामदेव धनवडे यांनी भाषा, गणित, बुद्धिमत्ता या विषयावर मार्गदर्शन केले. कर्यक्रमाचा समारोप जिल्हा मुख्यालयाचे विस्तार अधिकारी हरीश राऊत यांच्या उपस्थितीत करण्यात आला. कार्यशाळेसाठी वळसंग केंद्रचे केंद्रप्रमुख पवार, मुस्ती केंद्र प्रमुख व्हनमाने तसेच बीआरसीचे संतोष मुरूमकर, तात्यासाहेब सातपुते, सिद्रामय्या स्वामी, ज़िल्लहा विज्ञान अदयापक मंडळाचे संजय जवंजाळ, नवनीत फौंडेशनचे सुहास काळे, सौरभ शिंदे, रोहित सावंत उपस्थित होते. आभार सिद्रामय्या स्वामी यांनी मानले.



### वेळापूर येथे डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी

**वेळापूर, दि. १४ ऑगस्ट-**

वेळापूर येथील इंग्लिश स्कूल व जुनिअर कॉलेजमध्ये भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. श्रीपाद रामचंद्र रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक आर. बी. पवार यांच्या हस्ते डॉ. रंगनाथन, स्वर्गीय दलितमित्र कदम गुरुजी व गौरव ग्रंथ व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक पी. एम. शिवशरण, पर्यवेक्षक बी. एस. सावळे, जेष्ठ शिक्षक एस. ए. जाधव, क्रीडा शिक्षक एस. पी. कदम आणि प्रशालेचे ग्रंथपाल एस. के. नवगीरे उपस्थित होते. जयंतीनिमित्त ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे संयोजन शालेय ग्रंथपाल एस. के. नवगीरे यांनी केले.

# पिलीव सोसायटी अध्यक्षपदी किसन सातपुते

- उपाध्यक्षपदी रंजना जावळे यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ ऑगस्ट-**



पिलीव (ता.माळशिरस) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी किसन सातपुते यांची मतदान होऊन तर उपाध्यक्षपदी रंजना जावळे यांची बिनविरोध निवड झाली.

चेअरमन संतोष उर्फ आनंद पाटील व व्हा. चेअरमन जाफर मुलाणी यांनी राजीनामा दिल्याने रिक्त पदांच्या निवडीसाठी सहाय्यक निबंधक निवडणूक निर्णय अधिकारी डी. पी. राऊत यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संचालक मंडळाची बैठक झाली. यावेळी चेअरमनपदासाठी दोन अर्ज दाखल झाले. त्यामध्ये निवड मंडळातर्फे चेअरमनपदासाठी किसन सातपुते यांच्या विरोधात विठ्ठल बाबुराव मदने यांनी अर्ज भरला होता. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी संचालिका रंजनाताई हणुमंत जावळे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. तिन्ही अर्ज छाननीत मंजूर करण्यात आले. त्याप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी एकमेव जावळे यांचाच अर्ज वैध ठरल्याने त्यांची व्हा. चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली तर चेअरमन पदासाठी उमेदवार किसन सातपुते विरोधात विठ्ठल बाबुराव मदने यांचे अर्ज राहिलेने मतदान होऊन किसन निवृत्ती सातपुते यांना १३ पैकी सात मते तर विरोधातील विठ्ठल बाबुराव मदने यांना सहा मते पडलेने मतपत्रिकेद्वारे गुप्त मतदान होऊन किसन निवृत्ती सातपुते यांचा एका मताने विजय झाल्याचे घोषित करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी राऊत यांनी चेअरमनपदी किसन सातपुते तर व्हा. चेअरमनपदी रंजनाताई जावळे यांची निवड घोषित केली. यावेळी सहाय्यक म्हणून सचिव श्रीकृष्ण सावंत, कर्मचारी विजय सपाटे, महेश पाटील व काटकर यांनी काम पाहिले. यावेळी संचालक संतोष उर्फ आनंद पाटील, जाफर मुलाणी, महादेव सुळे, पंकज मदने, कुबेर भैस, संग्राम पाटील, नबाजी मदने, पोपट गोडसे (माळी), विठ्ठल मदने, किसन सातपुते, प्रा.सुग्रीव लेंगरे, रंजनाताई जावळे, सुलाबाई जरग हे संचालक उपस्थित होते. निवडीनंतर चेअरमन व व्हा.चेअरमन यांचा बाबुराव पाटील, दत्तात्रय जावळे, बाबासाहेब पाटील, विठठल मदने -पाटील, अमोल मदने, सिताराम धायगुडे, गणेश पाटील, महादेव सुळे, नारायण सुळे, शामतात्या मदने, अण्णा सुळे, छगन मदने, मारुती पाटील, लहु पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

> चेअरमनपदाच्या निवडणूकीत विठ्ठल मदने यांचा अनपेक्षितपणे पराभव झाला याला गावातील स्थानीक राजकारणाचा परिणाम असल्याचे राजकीय जाणकारातून बोलले जात आहे.

### देऋब्रा मध्यवर्ती मंडळ शिष्यवृत्ती अर्जासाठी २० ऑगस्ट पर्यंत मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई यांच्यातर्फे प्रतिवर्षी दहावीच्या पुढे शिक्षण घेणाऱ्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या सभासदांच्या गरजू आणि गुणवंत पाल्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्यासाठी अर्ज करण्यास २० ऑगस्ट ही अखेरची तारीख आहे. त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अशी माहिती सोलापूरचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी दिली आहे.

संस्थेच्या सभासद पाल्यांनी विहित नमुन्यात आपला अर्ज २० ऑगस्ट २०२५ पूर्वी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर, दत्त चौक, समर्थ रामदास संकुल सोलापूर येथील कार्यालयात जमा करावेत. मंगळवेढा येथील विद्यार्थ्यांनी आपले अर्ज संस्थेचे प्रतिनिधी नाना जोशी यांच्याकडे जमा करावेत. शिष्यवृत्ती व अर्जाच्या अधिक माहितीसाठी मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारिणी सदस्य *दत्ता आराध्ये (९७६५५६६८८५) आणि नाना जोशी (९८९०८७६९३४) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन दे. ऋ. ब्रा. शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

### बार्शी रोटरी क्लबकडून विद्यार्थिनींना सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

रोटरी क्लब ऑफ बार्शीच्यावतीने आज माई सोपल सभागृह, सुभाषनगर येथे 'Bike 4 Educ - Cycle Bank' या प्रकल्पांतर्गत बार्शीतील विविध शाळांतील विद्यार्थिनींना सायकली वाटप करण्यात आल्या. शेठ अगरचंद कुंकूलोळ (५), बार्शी टेक्निकल (५), कन्या शाळा (५), जिजामाता (११), सिल्व्हर ज्युबली (५) व नवीन मराठी प्रशाळा (८) येथील विद्यार्थिनींना सायकली देण्यात आल्या.

प्रमुख पाहुणे म्हणून युवा उद्योजक श्रीकांत गणगले उपस्थित होते. रोटरी अध्यक्ष संजय हिंगमिरे, सचिव मधुकर डोईफोडे, अशोक हेड्डा, अनिलकाका बंडेवार, सुहास श्यामराज, अनिल बेदमुथा, गोविंद बाफना, नवनाथ गुल्हाने, आनंद महाजन, गणेश स्वामी तसेच शाळांचे प्रतिनिधी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

प्रास्ताविक रो. अशोक हेड्डा यांनी केले. मधुकर डोईफोडे यांनी प्रकल्पाविषयी माहिती दिली. शाळांच्यावतीने सतीश होनराव, संतोष खुडे व खुणे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन नवनाथ गुल्हाने यांनी तर आभार आनंद बेदमुथा यांनी मानले.

## पीक नुकसानीची प्रशासनाने दखल घ्यावी

- बक्षी हिप्परगेचे सरपंच मनोज महाडिक यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**



मुसळधार पावसाने जिल्ह्याच्या अनेक भागात धुमाकूळ घातला आहे. बक्षी हिप्परगेसह अनेक भागात सर्वत्र पुलावर पाणी आल्यामुळे या गावांचा शहराशी असलेला संपर्क तुटला आहे. त्यातच शेतकऱ्यांनी परिश्रमानं जोपासलेल्या खरीप पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. जिल्हा प्रशासनाने या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षी हिप्परगे गावचे सरपंच मनोज महाडिक यांनी शासनाकडे केली.

गेल्या चार दिवसात दक्षिण सोलापूर तालुक्याच्या अनेक भागात मुसळधार पावसाने सर्वत्र झोडपून काढले आहे. या पावसामुळे नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. रस्त्यावर आलेल्या पाण्यामुळे अनेक गावात नदी आणि ओढ्यांना पूर सदृश्य परिस्थिती आहे. नदी ओढ्यावर आलेल्या पुरामुळे बक्षी हिप्परगे ते सोलापूर जिल्ह्यातील वरळेगांव, वडजी वा मराठवाड्यातील सीमावर्ती भागातील खडकी धोत्री या मार्गाची वाहतूक खंडित झाली आहे. या दिवसात बक्षी हिप्परगे गावाचा सोलापूर शहराशी असलेला संपर्कही खंडित झाला आहे.

### मंगळवेढ्याचे नूतन डी.वाय.एस.पी.म्हणून डॉ. बसवराज शिवपुजे यांनी घेतला पदभार

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १३ ऑगस्ट-**



मंगळवेढ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांनी नुकताच पदभार स्विकारला आहे. दरम्यान तत्कालीन डी.वाय.एस.पी. विक्रांत गायकवाड यांची बदली झाल्याने येथील जागा रिक्त झाली होती.

महाराष्ट्र शासन गृहविभागाने पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून यामध्ये विद्यमान डी.वाय.एस.पी.विक्रांत गायकवाड यांची बदली अन्यत्र झाल्याने त्यांच्या जागी श्रीरामपूर येथून डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे हे आले असून त्यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला आहे. डॉ.शिवपुजे हे मुळचे नांदेड जिल्ह्यातील असून त्यांनी आत्तापर्यंत गडचिरोली,ठाणे, अकलूज आदी ठिकाणी आपली सेवा बजावली आहे. मंगळवेढ्यात वाढते अवैध धंदे रोखणे त्यांना एक आव्हान असून मागील दोन अडीच वर्षात डी.वाय.एस.पी. कार्यालयाकडून एकही पोलीस पथक अवैध धंद्याच्या कारवाईसाठी न नेमल्यामुळे अवैध धंदे व्यावसायिकावर अंकुश राहिला नसल्याची चर्चा होत आहे.



### राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन

**पिलीव, दि. १४ ऑगस्ट-**

पिलीव येथे राष्ट्रवादी महीला कॉंग्रेस (अजित पवार गट) यांच्यावतीने शहराध्यक्ष पूनम भैस व रेणुकाताई लिमकर यांच्या उपस्थितीत पोलीस व पत्रकारांसाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पोलीस नाईक अमीत जाधव तसेच पत्रकार दामोदर लोखंडे, संजय पाटील, अतुल नष्टे, शाहरुख मुलाणी, सुजित सातपुते, प्रमोद भैस, सतिश पारसे, ज्येष्ठ समाजसेवक भिमराव पाटील, सोनू सातपुते उपस्थित होते. यावेळी पत्रकार व पोलीसांना राखी बांधून पिंपळाचे रोपही भेट म्हणून देण्यात आले.

### आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त व्यक्तिमत्त्व विकासावर व्याख्यान

**अक्कलकोट दि १४ ऑगस्ट-**

लायन्स सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट व अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे उद्घाटन खेडगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एस. धबाले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थान लायन्स कल्बचे अध्यक्ष लायन अभय खोबरे यांनी भूषवले. प्रास्ताविक प्रो. डॉ. एस .के. मुरूमकर यांनी केले. व्यासपीठावर उपप्राचार्य कलशट्टी, वक्ते लायन प्रथमेश कासार उपस्थित होते. व्याख्याते लायन प्रथमेश कासार यांनी व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. वक्त्याचा परिचय डॉ. ए. पी. हिंडोळे यांनी करून दिला. आभार डॉ. जी. एस. स्वामी यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. के. डी. थोरे यांनी केले.

## गावात सुव्यवस्था असेल तर विकास वेगाने होतो

- पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी
- मंद्रुपमध्ये ३५३ जणांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ ऑगस्ट-**



गावात शांतता आणि सुव्यवस्था असेल तर त्या गावचा विकास वेगाने होतो. गावात भांडण, तंटे होऊ नये यासाठी पोलिस, गावातील जाणकार व ग्राम सुरक्षा दलांनी लक्ष देणे गरजेचे आहे, असे आवाहन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले.

सोलापूर ग्रामीण पोलीस व मंद्रूप पोलीस ठाण्याच्यावतीने पोलीस ठाण्यात ग्राम सुरक्षा दलांना लाठी, बॅंटरी आणि ट्री शर्टाचे वाटप तसेच रक्तदान शिबिर आणि वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी ३५३ जणांनी रक्तदान केले. यावेळी व्यासपीठावर उपविभागीय पोलीस अधिकारी, मंद्रूपचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, सरपंच अनिता कोरे, सरपंच श्रीदीप हसापूरे आदी उपस्थित होते. प्रस्ताविक सपोनि मनोज पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी केले तर आभार दिनेश पवार यांनी मानले.

## जेऊर येथे तिरंगा झेंडा पदयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ ऑगस्ट-**



जेऊर (ता. करमाळा) येथे ३०० फूट तिरंगा झेंडा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तरुणांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती वाढावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तिरंगा पदयात्रे मध्ये माजी सैनिक संघटनेचा सहभाग होता तसेच उपस्थित सर्व माजी सैनिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी माजी सैनिक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात जेऊर बस स्टॉप पासून ते जेऊर बाजार तळापर्यंत केले गेले होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे जेऊर येथील सर्व व्यापारी व ग्रामस्थांनी पुष्प वर्षाव करून या यात्रेचे स्वागत केले. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती दिग्विजय बागल , रामदास झोळ, धनंजय डोंगरे, सूर्यकांत पाटील आदी मान्यवर उपस्थितीत होते. या कार्यकमाचे नियोजन सचिन पिसाळ, शुभम बंडगर, रविकिरण माळवे, योद्धा अकादमी चे नाईकनवरे यांनी केले.

### न्यू इंग्लिश स्कूल करकंब प्रशालेचे योगासन स्पर्धेत यश

**करकंब, दि. १४ ऑगस्ट-**

पंढरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय योगासन स्पर्धेमध्ये न्यू. इंग्लिश स्कूल करकंब या प्रशालेची विद्यार्थिनी श्रावणी मारुती नलवडे हिने १७ वर्षीय वयोगटामध्ये



योगासने ट्रॅडिशनल मध्ये द्वितीय तर योगासन रिदमीक मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केल्यामुळे तिची जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये निवड झाली.या यशस्वी विद्यार्थिनीस क्रीडा शिक्षक अशोक खपाले व इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.यानिमित्त प्रशालेमध्ये युवा उद्योजक पांडुरंग काटवटे,संस्था अध्यक्ष संजीवकुमार मेहेत्रे, सचिव अविनाश देवकते, स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापक श्रीकांत लऊळकर, पर्यवेक्षिका लक्ष्मी शिंदे यांनी अभिनंदन केले.



### जिव्हाळा मागासवर्गीय संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन

**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

येथील जिव्हाळा बहुउद्देशीय मागासवर्गीय संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त खाऊ वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर उद्योजकविनयभाईसंघवी,डॉ.राहुल मांजरे पाटील, बार्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, डॉ. वर्षा टोपे, प्रा. जे.टी. जाधव, प्रा. उकिरडे, पत्रकार विनोद ननवरे, बहुजन हक्क अभियान महाराष्ट्र राज्य बार्शी तालुका युनिट अध्यक्ष सचिन पालखे, शहर अध्यक्ष दिपक पाटील, श्रीकांत गायकवाड, संजय शेळके, निलेश डोईफोडे, जिव्हाळा मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था बार्शीची संचालक बॉडीतील बब्रुवान धावारे, राजु थोरात, युवराज बाघमारे, श्यामलाल कसबे, महेंद्र गायकवाड, निलेश खुडे, मोहन खुडे, श्याम शिंदे, राहुल कांबळे, ॲड. संतोष कसर्वे उपस्थित होते.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्रावण सोमवारनिमित्त शिवपार्वती मंदिरात महाआरतीचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ ऑगस्ट-**

येथील महाशिवरात्र यात्रा समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्या वतीने पवित्र श्रावण मासाच्या समाप्ती निमित्त सोमवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७:०० वाजता शंकरनगर येथील श्री शिवपार्वती मंदिरात महाआरतीचे आयोजन केले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

या श्रावण महिन्यात शिवपार्वती मंदिरात अखंड नाम जप सोहळा सुरू आहे. याच कालावधीत दिनांक ३ ते ६ ऑगस्ट या चार दिवसांमध्ये शिवलीलामृत ग्रंथ पारायण पार पडले. या पारायणात पंचक्रोशीतील सुमारे १,३५० महिला सहभागी झाल्या होत्या.

स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली महिलांसाठी नागपंचमी सणानिमित्त २८ व २९ जुलै रोजी दोन दिवस सांस्कृतिक वारसा असणाऱ्या विविध पारंपारिक खेळ व उपक्रमाचे आयोजन केले होते. श्रावणाच्या प्रत्येक सोमवारी मंदिरात रुद्राभिषेक, आरती, धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचे वाटप केले जाते.

## महत्त्वाचे



### स्वातंत्र्यदिनानिमित्त एनसीसीकडून वृक्षारोपण मोहीम

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

ग्रीनिंग द नेशन (राष्ट्र हरितीकरण) ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीकडून स्वातंत्र्यदिनानिमित्त कुमठानाका येथील जिल्हा क्रीडांगणावर वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन आले होते. यावेळी अधिक काळ टिकणारी, जास्त प्राणवायू निर्माण करणारी, पशू-पक्षांना फुलं, फळांद्वारे अन्न देणारी भारतीय झाडे वड, पिंपळ, चिंच, कडूनिंब, बेहडा, आंबा या सारखी झाडे लावण्यात आली. या उपक्रमात ९ महाराष्ट्र बटालियन एन सी सी सोलापूर अंतर्गत संगमेश्वर महाविद्यालय, हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय, सोशल महाविद्यालयाचे एनसीसी विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी कर्नल सतीश रणधीर यांनी एनसीसी कॅडेट्सना मार्गदर्शन केले. याप्रसंगी एच.डी. कॉलेज प्राचार्या दीपा फाटक, सोशल कॉलेज प्राचार्य डॉ. तांबोळी यांची प्रमुख उपस्थिती होती. एनसीसी ऑफिसर मेजर बी.डी.बनसोडे, कॅप्टन शिल्पा लब्बा, कॅप्टन गौस शेख, लेफ्टनंट तुकाराम साळुंखे, सुभेदार मेजर कृष्णा सपकोता, हेड क्लार्क नीलकंठ शेटे, संजीव देगावकर, ट्रेनिंग जेसीओ महेश बरगंडे, हवालदार समाधान डी., इको नेचर क्लबचे मनोज देवकर, सामाजिक कार्यकर्ते राजू असादे यांनी सहभाग नोंदवला.

### सालगड्याने कराराचा भंग करून ९५ हजार रुपयांसह केला खताचा अपहार

**बार्शी, दि. १४ ऑगस्ट-**

पिंपळगाव (धस) येथील धनंजय महादेव धस यांची शेतातील सालगडयाने ९५ हजार रुपयांची फसवणूक करुन तसेच १९ हजार रुपये किमतीचे खताचा अपहार केल्याची घटना उघडकीस आली आहे. धस यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी शेतीकामासाठी सन २०२५-२६ वर्षाकरिता मारोती दत्ताराव कराळे (रा. केहाळ, ता. जिंतूर, जि. परभणी) यास सालगडी म्हणून १ लाख २० हजार रुपयांत ठरविले होते. करारानुसार धस यांनी त्याला ६० हजार रुपये रोख व १५ हजार रुपये फोन-पेवर तसेच नंतर किराणा व इतर खर्चासाठी २० हजार रुपये दिले. ७ एप्रिल रोजी कराळे आपल्या पत्नी व तीन मुलांसह कामावर राहण्यासाठी आला होता. मात्र, १० जुलैच्या रात्रीपासून तो कुठल्याही माहितीशिवाय पसार झाला. त्याच्यासोबत धस यांनी खरेदी केलेली ९ जुलै २४ या प्रकारची १० पोती खत (किंमत १९ हजार रुपये) देखील गायब आढळली. कराळे याने पूर्ण वर्षाचा करार पाळला नाही, एकूण ९५ हजार रुपये घेऊन निघून गेला तसेच खताचा अपहार केला, असा आरोप धस यांनी फिर्यादीत केला आहे. पोलीस याप्रकरणी तपास करीत आहेत.



### अतिवृष्टीमुळे नुकसान पिकांचा पंचनामा करून भरपाई देण्याची मागणी

**वळसंग, दि. १४ ऑगस्ट-**

भूमिसेना शेतकरी समिती, दिंडूर (ता. दक्षिण सोलापूर) महाराष्ट्र राज्यकडून अतिवृष्टीमुळे पिकांची नुकसानीचे पंचनामे तात्काळ करावे म्हणून दक्षिण सोलापूर तहसीलदार किरण जमदाडे यांना पत्र देण्यात आले. झालेला नुकसानाची पंचनामा करून त्यावर शेतकऱ्याला दिलासा द्यावा, असे निवेदन देण्यात आले. यावेळी देवेंद्र भिमशा शिवयोगी, बसवराज रमेश मिरजे, राजकुमार नरसप्पा घोडके, सिध्दाराम मडोळप्पा हूळळे, विनोद मधुकर कुलकर्णी, नागराज निंगप्पा टक्कळकी, आकाश उत्तम वडगाव, सिद्धाराम बिराजदार, शिरपनळळी उपसरपंच गोविंद माने उपस्थित होते.

### रेवणसिध्दाश्रमात उद्या सामूहिक रुद्र पठण

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

पूर्व मंगळवार पेठ येथील श्री रेवणसिध्दाश्रम सोलापूर येथे श्रावणमास निमित्त श्री. ष. ब्र. श्री. वीरतपस्वी वीरभद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आशिर्वादाने श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर पुराण चालू आहे.



श्री शिवयोगी सिध्दारामेश्वर पुरणामध्ये मल्लिकार्जून लिंग स्थापना प्रित्यर्थ दि. १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.०० वाजता जय माता रुद्र सेवा मंडळ, सोलापूर व इतर भगिनींसमवेत सामुहिक रुद्र पठण होणार आहे. सिध्दरामेश्वर पुराण वेदमुर्ती बसवराज पुराणिक शास्त्री यांचे रसाळ वाणीने दररोज चालू आहे. कार्यक्रमास उदयशंकर चाकोते, विश्वनाथ चाकोते, सिध्दय्या स्वामी हिरेमठ, सिध्दाराम चाकोते, बाबासाहेब देशमुख, प्रभु मारलभावी व कुंभार, राजु स्वामी सिंहासन, मंजुनाथ शास्त्री, मल्लाडे, शिंपी सहयोग देत आहेत.

# गोपाळपूरच्या अभिजित गुरव यांना पोलिस शौर्य पदक प्रदान होणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१४ ऑगस्ट -**

पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूरचे सुपुत्र व तिनसुकिया (आसाम) येथील वरिष्ठ पोलीस अधीक्षक अभिजित गुरव (IPS) यांना १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलिस पदक शौर्य (Police Medal for Gallantr) प्रदान करण्यात येत आहे.



अभिजित गुरव यांनी २०१४ साली युपीएससीव्दारे आयपीएस (IPS) पद मिळवून आसाम-मेघालय कॅडरमध्ये सेवा सुरू केली. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी धुबरी आणि तिनसुकिया जिल्ह्यांमध्ये एसपी म्हणून काम करताना अनेक आव्हानात्मक परिस्थिती यशस्वीरीत्या हाताळली. एका घटनेत, एका अल्पवयीन मुलीविरुद्ध झालेले लैंगिक अत्याचार हळूहळू एफआयआर शिवाय निष्पादित होण्याची शक्यता वर्तवली गेली होती. मात्र अभिजीत गुरव यांनी त्वरित विभागीय चौकशी सुरू केली व संबंधित पोलीस अधिकारी निलंबित केले आणि आरोपीला अटक करण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याची कायद्याने आपल्यावर असलेली जबाबदारी आणि आपले कर्तव्य यांच्याशी कोणतीही तडजोड न करता त्यांनी चोख भूमिका बजाविली होती. अलीकडील काळात अभिजित गुरव यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या एका मोहिमेत , अतिशय प्रतिकूल अशा परिस्थितीत सगळीकडे कुट्ट अंधार, त्या मध्येच कोसळणारा मुसळधार पाऊस आणि परिसरातील कठीण भौगोलिक अडथळ्यांवर मात करीत दहशतवादी संघटनेविरुद्धची मोहिम फत्ते केली. या मोहिमेत दहशतवादी संघटनेच्या एका प्रमुख नेत्याला यमसदनी धाडण्यात त्यांना आणि त्यांच्या संपुर्ण टीमला यश आले. संपूर्ण ऑपरेशनचे यश हे अभिजित गुरव यांच्या काटेकोर नियोजन, धोरणात्मक दृष्टिकोन आणि न डगमगणाऱ्या शौर्यावर आधारित होते. अभिजित गुरव यांनी नेहमीच भ्रष्टाचारमुक्त कार्यप्रणाली, कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर पालन आणि सर्वसामान्य लोकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले आहे. त्यांचे कार्य हे केवळ पोलिस दलासाठीच नव्हे तर तरुण पिढीसाठी देखील एक प्रेरणादायी उदाहरण ठरणारे आहे. अभिजीत गुरव यांच्या या यशामुळे केवळ गोपाळपूर गावाचीच नव्हे तर पंढरपूर तालुका आणि संपूर्ण सोलापूर जिल्ह्याची देखील मान उंचावली आहे. या बरोबरच या उत्तुंग अशा त्यांच्या कर्तुत्ववान कामगिरीने भारत देशाचा अभिमान देखील निश्चितच वाढवला आहे.

## राष्ट्रपतींचे मोहोळच्या ज्ञानेश्वर भोसले यांना आमंत्रण

- सोमवारी राष्ट्रपती भवनातील चर्चासत्रात सहभाग व राष्ट्रपतीसोबत स्नेहभोजन

**मोहोळ, दि.१४ ऑगस्ट-**

देशातील आदिवासी व पारधी समाजाच्या विकासासाठी ठरविण्यात येणाऱ्या धोरणामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी होणाऱ्या चर्चेत सहभागी होण्यासाठी राष्ट्रपतींनी देशातील ५६ जणांना सोमवार दि. १८ ऑगस्ट रोजी आमंत्रीत केले असून त्यामध्ये मोहोळ येथील भाजपा अनुसुचित जमाती मोर्चाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले यांना आमंत्रित करण्यात आले आहे. तशा आशयाचे लेखी पत्र राष्ट्रपती भवनकडून भोसले यांना १२ ऑगस्ट रोजी प्राप्त झाले.



या संदर्भात अधिक माहिती अशी की, महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या स्वतः आदिवासी समाजातील आहेत. व्यक्तिगत आयुष्यात खडतर प्रवास करून त्यांनी हे सर्वोच्च पद प्राप्त केले आहे. त्यामुळे समाजातील एक मोठा भाग असलेला आदिवासी, पारधी अशा अनेक समाज घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न चालू ठेवले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या देशातील ५६ जणांना आमंत्रीत करण्यात आले आहे. त्यात महाराष्ट्रातून मोहोळ येथे सन २००७ मध्ये अनाथ पारधी मुलामुलींचे वसतीगृह चालविणारे ज्ञानेश्वर कुंडलिक भोसले यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ अशोक उईके यांनी यासाठी संपूर्ण भारतातून या ५६ जणांची निवड केली आहे. विकसित भारत उन्नत भारत हे स्वप्न साकार व्हावे यासाठी अशा चर्चासत्रांचे आयोजन केले जात असून, ज्ञानेश्वर भोसले यांनी गेली ३० वर्षे या क्षेत्रात केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांची या शिष्टमंडळात निवड झाली आहे. या शिष्टमंडळाबरोबर दोन तास चर्चा आणि स्नेह भोजनाचा कार्यक्रम सुद्धा महामहिम राष्ट्रपतींनी आयोजित केला आहे. गेल्याच महिन्यात त्यांच्या भगिनी व पुण्याच्या माजी नगरसेविका राजश्री काळे यांनाही हा बहुमान मिळाला होता. त्यापाठोपाठ आता ज्ञानेश्वर भोसले यांनाही संधी मिळाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## बार्शीच्या सुश्रृत हॉस्पिटलमध्ये आजपासून विशेष सेवा

- यूरोलॉजी आणि हृदयविकाराच्या उपचारांसाठी खास सोय

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१४ ऑगस्ट-**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बार्शी येथील सुश्रुत हॉस्पिटलमध्ये नागरिकांसाठी युरोलॉजी (मूत्रविज्ञान) विभाग आणि मोफत हृदयविकार उपचार व अँजिओप्लास्टी या दोन महत्त्वाच्या आरोग्य सेवा सुरु करण्यात येणार आहेत. या दोन्ही सेवांचा उद्देश गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना अत्याधुनिक आणि मोफत उपचार उपलब्ध करुन देणे हा आहे.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत युरोलॉजी सेवा मोफत असणार आहे. मुत्रसंस्थेशी संबंधित विविध आजारांवर उपचार केले जाणार आहेत. यामध्ये प्रोस्टेटची तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया, मूत्रपिंड आणि मुत्राशयातील खड्यांवर शस्त्रक्रिया, तसेच मुत्रमार्गाच्या संसर्गाची काळजी आणि पुरुषांच्या प्रजनन आरोग्यासंबंधी सल्ला दिला जाईल. ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही आणि त्यांना स्थानिक पातळीवरच उत्तम उपचार मिळतील. या दोन्ही सेवांचा लाभ घेण्यासाठी गरजू रुग्णांनी हॉस्पिटलशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ.संजय अंधारे यांनी केले आहे. डॉ. अंधारे यांच्या कल्पनेतून रात्री १२ ते सकाळी ६ या वेळेत मोफत ईसीजी आणि शुगर तपासणीची सोय करण्यात आली आहे. अनेकदा रात्रीच्या वेळी हृदयविकाराचा झटका किंवा रक्तातील साखरेची पातळी कमी-जास्त होण्यामुळे रुग्णांना तातडीच्या उपचारांची गरज भासते. अशा परिस्थितीत, ही मोफत तपासणी रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरेल.

### स्टेमी प्रोजेक्ट अंतर्गत हृदयविकारावर मोफत उपचार

या व्यतिरिक्त हॉस्पिटलमध्ये गेल्या सहा ते आठ महिन्यांपासून 'स्टेमी प्रोजेक्ट' (धाराशिव व सोलापूर) यशस्वीरित्या सुरु आहे. या प्रकल्पाअंतर्गत गंभीर स्वरुपाचा हृदयविकाराचा झटका (STEMI) आलेल्या रुग्णांना तातडीने रक्ताची गुठळी पातळ करण्याचे औषध (Thrombolysis) दिले जाते, ज्यामुळे रुग्णांचा जीव वाचण्यास मदत होते. या प्रकल्पाने आतापर्यंत अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. या सेवेला मिळालेल्या यशातुन प्रेरणा घेऊन हॉस्पिटलने एक नवीन उपक्रम सुरू केला आहे.

## अक्कलकोटमध्ये तिरंगा अभियान; मोटार सायकल रॅलीचे आयोजन

- आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ ऑगस्ट-**



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली तसेच नगरपालिका, पंचायत समिती, तहसील कार्यालय व पोलीस प्रशासन अधिकारी व कर्मचारी यांच्यासह शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण देशभर हर घर तिरंगा अभियान मोठ्या उत्साहात राबवले जात आहे. याच अनुषंगाने, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शहरातील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिरापासून रॅलीस प्रारंभ होऊन विजय चौक, कारंजा चौक, कापड बाजार, मेन रोड, वीर सावरकर चौक, सोन्या मारुती चौक, समर्थ चौक, राजे फत्तेसिंह चौक, जुना तहसील कार्यालय मार्गे एवं चौक येतील हुतात्मा स्तंभ येथे सदरील रॅलीचे समारोप करण्यात आले. या रॅलीत आमदार सचिन कल्याणशेट्टी, तहसीलदार विनायक मगर, मुख्याधिकारी रमाकांत डाके, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, गटविकास अधिकारी, मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोले, माजी उपसभापती आप्पासाहेब पाटील, शिवशरण जोजन, मोतीराम राठोड, भाजपा अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नन्नूभाई कोरबु, अमोल हिप्परगी, आनंद खजूरगीकर, रिपाई तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, परमेश्वर यादवाड, नागू कुंभार, कांतु धनशेट्टी, प्रशांत लोकापुरे, दयानंद बिडवे, प्रवीण शहा, शिवशंकर स्वामी, सौरभ हळके, अमर शिरसाट, सिद्धाराम पाटील, सिद्धाराम टाके, सुनील गोरे, विनोद मोरे, बसवराज मंटगी, निखिल सलगोंडा, आतिश पवार, सिद्धाराम माळी, शिवराज जकापुरे, हनीफ कोरबु, प्रज्वल गवंडी, श्रीनाथ पराणे यांच्यासह शहरातील नागरिक उपस्थित होते.

## पंढरपुरात तिरंगा बाईक रॅलीतून देशभक्तीचा जागर

- प्रशासनाकडून आयोजन
- नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ ऑगस्ट-**




नागरिकांमध्ये राष्ट्राभिमान, देशभक्ती निर्माण व्हावी तसेच भारतीय स्वातंत्र्याचा ज्वाजल्य इतिहासाचे सर्व नागरिकांना स्मरण व्हावे, या उद्देशाने शासनामार्फत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. तिरंगा हा प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचे प्रतीक असल्याने पंढरपूर तालुका प्रशासनाच्या वतीने शहरातून तिरंगा बाईक रॅली काढून देशभक्तीचा जागर करण्यात आला.

यावेळी आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे , तहसिलदार सचिन लंगुटे यांनी हिरवी झेंडी दाखवून तिरंगा रॅलीला रवाना केले.सदर तिरंगा बाईक रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरु झालेली बाईक रॅली चौफाळा-नाथ चौक-तांबडा मारुती - महाद्वार - कालिका माता मंदिर - काळा मारुती चौफाळा मार्गे येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समारोप करण्यात आला. यावेळी रॅलीत विविध देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. रॅलीमध्ये आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे , तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, शहर पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, तालुका पोलीस निरिक्षक टी.वाय.मुजावर तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.१४ ऑगस्ट -**

हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' अभियानांतर्गत पंढरपूर नगरपरिषदेने विविध शाळांमध्ये तिरंगा राखी, तिरंगा रांगोळी स्पर्धा, माझे संविधान निबंध स्पर्धा, समूह गीत गायन स्पर्धा उपक्रम राबवला. शहरातील १४ शाळांतील १ हजार २८९ विद्यार्थी व ६७ शिक्षकांसह नागरिकांनी सहभाग घेतल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. चित्रकला, तिरंगा राखी, तिरंगा रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. हस्ताक्षर व माझे संविधान या विषयावर स्पर्धेचे आयोजन केले होते. समूहगीत गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत महिला बचत गट (एसएचजी) करिता क्षमता बांधणी या घटका अंतर्गत कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये स्वच्छतेचे महत्व, पर्यावरण जनजागृती, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणेचे मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये ५० बचत गटातील महिलांनी सहभाग नोंदविला. नगरपालिका कर्मचाऱ्यांनी यमाई तलाव येथे स्वच्छता मोहीम राबवली. शहरात विविध ठिकाणी तिरंगा कॅनव्हॉसची व सेल्फी पॉईंट व्यवस्था करण्यात आली. मध्यवर्ती ठिकाणी मोबाईल शॉपीमध्ये बचत गटातील महिलामार्फत स्टॉल आहेत. तेथे झेंडे उपलब्ध होतील. तसेच छत्रपती शिवाजी चौकात तिरंगा मेला असणार आहे. विविध वस्तूंची विक्री होणार असल्याचे मुख्याधिकारी रोकडे यांनी दिली.